# THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL LIBRARY

OU_196053

UNIVERSAL LIBRARY

**OSMANIA UNIVERSITY LIBRARY**


Call No. M 294 K55R　　Accession No. M 5058

Author किंजवडेकर, श्रीपादशास्त्री.

Title रुद्राध्याय दीपिका.

This book should be returned on or before the date last marked below.

# रुद्रार्थ दीपिका



लेखक

पण्डित "मीमांसातीर्थ" श्रीपादशास्त्री किंजवडेकर

यशवंत प्रकाशन, पुणें २.

प्रकाशक :
**अनंत सदाशिव वैद्य**
यशवंत प्रकाशन,
$\frac{६८१}{२४}$ सदाशीव, पुणें २,

◆ ◆ ◆

**किंमत रु. २-५० न. पै.**

◆ ◆ ◆

प्रथमावृत्ति
अक्षय्य ३, शके १८८२.

◆ ◆ ◆

मुद्रक :
**म. ना. चापेकर,**
आर्यसंस्कृति मुद्रणालय,
$\frac{१५७५}{२}$ सदाशिव, टिळक रस्ता,
पुणें २.

॥ श्री ॥

# विश्वाचें विराट महाकाव्य

जीवनांत आमूलाग्र क्रान्ति निर्माण करूं शकणारे भव्य व उदात्त असे विचार असलेलीं, अनेक सूक्तें आपल्या वैदिक वाङ्मयांत आढळून येतात. आपल्या भारतीय समाजाच्या भव्यतेचें व उदात्ततेचें रमणीय असें प्रतिबिंबच जणूं आपल्या वैदिक वाङ्मयांत उमटलें आहे असें हीं सूक्तें पाहिल्यावर वाटल्यावांचून रहात नाहीं.

ज्या विचारांचा परिणाम आपल्या समाजधारणेवर झाला व तद्वारा आपल्या राष्ट्रधारणेवर झाला ते विचार केवळ विचार नसून भारतीय जीवनमूल्यांचे जणूं ते अमर असे स्तंभच होत !

अशा या उत्तुङ्ग दीपस्तंभानें उजळून काढलेल्या भारतीय जीवनपथावरील एक महत्त्वाचा दीपस्तम्भ म्हणून **श्रीरुद्रसूक्ताचा** उल्लेख करणें वावगें ठरणार नाहीं.

'रुद्र' हें केवळ सूक्त नसून तें विश्वाचें विराट् महाकाव्य आहे. साक्षात्कृतधर्माण अशा ऋषींच्या क्रान्तिदर्शी दिव्य ऋतम्भरा प्रज्ञेंतून तें उत्स्फूर्त झाल्यामुळें तर त्याचें एक आगळेंच महत्त्व आहे. मानवी प्रतिभेला अनाकलनीय अशी विराट् भरारी मारण्याचें सामर्थ्य या दिव्य प्रतिभेला सहजच असतें; म्हणूनच अशा दिव्य व लोकोत्तर प्रतिभेंतून विश्वाचें सामान्यतः अज्ञेय व निगूढ असें रहस्यही व्यक्त होत असतें. रुद्रसूक्तांतूनही असेंच रहस्य व्यक्त होत असल्यानें मी त्याला विश्वाचें विराट् महाकाव्य असें म्हणतो.

## मानवाची उत्क्रांति

मानवी योनींतून दैवी योनींत उत्क्रान्ति करून घ्यावयाची असेल तर या क्रान्तिदर्शी कविप्रतिभेंतून उगम पावलेल्या व महन्मङ्गल अशा विराट् रुद्रगङ्गेंतच आपणांस अवगाहन करावयास हवें.

भारतीय संस्कृति ही मुख्यतः यज्ञप्रधान संस्कृति आहे म्हणजेच त्यागप्रधान संस्कृति. या त्यागाची, निरपेक्ष त्यागाची दिव्य प्रेरणा ज्या यज्ञमण्डपांतून आपणांस मिळाली त्या यज्ञमण्डपांतच मानवीच केवळ नव्हे तर चराचर सृष्टीच्या जीवनांतील विविधांगाबद्दल वैचारिक मंथन झालें आहे. अग्निमंथन जसे यज्ञमण्डपांत होत असें तसेंच साथीसाथ वैचारिक मंथनही त्याबरोबरच होत असे. याचा परिणाम असा झाला कीं, आपल्या सर्व आचार–विचारांचा शेवटीं संङ्गम जो व्हावयाचा तो यज्ञांतच व्हावयाचा हें ठरून गेल्यासारखें होतें. आज ही यज्ञसंस्था शिथिल होत हळुहळु नष्ट होण्याच्या मार्गावर आली. नष्ट होणाऱ्या या यज्ञसंस्थेबरोबरच तदुद्भव उदात्त आचार–विचारांची परंपरा नाहीशी होत चालली आहे. या सर्वांचा परिणाम सामाजिक जीवनांत वैचारिक अराजकता निर्माण होण्यांत न झाला तरच नवल! समाज हा अवयवी मानला तर व्यक्ति हा त्याचा अवयव होय, हा अवयव जर विकृत होऊं लागला तर त्याचा परिणाम समाजावर झाल्याविना कसा राहील? म्हणून समाजधारणा जर दृढ व्हावयास हवी असेल तर प्रथम व्यक्ति ही दृढिष्ठ, आशिष्ठ, आणि बलिष्ठ असावयास हवी हें घडून यावयास पाहिजे तर पुनरपि आपणांस वैदिक विचारांचाच अवलम्ब करावयास पाहिजे हें निर्विवाद होय.

मानवी जीवन हें मूलतः असंयत व स्वैर असें आहे. जन्मजन्मान्तरीय शुभाशुभ वासनांमुळें त्याची प्रवृत्ति प्रायः बहिर्मुख व भोगैकप्रवण अशी असते. अशा भोगैकप्रवण जीवनाचा जर अभ्युदय व्हावयास हवा तर त्यावर नियन्त्रण हें अपरिहार्य आहे व तेंही दुसऱ्यानें लादलेलें नव्हे तर स्वतः खुषीनें पत्करलेलें पाहिजे. स्वतःचें स्वतःवर नियन्त्रण घालून घेण्याइतका मनाचा विकास ज्या विचारांनीं होतो त्या विचारांत रुद्रसूक्तान्तर्गत विचार हे महत्त्वाचे आहेत. या अमर विचारांचे सुपरिणाम जीवनांत दिसून येण्याचे दृष्टीनेंच रुद्रसूक्ताची दैनंदिन जीवनांत आपल्या ऋषींनीं मुद्दाम योजना केली आहे. अशा या रुद्रसूक्ताची पार्श्वभूमी तरी काय आहे हें आपण लक्षांत घेतलें पाहिजे.

कृष्णयजुर्वेदांतील पांचव्या अध्यायांत हें रुद्रसूक्त आलें आहे. चवथ्या अध्यायांत इष्टकाचिति सांगून झाल्यावर या पांचव्या अध्यायांत चित्यग्नीवर

'होम' करावा असें सांगितलें आहे. यज्ञप्रकरणांत हें रुद्रसूक्त असल्यामुळ त्याचा विनियोग प्रथम यज्ञांत झाला. अर्थातच 'रुद्रसूत्र' हें एक यज्ञीय अङ्ग म्हणूनच प्रसिद्ध आहे – सायणाचार्यांनीं असेंच सांगितलें आहे. ते म्हणतात :—

इष्टकाचितयः सर्वाश्चतुर्थे हि समापिताः ।
रुद्राध्याये पञ्चमेऽतु चित्यग्नौ होम उच्यते ॥

असें सांगून पुढें म्हणतात :—

कर्मप्रकरणे पाठात् कर्माङ्गत्वमपीष्यते ।

चित्यग्नीवर होम करतेवेळीं म्हणावयाचे जे मन्त्र त्यांनाच 'रुद्र' असें म्हणतात आणि हा रुद्र म्हणून होम करावयाचा म्हणून रुद्र हा त्या होमाचें अङ्ग, अशा रीतीनें रुद्राचा सर्व प्रथम विनियोग यज्ञामध्यें पूर्वीं होत असे. रुद्र या शब्दाचा अर्थ श्रुतीमध्यें असा सांगितला आहे :—

"रुद्रोवाएषयदग्निः स एतर्हि जातो यर्हि सर्वाश्रितः स यथा वत्सोजातः स्तनं प्रेप्सत्येवं वा एष एतर्हि भागधेयं प्रेप्सति तस्मै यदाहुतिं न जुहुयादध्वर्युं च य यजमानं च ध्यायेच्छत रुद्रीयं जुहोति भागधेयेनैवैन ँ शमयति नार्तिमार्छत्यध्वर्युर्नयजमानः" इति ।

यज्ञामधें प्रगट होणाऱ्या अग्नीलाच रुद्र असें म्हणतात. वरील श्रुतिवाक्यांत शतरुद्रीय हा शब्द आला आहे. त्याचा अर्थ या रुद्रसूक्तांत रुद्राचीं नांवें शंभर आहेत म्हणून याला शतरुद्र असें म्हणतात व या शतरुद्राभिधानानें जो होम केला जातो त्याला शतरुद्रीय असें म्हणतात. या शतरुद्रीय होमाचाच अर्थवाद वरील श्रुतीनें केला आहे.

प्रयोगकालीन अर्थस्मरण हेंच मन्त्रांचें मुख्य प्रयोजन मीमांसकांनीं मानलें आहे. मीमांसकांच्या या मतालाच अनुसरून सायणाचार्यांनींही आपल्या रुद्रभाष्यांत रुद्रसूक्ताचें मुख्यतः कर्मपर विवेचन केलें आहे.

इहकर्माङ्गतायादग्वर्णिता ब्राह्मणेन ताम् ।
बोध्दुं शब्दार्थ मात्रस्य विवृतिः क्रियते स्फुटा ॥

असें उपोद्घातांत त्यांनीं स्वच्छच सांगितलें आहे.

इष्टकाचिति हा शब्द पूर्वीं आला आहे. त्याचा अर्थ चयनं चितिः, इष्ट-

काभिः चितिः इष्टकाचितिः। इष्टका म्हणजे विशिष्ट आकाराच्या मातीच्या तयार केलेल्या विटा, ह्या इष्टकांच्या विशेष प्रकारच्या रचनेनें तयार होणारी जी आकृति तीच इष्टकाचिति. आजकाल चयनयज्ञासारखे महान् श्रौतयज्ञ पाहण्यास सांपडत नाहींत; त्यामुळें इष्टकाचयन म्हणजे काय प्रकार असतो याची सुतरां कल्पनाही रुद्रावर्तन लघुरुद्र, महारुद्र, अतिरुद्र वगैरे प्रकारानें रुद्र म्हणणाऱ्या रुद्रभक्त लोकांनाही जिथें इष्टकाचयन म्हणजे काय याची माहिती नाहीं तिथें इतरांनां तरी ती माहिती कशी असणार? यज्ञप्रक्रियेचे संस्कार ज्यांच्यावर अजिबात नाहींत अशा सामान्य परंतु जिज्ञासू वाचकांच्या माहितीसाठीं या विषयाचें थोडें विवरण येथें केल्यास तें अप्रस्तुत ठरणार नाहींच; उलट रुद्राच्या संदर्भांत ही माहिती असणें आवश्यकच ठरेल.

ह्या इष्टकांचे विविध आकार असतात, ते असे—

षोडश्य इष्टकाः

अर्धेष्टकाः

पादेष्टकाः

पक्षेष्टकाः

पक्षमध्याः

पक्षाग्रीयाः

आग्नीध्रीयाः

इत्यादि अनेक आकारांच्या या इष्टका चयन यागांत तयार कराव्या लागतात. एकूण चयन यज्ञांत अशा इष्टका १२०९ असतात; या हजारों इष्टकांची एकावर एक अशी मन्त्रपूर्वक रचना झाली म्हणजे शेवटीं श्येन पक्ष्याप्रमाणें आकार तयार होतो. "श्येनाचितं चिन्वीत" या श्रुति वाक्यांत श्येन पक्ष्याप्रमाणें चयन करावें असें सांगितलें आहे. याप्रमाणें समन्त्रक हजारों इष्टकांची रचना करणें हें मोठया कौशल्याचेंच काम आहे अशा मन्त्रोपधानपूर्वक श्येन पक्ष्याकृति जें इष्टकाचयन होतें त्यावर जो अग्नी प्रगट होतो तोच रुद्र शब्दानें श्रुतीनें सांगितला आहे. रुद्र म्हणून या चित्याग्नीवर होम कसा करावा हें कल्पसूत्रकारानीं पुढीलप्रमाणें सांगितलें आहे—

"शतरुद्रीयं जुहोति जर्तिलयवाग्वावा गवीधुकयवाग्वावाजर्तिलैर्गवीधुक सक्तुभिः कुशयवसर्पिषाऽजाक्षीरेण मृगीक्षीरेणवाऽर्के-

**पर्णेनोदङ्तिष्ठन्नुत्तरस्यपक्षस उत्तरापरस्यां स्त्रवत्यां विकर्ण्यां स्वयमातृण्णायामनुपरिचारं वा "।** असें सांगून पुढें सांगतात—

**नमस्ते रुद्रमन्यव इत्येताननुवाकास्त्रैधं विभज्यापि वा प्रथमादुपक्रम्य नमस्तक्षभ्य इति जातुदघ्नेधारयमाणो रथकारेभ्यश्च व इत्युपक्रम्यनमःस्वायुधा येति नाभिदघ्ने शेषेण प्रागवतानेभ्य आस्यदघ्ने हुत्वासहस्राणि सहस्रश इति दशावतानान्हुत्वाऽन्वादोहान् जुहोति नमो रुद्रेभ्यो ये पृथिव्यामितिजानुदघ्ने धारयमाणो नमो रुद्रेभ्यो येऽन्तरिक्ष इति नाभिदघ्ने नमो रुद्रेभ्यो ये दिवी त्यास्य दघ्ने हुत्वैनेता व यजमानं वाचियत्वा एतानेव विपरीतान् प्रत्यवरोहान् हुत्वा संचरे पशूनामर्कपर्णमुदस्यातियंद्धिष्ण्यातस्य संचरे इति । "**

हे वरील कल्पसूत्रकारांचे विस्तृत वचन येथें उद्धृत करण्याचें कारण रुद्राचा मूळ विनियोग यज्ञांत कसा केला जात असे हें स्पष्ट व्हावें, हाच आशय मनांत ठेवून सायणाचार्यांनीं रुद्राचा कर्मपर अर्थ मुख्यतः सांगितला आहे. तथापि सायणाचार्यांनीं हेंही त्याबरोबरच मान्य केलें आहे कीं, रुद्राची अनेक ऋषींनीं अनेक तऱ्हेनें जी प्रशंसा केली आहे त्यामुळें रुद्राचें महत्त्व केवळ यज्ञांतील विनियोगापुरतेंच नसून व्यापक अशा तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनेंही रुद्राचें एक आगळें व स्वयंभू असें महत्त्व आहे. आपल्या प्रस्तावनेंत ते म्हणतात :—

" **ज्ञानहेतुत्वमप्यस्य तथोपनिषदीरितम् ।**
**स्मृत्यागमपुराणेषु रुद्राध्याय प्रशंसनम् ।**
**बव्हस्ति तद्विस्तरेण रुद्रकल्पेऽभिधास्यते ॥**"

यावरून सायणाचार्यांनाही रुद्राचा अध्यात्मपर असा अर्थ मान्यच होता हें दिसून येईल मात्र रुद्राचा अर्थकर्मपर असला तरी चित्तशुद्धिद्वारा ज्ञानप्राप्ति व तद्वारा मोक्षप्राप्तींतच व्हावयाचा हा सिद्धान्त आहे. हातून कर्म घडल नाहीं तरी त्या कर्माचें स्मरण करून देणारे मन्त्र रोज म्हटले तरी त्या कर्माचें फल मिळाल्यावांचून राहत नाहीं—म्हणूनच ऋषींनीं " **तानेतान् यज्ञानहरहः कुर्वीत**" या वाक्यांत पञ्चमहायज्ञ जे रोज करावेत असें सांगितलें आहे त्यांत महत्त्वाचा जो ब्रह्मयज्ञ त्यांत **स्वाध्यायपठण हें** अत्यंत

महत्त्वाचें सांगितलें आहे. या ब्रह्मयज्ञाचें महत्त्व पूर्वी ऋषींना किती वाटत असें हें पुढील श्रुतिवचनावरून लक्षांत येईल—

"**तस्मात्स्वाध्यायोऽध्येतव्यो यं यं क्रतुमधीते तेन तेनास्येष्टं भवत्यग्नेर्वायोरादित्यस्य सायुज्यं गच्छति तदेषाभ्युक्ता**"—इति।

या श्रौत वचनांत ब्रह्मयज्ञाची नुसतीच स्तुति केली आहे असें समजणें चूक ठरेल. सत्यसन्धान ब्रह्मविद्वरिष्ठ ऋषि ज्या वेळीं एखादी गोष्ट करावी म्हणून तिचें वर्णन करतात त्यावेळीं त्यांत फार मोठा निगूढ असा वैज्ञानिक कार्यकारण भाव असतो याची ओळख आज आपणांस होत नाहीं हें वेगळें. याच ब्रह्मयज्ञाच्या बाबतींत सायणाचार्यांनीं पुढें असें सांगितलें आहे कीं—

"**यो हि निरन्तरं स्वाध्यायं पठति तस्य अनृतवदने कः प्रसङ्गः?**

एवढेंच नव्हे तर ते पुढें असें म्हणतात कीं—

**तपोप्यत्रार्थ सिद्धं निषिद्धविषयप्रवणानामिन्द्रियाणां बलक्षयद्वारेण उद्धतत्वं वारयितुं कृच्छ्रचान्द्रायणादिना शरीरशोषरूपं तपः क्रियते । स्वाध्यायपरस्यतु विषयमात्राचिन्तैवनास्ति कुतो दुष्टविषयेषु प्रवृत्तिः?**

याचा आशय स्पष्ट आहे; कृच्छ्रचान्द्रायणादि दुर्घट अशी तपश्चर्या रोज ब्रह्मयज्ञ जे करतात त्यांना करावी लागत नाहीं, कारण तपाचे उद्दिष्ट तरी अखेरपक्षीं बहिर्मुख इन्द्रियांना अन्तर्मुख करणें हेंच कीं नाहीं? तें उद्दिष्ट अनायासेन ब्रह्मयज्ञाच्या निमित्तानें केल्या जाणाऱ्या स्वाध्याय पठनानें सिद्ध होतें. हेंच वरील उध्दृतवचनाचें तात्पर्य आहे. हें सांगतांना मानसशास्त्राचा एक मोठा सिद्धान्तच सायणाचार्यांनीं आपल्यासमोर मांडला आहे.

मनावर ज्या विचारांचे संस्कार दृढ होतात तेच विचार पुढें कृतिरूपानें साकार होतात हें महत्त्वाचें तत्त्व ध्यानांत ठेवूनच आपल्या दैनंदिनींत रुद्र व तत्सदृश सूक्तांची मोठ्या दूरदर्शीपणानें सांगड घातली आहे.—"**यज्जाग्रतो दूरमदैति दैवं तदुसुप्तस्य तथैवैति**" या शिवसंकल्प सूक्तांत तर मनाचें वस्तुनिष्ठ व हृदयङ्गम असें सुंदर वर्णन केलें आहे. चिदाकाशांत विचारांचे जे सूक्ष्म व तरल स्पन्द निर्माण होतात त्यांचा परिणाम अनन्तावकाशांत व तद्वारा संपूर्ण विश्वब्रह्माण्डांत काय काय होतात याचें प्रायोगिक

व अनुभवसिद्ध असें ज्ञान झाल्यानंतरच वरीलप्रमाणें सिद्धान्त शिवसंकल्प सूक्तांत ऋषींनीं प्रगट केला आहे.

आपल्या मनांत निर्माण होणारे विचार ही केवढी प्रचण्ड शक्ति आहे याचा साक्षात्कार झाल्यामुळेंच आपल्या ऋषींना विचारावर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता वाटत असे. नुसत्या कृतिशून्य अशा विचारानेंहीं एक मनुष्य केवळ स्वतःचेंच नव्हे तर साऱ्या जगाचेंही किती नुकसान करूं शकतो याचीं हवी तेवढीं उदाहरणें आपल्या आर्षवाङ्मयांत जागजागीं सांपडतील. विचारांची ही प्रचण्ड शक्ति ध्यानांत घेऊनच आपल्या जीवनांत प्रत्येक महत्त्वाच्या प्रसंगीं ब्राह्ममुहूर्त, स्नान, भोजन, शयन इत्यादि प्रसङ्गीं विचारांना उदात्तस्तरावर नेणारीं प्रातःस्मरण, पुरुषसूक्त भृगुवल्ली, त्रिसुपर्ण, श्रीसूक्त, प्रभृति, दिव्य-भव्योदात्त विचारानीं युक्त अशीं सूक्तें म्हणावयास सांगितलें आहे.

व्यक्ति ही समष्टीशीं सबंद्ध आहे याची जाणीव आपल्यापेक्षां पूर्वजांना अधिक होती असें या सूक्तांकडे पाहिल्यास वाटतें, त्यांत अश्रद्ध मनाला जरी तें चमत्कारिक वाटलें तरी सत्याची ओळख करून घेण्यास आपण केव्हांही कचरतां कामा नये.

विश्वब्रह्माण्डांतील अनन्तावकाशांत अनंत सूक्ष्म शक्तींचे वास्तव्य आहे; या सर्व शक्तींवर आपला ताबा प्रस्थापित करून त्यांना स्व-परकल्याणासाठीं उपयोग करून घेतां यावा यासाठींच पतञ्जलीनें आपल्या योगसूत्रांत अनेक 'संयम' सांगितले आहेत. ध्यान, धारणा, आणि समाधि या तीन प्रक्रियांमुळें 'संयम' करण्याची पात्रता निर्माण होते; योगसूत्रांतील हा 'संयम' शब्द उपरोक्त तीन मानसिक प्रक्रियांचा बोधक म्हणूनच आला आहे. "भुवनज्ञानं सूर्ये चन्द्रे ताराव्यूहज्ञानं, ध्रुवे तद्गतिज्ञानं" इत्यादि सूत्रांतून हे संयम व तद्द्वारा प्राप्त होणाऱ्या शक्ती पतञ्जलीनें योगसूत्रांत सांगितलेल्या आहेत. ही संयमाने प्राप्त होणारी जी शक्ति तिचें मूळ विचारामधें असणाऱ्या शक्तींत आहे, हें हजारोंवर्षांपूर्वीं आपल्या ऋषींनीं ओळखलें होतें. मानवी जीवनांतील सर्वङ्कष अभ्युन्नतीचा पाया वैचारिक संतुलनावरच अवलंबून आहे म्हणूनच वाईट कृतीपेक्षां वाईट विचार हे अधिक भयानक मानले गेले आहेत. कृति क्षणिक असते तर विचारांनी होणारे संस्कार हे जन्मोजन्मीं

आपला पिच्छा सोडीत नाहींत. मनांत नेहमीं शुभ विचारच यावेत, अशुभाचा स्वप्नांतही विटाळ होऊं नये यासाठीं वैखरी वाणींतूनही अपशब्द उच्चारला जाऊं नये म्हणून आपण काळजी घेत असूं. वाणीचें पावित्र्य अपशब्दानें दूषित होतें; दुर्योधनाला धर्मराजा सुयोधन या नांवानेंच जें संबोधित असें त्यांतील आशयहि हाच होता. भगवद्गीतेमधें त्रिविध तपाचा जो निर्देश केला आहे त्यांत वाङ्मयतपाचा उल्लेख सर्वाधिक महत्त्वाचा यामुळेंच मानला गेला आहे. हें वाङ्मयतप निरन्तर ब्रह्मयज्ञ करणाऱ्याला स्वाध्यायद्वारा होत असल्यानें त्याची बहिर्मुख इन्द्रियप्रवृत्ति हळू हळू अंतर्मुख होते व तद्वारा ' प्रवाही मन ' स्थिर करण्याची अभ्दुत किमया त्याला साध्य होते; ही अभ्दुत किमया एकदां साध्य झाली कीं त्यायोगें विश्वब्रह्माण्डांतील सूक्ष्म व अनंत शक्तींवर त्याचा ताबा आलाच म्हणून समजावें. या दृष्टीनेंच आपल्या दिनचर्येंत ब्रह्मयज्ञाची योजना आपल्या ऋषींनी जी केली ती किती दूरदर्शीपणानें केली हें वरील विवेचनावरून सामान्यतः लक्षांत येईल. हें सर्व विवेचन करण्याचा उद्देश असा कीं ही महत्त्वाची पार्श्वभूमी जर आपल्या लक्षांत नसेल तर रुद्रसूक्ताचें जें अपरंपार महत्त्व ऋषींनीं वर्णन केलें त्याचें खरें रहस्यही आपणांस आकलन होणार नाहीं. हें रहस्य न ओळखल्यामुळेंच आज मन्त्र म्हटले तरी त्यांतील सुप्तशक्तींचा आपणांस साक्षात्कार होत नाहीं. कारण उघडच आहे; नुसत्या वैखरीनें जे मन्त्र म्हटले जातात त्या मन्त्रांतील अर्थाचा मनावर जर संस्कार उमटत नसेल ते मन्त्र म्हणूनही फलाच्या दृष्टीनें न म्हटल्यासारखेच असतात. रुद्रसूक्ताच्या बाबतींतही हेंच नेमकें घडून येतें.

रुद्रसूक्तांतील विचार हे व्यापक स्वरूपाचे आहेत. त्या विचारांशीं जों जों समरस व्हावें तों तों आपणही न कळत व्यापक बनत चालल्याची एक आगळीच संवेदना आपणांस जाणवूं लागते या संवेदनेचा किंचित्सा स्पर्शही ब्रह्मानन्द सहोदर आनंदाची थोडीशी चुणूक दाखविण्यास पुरेसा असतो.

रुद्रसूक्तांतील विचारांची ही भव्यता व सामर्थ्य जाणूनच अनेक ऋषींनीं रुद्राचें असाधारण महत्त्व वर्णन केलें आहे; त्या सर्वांचा नामनिर्देश येथें करणें हें अर्थातच शक्य नाहीं, तरी पण वाचकांना थोडीशी कल्पना यावी यासाठीं कांहींचा थोडक्यांत पुढें निर्देश करीत आहे.—

**आपस्तम्बः—** " यस्यरुद्रः प्रजां पशून्वाऽभिमन्येतोदङ् परेत्य रुद्राञ्जपंश्चरेदित्ययज्ञसंयुक्तः कल्पः "

**शङ्खः—** " रहसि कृतानां महापातकानामपि शतरुद्रीयं प्रायश्चित्तम् "

**याज्ञवल्क्यः—** सुरापः स्वर्णहारी च रुद्रजापीजले स्थितः ।
सहस्रशीर्षाजापी च मुच्यते सर्वकिल्बिषैः ॥
वेदमेकगुणं जप्त्वा तदन्हैव विशुध्यति ।
रुद्रैकादशिनीं जप्त्वा तदन्हैव विशुध्यति ॥

**अत्रि व आङ्गिरसः—** एकादशगुणान्वाऽपिरुद्रानावृत्यधर्मवित् ।
महापापैरपि स्पृष्टो मुच्यते नात्रसंशयः ॥

याशिवाय वायुपुराण, कूर्मपुराण, लिङ्गपुराण, हरिवंश महाभारत, आश्वलायनगृह्यसूत्र, बौधायनगृह्यसूत्र, आगमग्रंथ इत्यादि ग्रंथांतून रुद्रासंबंधी अत्यन्त उद्बोधक असें वर्णन आलें आहे. शतशाखांचा विस्तार असलेल्या यजुर्वेदाचें सारभूत असें हें रुद्रसूक्त मानण्यांत आल्यामुळें उपनिषदांतही या रुद्रासंबन्धी बरेंच वर्णन आलें आहे.

## रुद्र हें उपासनेचें अंग

कल्पसूत्रकारांनीं रुद्रसूक्त हें यज्ञाचें अङ्ग म्हणून सांगितलें तसच उपनिषत्कारांनीं रुद्रसूक्त हें उपासनेचेंही महत्त्वाचें अङ्ग म्हणून रुद्राचा प्रामुख्यानें निर्देश केलेला आहे; कैवल्योपनिषद्, जाबालोपनिषद्, रुद्रोपनिषद् वगैरे उपनिषदांतून या संबंधीचें विवेचन वाचकांना पहावयास सांपडेल. प्रथम यज्ञांत विनियुक्त झालेलें हें रुद्रसूक्त पुढें ज्ञानमार्गांतही अत्यंत उपकारक ठरलें; " अत्याश्रमी जपेत् " असें मुद्दाम या रुद्राच्या बाबतींत सांगितलें आहे. कर्ममार्ग आणि ज्ञानमार्ग या दोनही मार्गांत सारखेंच उपयुक्त ठरणारें हें रुद्रसूक्त म्हणूनच एकजात सर्वांच्या प्रशंसेस पात्र ठरलें आहे.

रुद्राचा कर्मपर अर्थ सायणाचार्यांनीं आपल्या रुद्रभाष्यांत विस्तारानें सांगितला असला तरी तो शेवटीं सूक्ष्म म्हणूनच आपाततः न समजणाऱ्या ज्ञानमार्गालाच उपकारक ठरणारा आहे. कर्म हें परंपरेनें चित्तशुद्धिद्वारा ज्ञानाचेंच एक प्राथमिक साधन आहे. या दुसऱ्या सूक्ष्म अशा ज्ञानपर अर्थाचे दृष्टीनेंच उपनिषदांतून रुद्राचें वर्णन करण्यांत आलें आहे.

## रुद्राचा ज्ञानपर अर्थ

कोणत्या मन्त्राचा जप केला असतां अमृतत्वाची प्राप्ति होऊं शकेल ? असा प्रश्न विचारला गेल्यावर 'शतरुद्रीयेण' असें या प्रश्नाला जाबालोपनिषदांत उत्तर दिलें आहे. रुद्रसूक्तांत आलेलीं ईश्वराचीं शतसंख्य नांवें त्याचें सर्वव्यापक स्वरूप व्यक्त करण्यास समर्थ आहेत. अक्षय्य, अजर, अमर व शाश्वत अशा परमात्म स्वरूपाची ओळख ज्या नांवानीं होते त्यालाच शतरुद्रीय अशी संज्ञा आहे; एकदां या परमात्म्याच्या मृत्युञ्जय स्वरूपाची ओळख पटली कीं अमृतत्वाची प्राप्ति झालीच. असा जाबालोपनिषदांतील प्रश्नोत्तराचा थोडक्यांत आशय आहे.

## एक प्रशांत सर्व भौतिक विज्ञान !

वरील प्रश्नोत्तरांचा अर्थ वरवर पाहतां उघड व सोपा वाटला तरी तत्वतः त्यांत फार मोठा गंभीर आशय आहे हें लक्षांत घेतलें पाहिजे. प्रश्न मोठ्या खुबीनें विचारला गेला आहे अशा खुबीनें विचारलेल्या प्रश्नाला उत्तरही तसेंच मार्मिक दिलें गेलें आहे. कठोपनिषदांत नचिकेत्यानें यमराजाकडून वर मागून घेतांना जें लोकोत्तर प्रज्ञाशालित्व प्रगट केलें व वराच्या रूपानें यमाकडून देवांनाही दुर्लभतर असें ज्ञान मिळवलें, त्याप्रमाणेंच येथें जाबालोपनिषदांतही प्रश्न विचारणाऱ्या ऋषींनीं आपली क्रांतिदर्शी प्रज्ञा प्रगट केली आहे. प्रश्न विचारला तो "अमृतत्वाची प्राप्ति कशानें होईल ?" असा आहे. या एका प्रश्नांत सर्व भौतिक विज्ञानाचें स्वरूप व त्याची अशाश्वता सूचित केली आहे.

## ऋषींच्या मनावर आगंतुक द्वंद्वांचा परिणाम होत नाहीं.

**"परिणाम तापसंस्कार दुःखैर्गुणवृत्तिविरोधाच्च दुःखमेव सर्वं विवेकिनः"**

या सूत्रांत सकल भोग्य पदार्थजातासंबंधीं विवेकी लोकांना खरोखरी काय वाटतें याचें मार्मिक दिग्दर्शन पतञ्जलीनें केलें आहे. विषयोपभोगांत प्राप्त होणारा आनंद हा विषयजन्य असल्यामुळेंच एक तर तो विषयपरतन्त्र व दुसरें म्हणजे तो आनंद त्या विषयाबरोबरच नाहींसा होणारा. पूर्वसंस्कारांमुळें असा विषयोपभोगजन्य आनंद प्रथम बरा वाटला तरी

तो खरा आनंद नव्हेच उलट त्याचा आभास मात्र होय. अप्रगत व प्राथमिक अशा अवस्थेंत मनाची जरी बाह्य विषयांकडे ओढ असली तरी पुढें पुढें जसजसें मन अधिकाधिक उत्क्रान्त होत जातें तसतसें क्षणोक्षणीं उत्पन्न होऊन नष्ट होणाऱ्या या विषयजन्य आनंदापासून मन पराङ्मुख होतें. आनंद हा स्वरूपगत असा परमात्म्याचा स्थायी धर्म आहे, त्याचेंच थोडेफार प्रतिबिंब अनात्मभूत पदार्थांमधें आपणांस दिसतें, प्रतिबिम्बालाच बिंब समजण्याची चूक मनाकडून पूर्व संस्कारांमुळें होतें, अशी चूक तपस्वी ऋषींकडून कशी होईल ? त्यांना सुख-दुःखादिधर्म हे आगमापायी म्हणजेच अनित्य आहेत हें अनुभवानें कळलेलें असतें म्हणूनच ते सुख-दुःख, लाभालाभ, जयापजय इत्यादि द्वन्द्वांतही अविचल असें राहूं शकतात. त्यांच्या मनावर या आगंतुक द्वन्द्वांचा कांहीही परिणाम होत नाहीं. अशी तपःसामर्थ्यसम्पन्न व स्थितप्रज्ञ लोकांच्या दृष्टीनें विषयांपासून निर्माण होणारा आनंद हा बालिश आनंदच होय, मुग्ध शैशवावस्थेंत कचकड्याच्या निर्जीव बाहुलीपासून होणारा आनंद त्या शैशवावस्थेबरोबरच नाहींसा होतो यौवनांत पदार्पण केल्यावर त्याला कचकड्याची निर्जीव बाहुली चालत नाहीं. बाहुलीची जागा एखाद्या नीलोत्पल पत्रायताक्षी हरिणाक्षीनें घेतलेली असते, बाळपणींच्या मुग्ध व निरागस क्रीडा संपलेल्या असतात आणि त्याऐवजी दुसऱ्याच कामिनीबरोबर प्रणयक्रीडा सुरू होतात. यौवनावस्थेबरोबरच याही कांही काळ धुंद करणाऱ्या प्रणयमत्त क्रीडा संपुष्टांत येतात. शिवापराधक्षमापन स्तोत्रांत शंकराचार्यांनीं मानवी जीवनांतील आनंदाचे हे क्षणभङ्गुर टप्पे पुढील प्रमाणें सांगितले आहेत.

" प्रौढोऽहं यौवनस्थो विषयविषधरः पञ्चभिर्मर्मसंधौ
दष्टोनष्टो विवेकः सुतधनयुवतिस्वादसौख्ये निषण्णः"

अशा अवस्थेंत तारुण्याचा काल निघून गेला म्हणजे पुढें क्रमप्राप्त वार्धक्य सुरू होतें त्यांतही—

वार्धक्येचेन्द्रियाणां विगतगतिमतिश्चाधिदैवादितापैः
पापैरोगैर्वियोगैस्त्वनवासितवपुः प्रौढिहीनं च दीनम् ।
मिथ्यामोहाभिलाषैर्भ्रमति मम मनः—

## आनंदाची कक्षा

अशी मोठी करुणास्पद अवस्था निर्माण होते. उपनिषदांतून एकापेक्षां एक अशा उच्चस्तरीय आनंदाचे ऋषींनीं जें वर्णन केलें आहे तें अनुभवगोचर म्हणूनच विवेकी लोकांना तें प्रत्ययकारी असें वाटतें. तेव्हां अपणांस वाटणाऱ्या आनंदाची, कक्षा व स्तर कोणता आहे व तो कां आहे हें सामांन्य माणसांना कळत नाहीं म्हणून त्यांच्या विषयगामी स्थूल प्रवृत्तींचें क्षेत्र प्रथम प्रथम जरी शुभककर्मांपुरतेंच निर्माण करतां आलें तरी त्यांच्या उत्क्रान्तीला सुरवात करून दिल्यासारखें होतें; कर्म विपाकाच्या अबाधित सिद्धान्तानुसार चाललेल्या जगराहटींत लोककल्याणाचा हाच एक अधिक सुलभ असा मार्ग आहे. यासाठींच उपनिषदांतही कर्माचें प्राशस्त्य ऋषींनीं सांगितलें आहे; कर्मयोगानें हळूहळू होणाऱ्या आत्मविकासाला योगसंप्रदायांत पिपीलिकामार्ग असें म्हणतात. जे या मार्गावरून पूर्वींच गेले आहेत त्यांना विहङ्गममार्गानें ही इष्टसिद्धि करून घेतां येतें. आपण कोणत्या मार्गावरून प्रवास करण्याचे अधिकारी आहोंत हें ज्याचें त्यानें एखाद्या अधिकारी पुरुषाच्या मदतीनें ठरवावें व तदनुसार त्या त्या मार्गावरून यात्रारंभ करावा. तसा तो केला तर तो निश्चितच विफल होऊं नये. परंतु असें सहसा घडत नाहीं.

जाबालोपनिषदांत ज्या ऋषींनीं प्रश्न विचारला त्यांची आनंदाची कक्षा फारच उन्नत होती, दृश्य आणि भोग्य पदार्थजातांतून प्राप्त होणाऱ्या आनंदाभासाच्या पलीकडील ती कक्षा होती. या कक्षेवरून ऋषींनीं जो प्रश्न केला त्याचें खरें मर्म त्या कक्षेच्या ऐलतीरावरच वावरणाऱ्या सामान्यांच्या लक्षांत कसें यावें ? म्हणून ऋषींनीं विचारलेल्या प्रश्नासंबन्धीं त्या प्रश्नाची बाजू किती गंभीर व व्यापक आहे याची पुसटशी तोंडओळख तरी वाचकांना व्हावी याकरितां हें थोडेसें विवेचन येथें करणें भाग पडलें.

## अविनाशी मृत्यूचें सौंदर्य !

या जाबालोपनिषदांतील प्रश्नाच्या अनुषंगानें 'मृत्यु' म्हणजे काय याचीही थोडी कल्पना आपणांस असावयास हवी तरच मृत्यूच्या पलीकडे असणाऱ्या अमृतत्वाचीच ऋषींनीं कां अपेक्षा केली याचेंही रहस्य कळेल. मृत्यूसंबन्धीं

उपलब्ध जागतिक तत्वज्ञानविषयक ग्रंथांत ज्या ज्या कल्पना वा विचार प्रदर्शित केले गेले आहेत त्या सर्वांपेक्षां आपल्या साक्षात्कृतधर्माण ऋषींची कल्पना ही अधिक वास्तव व अधिक निर्भय बनविणारी आहे. चराचर सृष्टींत भीतीचें प्रधानतम व अंतिम असें एकमेव कारण मृत्यूच मानण्यांत आलेलें आहे; जोपर्यंत हें भीतीचें हें कारण बीजरूपानें कां होईना पण आपल्या मनोभूमिकेंत ठाण मांडून राहील तोपर्यंत आत्म्याची अभ्युन्नतीं होणार नाहीं. प्रसिद्ध योगिराज चांगदेव यांचें याबाबत उदाहरण डोळ्यांसमोर येण्यासारखें आहे; चौदाशें चौदा वर्षें एकसारखी कालावर 'मात' करणाऱ्या या योगिपुङ्गवाला अखेरपर्यंत मृत्यूला कांहीं ओळखतां आलें नाहीं. त्याची वास्तव ओळख त्याला मुक्ताबाईकडूनच शेवटीं करून घ्यावी लागली. ती झाल्यावरच त्याचा पुढील मार्ग मोकळा झाला. इतरांच्या दृष्टीनें मृत्यू हा भयप्रद व भीषण असला तरी भारतीय तत्वज्ञानानें या मृत्यूलाही एक मनोहारी स्वरूप देऊन त्यांत मनोज्ञ व हृदयङ्गम असें अविनाशी सौंदर्य निर्माण केलें आहे, मृत्यूच्या कमलांतूनच जीवनाचा सौरभ दरवळत असला तरी तें अमरत्वाच्या नालदण्डावर विकसित झालें आहे याची जाणीव ऋषींच्या क्रान्तिदर्शी कविप्रतिभेला केव्हांच झाली होती. विश्वाच्या उगमापलीकडे जाऊन हें रहस्य आपल्या ऋषींनीं हस्तगत केलें आहे. असंख्य लोकांच्या दिव्य तरी पण दाहक अशा तपश्चर्येची अखण्ड परम्परा त्यासाठीं भारतांत निर्माण झाली. या दिव्य तपश्चर्येच्या जोरावरच त्यांनीं विश्वब्रह्माण्डांतील अणु-रेणूंचाही अक्षय्य असा कार्य-कारण भाव ओळखला होता. सामान्य माणसाला होणारें ज्ञान हें अनुलोम पद्धतीनें म्हणजे कारणावरून कार्याचें ज्ञान असें होतें तर या उलट अतीन्द्रिय प्रज्ञ लोकांना प्रतिलोम पद्धतीनें म्हणजे कार्यावरून कारणाचें ज्ञान होतें, या दोन पद्धतीनें होणाऱ्या ज्ञानांतहि फार मोठा फरक आहे. परमात्म्यानें आपल्यासमोर टाकलेल्या विश्वाचें रहस्यात्मक कोड्याचा उलगडा करण्याच्या दृढ निश्चयानें बद्धपरिकर होऊन या दृश्य जगताचें मूळ व सुप्त कारण ध्यानावस्थिततद्गतेन मनसा ऋषींनीं शोधून काढलें. हें शोधून काढतांना त्यांना जें या भासमान विश्वब्रह्माण्डाचें यथार्थ आकलन झालें त्याववरूनच त्यांना खऱ्या परमात्म स्वरूपाची ओळख झाली.

कोणताही पदार्थ वर्तमानकाळांत असेल व त्या पदार्थाशीं आपला इन्द्रियसान्निकर्ष होईल तरच त्याचें ज्ञान तेंही त्या पदार्थगत मूलद्रव्याचें नव्हे तर केवळ बाह्य आकाराचेंच काय तें आपणांस होऊं शकतें. तो पदार्थ पूर्वीं कुठें होता व भावी काळांत त्याचें काय होणार ?याची आपणांस सुतरां कल्पना नसते. या उलट योग्याचें असतें. तो त्या पदार्थाच्या तीनही कालांतील अवस्था सम्यक्रीतीनें जाणूं शकतो; हें तो कसें जाणतो याविषयीं पतञ्जलीनें आपल्या योगसूत्रांत " परिणामत्रयसंयमादतीतानागतज्ञानम्" असें सांगितलें आहे. अशा रीतीनें प्रत्येक पदार्थाच्या तीन अवस्था त्याला कळत असल्यानें तो प्रत्येक पदार्थाचें भविष्य अचूक ओळखूं शकतो. उत्पत्ति, स्थिति आणि लय या तीन अवस्थांहून चवथी अवस्था किंवा धर्म कोणत्याही पदार्थाला असूं शकत नाहीं हा विज्ञानाचा सिद्धान्त आहे एखाद्या पदार्थाचे वर्तमानकालीन धर्म अतीतकालांत गेले कीं त्या पदार्थाचें बाह्य स्वरूप बदलतें व त्या पदार्थावर अनागतकालीन धर्मांचा हळूहळू प्रादुर्भाव होऊं लागतो. असा नवीन धर्मांचा प्रादुर्भाव त्या पदार्थावर झाला कीं आपण तो पदार्थ पूर्वींपेक्षां वेगळा आहे असें म्हणतो परंतु वस्तुतः तो वेगळेपणा त्या पदार्थावर होणाऱ्या अतीतानागतकालांतील धर्मांच्या प्रादुर्भाव-तिरोभावामुळेंच खरोखरी असतो; त्यामुळें एखादी वस्तु अगर व्यक्ति दिसते तशीच आपण ओळखतों अगर तर योगी ती व्यक्ति वा वस्तु जशी असेल तशीच ओळखतो, यासाठीं अशा योग्यांना कोणीही फसवूं शकत नाहीं. तेव्हां मृत्यु म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नसून तें एक आगन्तुक धर्मांच्या प्रादुर्भाव-तिरोभावामुळें घडून येणारें केवळ बाह्य रूपान्तर होय. शरीरावरचे कपडे बदलते म्हणून जसें शरीर बदलत नाहीं, तसेंच शरीर बदललें म्हणून त्या शरीरांत राहणारा आत्मा बदलत नाहीं. बाहेरून आल्यावर कार्य संपलें म्हणून कपडे शरीरावरून काढून जितक्या सहजतेनें आपण बाजूला टेवतों तितक्याच सहजतेनें योगी एका देहाचें कार्य संपलें कीं तो देह टाकून मोकळा होतो. पुनः नवीन देह नव्या उमेदीनें धारण करून सञ्चितांतील राहिलेलें कर्म भोगण्यासाठीं तो तयार होतो. योग्याला तर चालू देह केव्हां पडणार आहे याचेंहीं आगाऊच ज्ञान होतें तें मृत्यु म्हणजे रूपान्तर असल्यामुळेंच होय. योग्याला हें

देहपतनाचें ज्ञान कसें होतें हें "सोपक्रमं निरुपक्रमं कर्म तत्संयमादपरान्त ज्ञानमरिष्टेभ्यो वा"। या पातञ्जल सूत्रांत सांगितलें आहे.

## सोपक्रम कर्म व निरूपक्रम कर्म

सोपक्रम कर्म म्हणजे फलोन्मुख कर्म व निरूपक्रम कम म्हणजे सञ्चितावस्थेंत असलेलें अद्यापि फलोन्मुख न झालेलें कर्म, अशा या उभयविध कर्मांवर 'संयम' करून योग्यांना आपल्या अपरान्ताचे म्हणजे मृत्यूचें ज्ञान होतें, मृत्यु ही भयप्रद अशी घटना नसून उलट ती एक स्वागतार्ह अशीच घटना आहे. जर हा अनाथांचा नाथ, दीनांचा कनवाळू, करुणासागर असा मृत्यू नसता तर या जगाची काय अवस्था झाली असती याची नुसती कल्पनाही अंगावर शहारे आणणारी आहे. मृत्यूंतूनच विश्वांतील चराचरांचें सौंदर्य साकार झालें आहे म्हणून आम्ही मृत्यूचें स्वागतच नेहमीं करीत आलों आहोत. तेव्हां आतांपर्यंतच्या विवेचनावरून वाचकांच्या ध्यानांत आवश्यक तेवढें मृत्यूचें वास्तव स्वरूप आलेंच असेल. ही वास्तव कल्पना लक्षांत आली कीं जाबालोपनिषदांत विचारलेल्या प्रश्नाचें खरें मर्म ध्यानीं येईल, अशा या महत्त्वपूर्ण प्रश्नाला जें उत्तर दिलें गेलें तेंही तितकेंच सारगर्भ आहे हणून त्याचा आतां थोडा विचार करूं—

## अमृतत्व म्हणजे काय ?

'रुद्राचा जप कल्यान अमरत्वोंची प्राप्ति होते' या उत्तरांतील आशय आपण नीट समजाऊन घेतला पाहिजे. अमरत्व म्हणजे काय ? रुद्राचा जप केल्यानें त्याची कशी काय प्राप्ति होते ? जप करावा म्हणजे काय करावें ? जपाची प्रक्रिया कोणती ? इत्यादि याच्या अनुषङ्गानें निर्माण होणारे अनेक प्रश्न विचारणीय आहेत.

एखादी गोष्ट आत्मसात् करावयाची असेल तर त्याच एका गोष्टीचा सतत निदिध्यास असावा लागतो; ध्यानपूर्वक चिंतन म्हणजेच निदिध्यास. अशा निदिध्यासानें अशक्य तें शक्य होतें हा लौकिक व्यवहारांतही आपणांस अनुभव येतो. अवघड अशी तारेवरची कसरत किंवा अचूक लक्ष्यवेध या गोष्टी मनाच्या धारणेशिवाय शक्यच नाहींत; ज्या पदार्थावर आपली धारणा सिद्ध होईल त्याच पदार्थाचे गुणधर्म हळु हळु आपल्यामधें प्रादुर्भूत

होऊं लागतात. हा मनाचा एक विलक्षण धर्म किंवा गुण म्हणा पण आहे. म्हणून 'मन' हें कितीही चञ्चल किंवा ओढाळ असलें तरी युक्तीनें जबरदस्तीनें नव्हे, त्याला वश करून अनुकूल केल्याशिवाय तरणोपाय नाहीं. शनैः शनेरुपरमेत् असें याबाबतींत साधकांचे धोरण असेल तर कालान्तरानें त्यांना मनाची अनुकूलता प्राप्त करून घेतां येईल. पतञ्जलीच्या अष्टाङ्ग राजयोगांत धारणा, ध्यान, आणि समाधि ही तीन महत्त्वाचीं व अन्तरङ्ग साधनें सांगितलीं आहेत, हीं अन्तरङ्ग साधनें सिद्ध होण्यासाठींच यम-नियमांची साधना प्राथमिक अवस्थेंत अपरिहार्य मानली गेली आहे. जपासंबन्धीं पूर्वी थोडेसें विवेचन येऊन गेलेंच आहे;

## ध्यानाचा प्रांत केव्हां सुरू होतो ?

वैदिक मन्त्र हे अर्थप्रधान मंत्र आहेत, त्यामुळें अशा अर्थप्रधान मंत्रांचा जप तदर्थ भावनेनें झाला तरच त्या त्या अर्थाची धारणा सिद्ध होते. धारणा सिद्ध आणि प्रगाढ होत गेली कीं ध्यानाचा प्रान्त सुरू होतो यासाठीं रुद्राचा जो जप करावयाचा तो रुद्र मंत्रांतील अर्थभावनेनें युक्त असाच करावयास हवा; तसा तो जप झाला कीं अमृतत्वाची प्राप्ति दूर नाहीं परंतु हें सारें करीत असतांना मन हें एकाग्र व स्थिर असावयास हवें. परमात्म्याच्या विराट् स्वरूपाशीं एकरूप होण्यासाठींच रुद्रांतील मंत्राचा अर्थ अगोदर कळला पाहिजे.

## नमक व चमक कां म्हणतात ?

रुद्राचे मुख्य दोन विभाग आहेत, एक नमक विभाग व दुसरा चमक विभाग. प्रत्येक विभागांत अकरा अनुवाक आहेत आणि प्रत्येक अनुवाकांत ( नमक विभागांतील ) दहा ते पंधराच्या दरम्यान असे मंत्र आहेत. नमक विभांतील मंत्रांपैकीं कांही मंत्र उभयतो नमस्कारात्मक म्हणजे मंत्राच्या प्रारंभीं व मंत्राच्या शेवटीं ' नमः ' असे शब्द असणारे तर कांही मंत्र अन्यतरतो नमस्कार म्हणजे केवळ मंत्राच्या आरंभींच ' नमः ' शब्द असणारे आहेत. या नमः शब्दाच्या प्रयोगामुळेंच या मंत्र समूहाला 'नमक' असें म्हणण्याचा प्रघात आहे. चमक विभागांत जे मंत्र आहेत त्यांत ' च मे ' या शब्दांचा वारंवार उपयोग केल्यामुळेंच या मंत्रसमूहाला

' चमक ' असें म्हणण्याचा रिवाज आहे. नमक आणि चमक मिळून रुद्राचा अध्याय तयार होतो.

चारही वेदांचा यज्ञांत विनियोग असल्यामुळें यजुर्वेदाचाही यज्ञकर्मांत विनियोग व्हावा हें उघडच आहे. किंबहुना इतर वेदांपेक्षां यजुर्वेद हा यज्ञीय कर्माशीं अधिक संबद्ध आहे. यज्ञांतील बारीक सारीक कोणतीही कृति यजुर्वेदांतील मंत्राशिवाय होत नाहीं; अशा यजनार्थक यजुर्वेदांत प्रस्तुत रुद्राध्याय आला आहे त्यामुळें या रुद्राचा विनियोगही यज्ञांतच प्रथम कसा केला गेला हें मागें सांगितलेंच आहे.

## अग्नीचें असाधारण महत्त्व कां ?

वेदकालांत अग्नि हीच प्रधान उपास्यदेवता होती त्यामुळें ऐहिक सुख-संपदा, ऐश्वर्य, समृद्धि वगैरे ज्या ज्या आवश्यक गोष्टी त्या सर्व अग्नि-नारायणापासूनच मिळतात अशी त्यावेळीं दृढ श्रद्धा होती. अशा या सर्वाभिलषित पूर्ण करूं शकणाऱ्या अग्निनारायणाला प्रसन्न करून घेण्यासाठीं मोठमोठे यज्ञ त्यावेळीं करण्यांत येत असत. ऋग्वेदाची सुरवातच मुळीं ' अग्निमीळे पुरोहितम् ' अशी आहे, या मंत्रांत अग्नि हा पुरोहित आहे असें सांगितलें आहे. केवळ ऐहिक कल्याणच नव्हे तर पारलौकिक कल्याणाचीही तो प्राप्ति करून देणारा आहे असें ' पुरोहित ' या शब्दानें सूचित केलें आहे म्हणूनच रुद्र शब्दाचा अर्थही अग्नि असाच केला आहे—' रुद्रो वा एष यदग्निः ' हा अग्नि म्हणजेच रुद्र होय. तेव्हां या अग्निस्वरूप रुद्राची साधना करतांना या अग्नीचीं विविध स्वरूपें कोणती आहेत याचेंही वर्णन रुद्रांत येणें अपरिहार्यच होय.

परमेश्वराच्या विविध स्वरूपाला रुद्रांत जो नमस्कार केला आहे तीं विविध स्वरूपें अग्नीमुळेंच निर्माण झाली आहेत. किंबहुना चराचर विश्वांतील आकृतिवैचित्र्य हेंच मुळीं अग्निजन्य आहे असा भौतिक विज्ञानवाद्यांनाही चकित करून सोडणारा सिद्धान्त हजारों वर्षांपूर्वी आर्ष प्रज्ञेतून प्रथम प्रगट झाला. ह्या ऋतम्भरा प्रज्ञेचीही अनंताकाशांत झेप घेणारी

विराट् भरारीच आपणांस रुद्रसूक्तांत पाहवयास सांपडते. ' अग्नि ' ही एक स्वतन्त्र अशी शक्ति आहे आणि या शक्तीच्या साहाय्यानेंच चराचराची जीवन-यात्रा सुरळीतपणें चालू आहे याची जाणीव वेदकालीन ऋर्षीना झाली होती. अशी जाणीव झाल्यामुळेंच वैदिक वाङ्मयांत अग्निवर्णनाची कितीतरी सूक्तें आलीं आहेत. या सूक्तांतील अर्थाकडे पाहतां भौतिक अणुविज्ञानाचे मूल-सिद्धान्त ऋर्षींना अपरिचित नव्हते असें दिसून येईल. अग्नि आहे म्हणूनच पदार्थांचे वाटेल तसें आपण रूपांतर करूं शकतों. खाल्लेलें अन्न अग्नि आहे म्हणूनच पाचकरसांत रूपांतरित होऊन रक्त बनतें. अग्नि नसता तर पर्जन्य कुठून पडला असतां ? आणि पर्जन्यच नाहीं तर अन्नधान्य कसें निर्माण झालें असतें ? अन्नधान्य नाहीं म्हणजे जीवसृष्टीचें सातत्यच संपुष्टांत आलें असतें. यासाठींच सर्वाधार असें जें अग्नितत्त्व त्याचीच आपण उपासना करीत असूं ; पूर्वीं ही उपासना यज्ञाच्या रूपानें होत असे, " यज्ञात्भवति-पर्जन्यः, " यज्ञ आणि पर्जन्य यांचा निकटतम असा कार्य– कारण भाव आहे तो केवळ श्रद्धेवरच अवलंबून नाहीं तर प्रमाणगम्य अशा विज्ञानावरही अवलंबून आहे. कालान्तरानें आपल्या जीवनाधार अशा यज्ञसंस्थेवर अनेकांची आक्रमणें झालीं,एकदां नव्हे अनेकदां. बाहेरून आक्रमणें सुरू झाल्या-वर आंतूनही त्याला साथ मिळत गेली.अनेक अवैदिक पंथीयांनीं या विध्वंसन कार्यांत मोठ्या हिरिरीनें व आत्मीयतेनें भाग घेतला या सर्वांचा थोडाफार परिणाम म्हणून यज्ञसंस्था उत्तरोत्तर शिथिल होत होत आज ती संपूर्णतया नष्ट होण्याच्या पंथास लागली आहे.त्यामुळें याचा दुसरा असा एक परिणाम होऊं लागला आहे कीं,मूळ वेदांतील मन्त्रांचा आज अर्थही आपणांस समजे-नासा झाला आहे. यज्ञप्रक्रियाच जिथें माहिती नाहीं तिथें त्या प्रक्रियेशीं संबद्ध अशा मन्त्रांचा तरी अर्थ कसा माहीत होणार ? अर्थ माहीत नसल्या-मुळेंच कसेतरी म्हटले जाणारे मन्त्र कशीतरी केली जाणारी क्रिया यांतून फलनिष्पत्ति न झाली तर त्यात नवल तें काय ? असें होऊं नये म्हणूनच पूर्वीं अर्थज्ञानासाठीं वेदाध्ययन करावें असा सक्त दण्डक घालण्यांत आला होता. " योऽर्थज्ञइत्सकलंभद्रमश्नुते " असें यास्काचार्यांनीं सुद्धां सांगितलें आहे, असो. आज मन्त्र म्हणून आपण कर्म करतों परंतु त्या कर्माचा आणि मन्त्राचा परस्पर विनियोग कोणत्या कारणानें झाला किंवा केला याचें

सुतरां ज्ञान नाहीं. अशा परिस्थितींत जें जें कर्मानुष्ठान केलें जातें त्याचा तादृश उपयोग न होणें स्वाभाविकच होय.

## वैदिकसूक्तांचा खरा आशय कां लक्षांत येत नाहीं ?

वैज्ञानिक समजल्या जाणाऱ्या कोणत्याहि जागतिक राष्ट्रांत आपल्या परंपरागत धार्मिक आचार-विचारांबद्दल जेवढें औदासिन्य आढळून येत नाहीं तेवढें आपल्या भारतांत एतद्विषयक औदासिन्य आढळून येतें. 'धर्म' ही सामाजिक जीवनांतच नव्हे तर व्यक्तिजीवनांतही आपणांस अडगळीची गोष्ट वाटूं लागली आहे. ज्या राष्ट्रानें धर्म टाकला त्याचा अभ्युदय झाल्याचा आजवरच्या इतिहासांत दाखला नाहीं. धर्म टाकून केवळ औद्योगिक पायावर राष्ट्राची धारणा करूं पाहणें हें नुसतेंच हास्यास्पद नाहीं तर तें आपल्या प्रज्ञाहीनतेचें, दौर्बल्याचें आणि परप्रत्ययनेयवृत्तीचें लक्षण आहे. सांगण्याचा आशय हा कीं, आपल्या उज्वल परंपरेबरोबरच ज्ञानाची परंपरा नाहींशी झाली त्यामुळें आपल्या वैदिक सूत्रांचा खरा आशय लक्षांत येत नाहीं.

## समाज धारणेला आवश्यक अशीं प्रतीकें.

रुद्रांतर्गत नमक विभागांतील ज्या मंत्रांनीं ज्यांना ज्यांना नमस्कार करावा असें सांगितलें तीं तीं सर्व प्रतीकें समाज धारणेला आवश्यकच अशीं आहेत. विश्वाच्या उत्पत्तीपासून जीं जीं 'द्वन्द्वें' निर्माण झालीं तीं सर्व विश्वाचें संतुलन राखण्यासाठीं अपरिहार्यच आहेत. सुख-दुःख, पाप-पुण्य, शिव-अशिव, मङ्गल-अमङ्गल, साधु-असाधु हीं द्वन्द्वें व्यापक अर्थानें जग-राहटीला उपयुक्त ठरलीं आहेत किंवा या द्वन्द्वांमुळेंच जगाची राहटी सुरळीत चालू आहे असें म्हणा. साव आला कीं चोर आपल्या डोळ्यांसमोर उभा राहतो आणि त्याच्या अपेक्षेनें आपण नकळत सावाचें मूल्यमापन करीत असतों; तुलना ही नेहमींच सापेक्ष असते. चांगली गोष्ट किती चांगली आहे हें शेवटीं आपण कशाच्या तरी तुलनेनेंच सांगत असतों. तात्पर्य या जगांतील प्रत्येक पदार्थ तद्विरुद्धकोटीच्या प्रतीकतुलनेनेंच ओळखला जातो. ज्याची कोणाबरोबरही तुलना करतां येत नाहीं असा तो एकच एक परमात्मा, तोच या साऱ्या दृश्य विश्वब्रह्माण्डाचें मूळ उपादान कारण; त्याच्यापासून सत्व,रज,तम हे त्रिगुण निर्माण झाले व या त्रिगुणांतूनच विश्व

दृश्य आकारभावास प्राप्त झालें. अर्थात् विश्वाच्या मूळ कारणांत सत्व-रज-तमांत परस्परविरुद्ध गुणधर्म—सत्वविरुद्ध रज, रजाविरुद्ध तम असे नांदत असल्यानें ' कारणगुणाः कार्येप्यवतरन्ति ' या न्यायानें दृश्य जगतांत द्वन्द्वें निर्माण झालीं. अशा या प्रत्येक द्वन्द्वांत परमात्मशक्तीच ओतप्रोत भरून राहिली आहे त्यासाठीं अमूर्त अशा परमात्मशक्तीला जो नमस्कार करावयाचा तो प्रतीकद्वाराच करणें शक्य आहे;मग तें प्रतीक चांगल्याचें असो किंवा वाईटाचें असो. पुनः प्रतीक चांगलें किंवा वाईट हें तरी आपण कशाच्या आधारावर ठरविणार ? हा प्रश्नच आहे. एखादी गोष्ट आपल्या दृष्टीनें चांगली किंवा वाईट ठरत असली तरी दुसऱ्या एखाद्याच्या दृष्टीनें ती तशीच ठरावी असें आपण कसें म्हणूं शकणार?आणि नेहमीं आपली दृष्टि ही बरोबरच असेल याची तरी ग्वाही काय? तेव्हां चराचरांतील यच्चयावत् पदार्थजाताला परमेश्वराचें प्रतीक मानून त्यांना नमस्कार केल्यानें तो शेवटीं परमात्म्यालाच केल्यासारखा होतो; म्हणूनच नमकांतील मन्त्रांत परस्परविरुद्ध प्रतीकांनाही नमस्कार करावा असें सांगितलें आहे त्याचेंही मर्म हेंच आहे. परमात्मा हा त्रिगुणांच्याही पलीकडे असला तरी तो त्रिगुणोद्भव विश्वांतील अणु-रेणूंतही आहे हेंच ' नमःसोभ्यायच ' या मंत्रांत सांगितलें आहे. सोभ्य हें परमेश्वराचें विशेषण आहे, या शब्दाचा सायणाचार्यांनीं आपल्या भाष्यांत पुढीलप्रमाणें अर्थ केला आहे, " उभाभ्यांपापपुण्याभ्यां सहवर्तत इति सोभो मनुष्यलोकः, अतएवाऽऽथर्वणिक आममन्ति— "पुण्येन पुण्यलोकं जयति पापेन पापमुभाभ्यामेव मनुष्यलोकम् " इति । तत्रभवः सोभ्यः । मनुष्यलोकांत निर्भेळ पुण्यही नाहीं तसेंच निर्भेळ पापही नाहीं तर पुण्य आणि पाप यांच्या मिश्रणानें हा मनुष्यलोक तयार होतो अशा पुण्य-पापाच्या द्वन्द्वांनें उत्पन्न झालेल्या मनुष्यलोकांतही त्या चिद्घनपरमात्म्याचें वास्तव्य आहे हें लक्षांत ठेवून मनुष्यानें आपले सर्व व्यवहार सन्मार्गानें करावेत. वाणीनें नेहमीं शुभच बोलावें, मनांत नेहमीं शुभसंकल्पाचेंच मनन चालू रहावें कारण आपण उच्चारलेला वाईट शब्द शेवटीं त्या त्या प्रतीकाला लागत नसून तदाधिष्ठित परमात्मशक्तीलाच तो लागतो ही शिकवण या मन्त्रानें आपणांस दिली आहे.

## परमात्म्याच्या विविध शक्ती व त्यांचें कार्य.

रुद्रांतील प्रत्येक मन्त्र, समाजधारणेसाठीं आपल्या चित्तांत सदैव सद्गुणांचीच जोपासना करा असाच जणूं आदेश देत आहे.

समाजाचें अनुशासन करण्यासाठीं आवश्यक ती गुणसम्पदा संपादन करण्याची प्रेरणा या रुद्रामुळेंच आपणांस मिळाली. जगाचा कारभार सुरळीत चालू रहावा यासाठीं परमात्माच्या विविध शक्ती या जगांत काम करीत असतात. दुष्टांचा निग्रह आणि सुष्टांचें पारिपालन हें त्यांचें मुख्य कार्य असतें. सन्मार्गानें जाण्यास जो प्रवृत्त झाला त्याला उत्तेजन देणें व त्याच्या मार्गातील विघ्नें दूर करून त्याला अधिकाधिक श्रेयःप्राप्ति व्हावी यासाठीं त्याला मार्गदर्शन करणें आणि दुष्टांना आपल्या कृतीबद्दल शासन भोगावयास लावून त्यांच्या अंतरांत पश्चात्ताप निर्माण करून हळू हळू त्यांना सन्मार्गगामी बनवणें वगैरे अनेक कार्यें परमेश्वराच्या आज्ञेवरून या विविध शक्तींना पार पाडावयाचीं असतात. या पारमेश्वरी शक्तींनाच ' गण' अशी संज्ञा आहे असे गण अनेक आहेत. उत्पति-स्थिति आणि लय या त्रिविध शक्तींच्या ज्या अधिष्ठात्री देवता विष्णु-ब्रह्मा-महेश यानांवानें प्रसिद्ध आहेत या देवतांचेही प्रत्येकीं भिन्न भिन्न असे गण आहेत. त्यांत शंकराचे गण हे आधिक प्रसिद्ध आहेत. या शंकराच्या प्रसिद्ध गणांना रुद्रांतर्गत नमकमन्त्रांत नमस्कार सांगितला आहे. नमकामध्यें रुद्राचे अवतार म्हणून कांहींचा उल्लेख आला आहे; हे अवतार ' उदार ' म्हणून प्रसिद्ध आहेत, यांची **किरिक, विक्षीणक, विचिन्वत्क, आनिर्हत** आणि **आमीवत्क** अशीं नांवें आहेत. या नांवा प्रमाणेंच तें स्वतःचें कार्य करणारे आहेत. किंबहुना त्या त्या कार्यानुरूप त्यांना त्या त्या संज्ञा प्राप्त झाल्या आहेत असें म्हटलें तरी चालेल. किरन्तिभक्तेभ्योधनानीति किरिकाः । भक्तांना यथेष्ट ऐश्वर्यप्रदान करणारे जे ते किरिक या नांवानें ओळखले जातात. विक्षीणक म्हणजे क्षीणेभ्यो विपरीताः, कदाचिदपिक्षयरहिताः, असा सायणाचार्यांनीं अर्थ केला आहे तर भट्टभास्काराचार्यांच्या मतानें अभक्तांना नानातऱ्हेचे उपद्रव देणारे असा अर्थ आहे. अशा तऱ्हेचे नाना उपद्रव-पीडा निर्माण करून अभक्तांना, भक्तीच्या मार्गावर आणून सोडणें यावांचून अभक्तांना तरी उपद्रव

देण्यामागील आशय कोणता असणार ? विचिन्वत्क, म्हणजे विचिन्वान्ति अपेक्षितमर्थं संपादयन्तीति विचिन्वत्काः, भक्तांना ज्या ज्या विषयाची अपेक्षा असेल ते ते विषय गोळा करून भक्तांना पुरविणें; अर्थातच यासाठीं खरे भक्त कोणते खोटे भक्त कोणते ? भक्त कोण अभक्त कोण ? यांचाही निर्णय लावणें क्रमप्राप्तच आलें.आनिर्हत म्हणजे आसमन्तान्निः शेषेण हतं-पापं यैस्त आनिर्हताः, भक्तांचे अशेष दुरित हरण करणारे ते आनिर्हत होत; तपश्चर्येनें अनेक जन्मार्जित दुष्कृतराशींचा नाश होतो, असा नाश करण्यास या आनिर्हतांचें साहाय्य भक्तांस होतें. आणि आमीवत्क शब्दाचा अर्थ पौष्कल्य म्हणजे अमर्याद प्राप्ति. परमात्मा प्रसन्न झाला कीं त्याच्या देण्याला सीमा रहात नाहीं; " अनंतहस्तें कमलावरानें देतां किती घेशिल दो करानें? " ही उक्ति या बाबतींत प्रसिद्धच आहे. येणेंप्रमाणें या किरिक प्रभृति शब्दांचा अर्थ ध्यानांत घेतला कीं परमेश्वराचें कार्य किती जागरूकपणें व निराबाध चालू आहे याची कल्पना येते. परमेश्वराचीं अनंत रूपें, अनंत आकार व अनंत कार्यें यांचा मानवांच्या पामरबुद्धीला अर्थ तो काय कळणार व त्याचें आकलन तरी कसें होणार ? 'यो बुद्धेः परतस्तु सः' अशा इन्द्रियें आणि बुद्धि यांच्याही पलीकडे असणाऱ्या 'सत्यं शिवं सुन्दरम्' अशा त्या महन्मङ्गलकरुणासागर प्रभूचें दर्शन होण्यासाठींच या विश्वांतील प्रत्येक अणु-रेणू आणि पदार्थ यांच्यामध्यें व्यापून राहिलेल्या त्या जगदात्मा जगदीशाला रुद्रांत नमस्कार करण्यास ऋषी आपणांस सांगत आहेत.

## अनेकांतून एकत्वाचीच प्रतीति.

हें सांगत असतांना आब्रह्मस्तम्ब पिपीलिकापर्यंत परमात्म्याचें सर्वान्तर्व्यापित्व कसें आहे हें विस्तारानें नमकांतील प्रत्येक अनुवाकामध्यें त्या त्या प्रतीकांनीं सूचित केलें आहे. ब्रह्माण्डाला पालाण घालून उरणारा जगाचा जगड्व्याळ विस्तार कितीही असला तरी त्याचें मूळ मात्र एकाच परमात्मशक्तींत आहे ही भावना रुद्र म्हणतांना उत्तरोत्तर अधिकाधिक दृढ होत जाते. या भावनेचे संस्कार मनाच्या आंतील कप्प्यांत, अप्रगट मनांत एकदां का बद्धमूल झाले कीं मग द्वैतभाव विलीन होतो. मी-तूंपणाच्या चञ्चल लाटा-चराचर आपण जाहल्याच्या व्यापक अस्मितेच्या महासागरांत शांत

होऊन जातात. जगाच्या दुःखानें दुःखी, सुखानें सुखी, आनंदानें आनंदी होण्याइतकें मीपणाच्या संवेदनेचें क्षेत्र सहजच रुंदावत जातें आणि आपो-आपच भेदाभेद, उच्चनीच, श्रेष्ठ-कनिष्ठ इत्यादि मानुषनिर्मित कल्पनांना तिला-ञ्जली मिळते. ऊंस डोंगा रस नोहे डोंगा, नदी डोंगी जल नोहे डोंगे, काय भुललासि वरालिया रङ्गा ? अशी अद्वैताची एक नवी ज्ञानदृष्टि प्राप्त होते. आपल्या चिदाकाशांत अशा ज्ञानदृष्टीची मङ्गल उषःप्रभा फाकूं लागली कीं त्या चिद्घन स्वरूप परमात्मशक्तीनें विलसत असलेल्या कर्पूर-गौर साम्बसदाशिवाचा साक्षात्कार दूर नाहीं. याप्रमाणें नमकाविभागांतील मन्त्रांनीं परमेश्वराच्या वास्तव स्वरूपाची ओळख करून दिल्यावर पुढें चमक विभागांत अशा परमेश्वराजवळ ' मागणें ' काय मागावें हें सांगि-तलें आहे. मीपणाला केन्द्रबिन्दु कल्पून त्याच्या परिघाभोंवतींच फिरणाऱ्या आपल्या आशा-आकांक्षा, परमेश्वराची वास्तव ओळख झाल्यावर शिल्लक रहात नाहींत. अंतरांत अद्वैतसूर्याची प्रखर दीप्ति जाणवूं लागली कीं मीपणाभोंवतींच घिरट्या घालणाऱ्या क्षुद्र अशा आकांक्षांच्या वटवाघळांनीं पळ काढावा हें सहजच नव्हे काय ? परमात्मस्वरूप चराचराशीं एकरूपता पावल्यावर मनुष्य काय मागूं शकतो याचें अद्वितीय व अनुपम असें उदा-हरण चमकांत पहावयास सांपडतें. चमकांत प्रार्थना करणाऱ्या ऋषींचा मीपणा हा व्यक्त जगाची मर्यादा भेदून अव्यक्तांत झेप घेणारा होता. लोक-लोकांतराशीं आत्मीयतेच्या हळुवार परंतु अभेद्य अशा बंधनानें ह्या मीपणांत एक आगळें व लोकोत्तर असें तेज संपुटित झालें होतें. ह्या दिव्य तेजाची आल्हादक प्रभाच चमकांतील अक्षरा-अक्षरांतून ओसंडत आहे.

## सामाजिक आकांक्षांचें यथार्थ दर्शन.

ज्या विषयांची अभिलाषा चमकांतील मन्त्रांत केली आहे त्या विषयां-वरून ओझरती नजर टाकली तर त्यांत तत्कालीन समाजाचें प्रतिबिंब दिसल्यावांचून राहणार नाहीं. तत्कालीन समाजाला कोणकोणत्या गोष्टी राष्ट्र-स्थैर्यासाठीं आवश्यक वाटत होत्या व त्या कां वाटत होत्या याचें मार्मिक दर्शन चमकांत आपणांस होतें. "अश्मा च मे मृत्तिकाश्च मे गिरयश्च मे" या पांचव्या चमकांत जे शब्द आले आहेत त्यावरून राष्ट्राच्या भौगोलिक मर्यादां-

विषयीं त्यावेळचा समाज वा समाजधुरीण किती जागरूक होते हें आपल्या लक्षांत येईल. ही जागरूकता होती म्हणूनच भारतासारख्या खण्डप्राय व विराट् राष्ट्रांत अनुशासन करण्याचें दुर्घट कौशल त्यांनीं प्राप्त करून घेतलें होतें; राष्ट्रीय ऐक्य हें मुख्यतः सांस्कृतिक ऐक्यावर अवलंबून आहे. यासाठीं सामाजिक मनावर असेच संस्कार त्या वेळीं निर्माण करण्यांत येत असत कीं आपोआपच या संस्कारांतून सर्वत्र राष्ट्रीय ऐक्याचा परिमल दरवळावा ! हें राष्ट्रीय ऐक्य पुढें जागतिक ऐक्यांत व त्यापुढेंही वैश्विक ऐक्यांत ज्या-वेळीं एकरूप होऊं लागतें त्यावेळींच हें राष्ट्रीय ऐक्य 'कृण्वन्तोविश्वमार्यम्' असें विश्वाकार होतें, याची जाणीव रुद्र म्हणतांना विशेषतः चमक म्हण-तांना आपणांस व्हावयास हवी. म्हणजेच चमक मन्त्रांचें खरें मर्म आपण ओळखलें असें होईल. मूळ यज्ञातील रुद्रसूक्त हें दैनंदिन पंचायतन पूजेंत तरी येण्याचें कारण या रुद्राध्यायांतील शाश्वत वैचारिक मूल्यांचें आपल्या चित्तावर संस्कार होत जावेत व त्यायोगें समष्टीशीं समरसता प्राप्त करून विश्वकल्याणाशीं एकरूप व्हावें हाच होय.

## यज्ञीय परिभाषा समजून घेणें आवश्यक.

अशा या चमकानुवाकांतील कांहीं अनुवाक श्रौतयज्ञांतील पारिभाषिक शब्द त्यांत आल्यामुळें सामान्य वाचकांना समजण्यास थोडे अवघड असे आहेत ऋषि-मुनींच्या जीवनाशीं यज्ञप्रक्रिया इतकी एकरूप झाली होती कीं कोणताही आशय व्यक्त करतांना तो यज्ञांतील प्रतीकानेंच व्यक्त व्हावा, अशा प्रतीकांनीं व्यक्त होणारा अर्थ त्या त्या यज्ञप्रकरणांतील प्रतीकांचा अर्थ नीट समजला तरच ध्यानीं येऊं शकतो व त्या अर्थाची सङ्गति लागूं शकते. उ. अंशुश्च मे हा सातवा, इध्मश्च मे हा आठवा व अग्निश्च मे घर्म-श्च मे हा नववा अनुवाक श्रौतयज्ञाची परिभाषा कळल्याशिवाय कळणेंच शक्य नाहीं. अशी परिभाषा विस्तारभयास्तव येथें सांगतां आली नाहीं तरी त्या मन्त्रांचे अर्थ सांगतांना संक्षेपतः आवश्यक तेवढें विवरण करण्यांत आलें आहे; विशेष जिज्ञासा असेल त्यांनीं मूळ सायणाचार्यांचे भाष्य वाचावें अशी विनंती आहे. कल्पसूत्र वाचून भाष्य वाचलें तर अर्थ अधिक स्पष्ट होईल.

उपरोक्त सात आठ व नऊ या अनुवाकांत जे ' ग्रह ' सांगितलें आहेत त्याचा अर्थ थोडक्यांत असा आहे. सोमयाग प्रकरणांत हे अश्वादिग्रह प्रसिद्ध आहेत. गृण्हातिति इग्रहः, सोमरस घेण्यासाठीं विशिष्ट आकाराचें जें लांकडाचें-पात्र बनवतात त्याला ग्रह असें म्हणतात. ज्या देवतांना उद्देशून हा सोमरस घेतला जातो त्या देवतांचीं नांवें या ग्रहांना दिलेलीं आहेत. या ग्रहांपैकीं कांहीं ग्रह प्रकृतिभूत यागामध्यें सांगितलें आहेत तर कांहीं विकृतिभूत यागामध्यें सांगितलें आहेत. सारस्वतग्रह हा अभिषेचनीय नांवाच्या विकृतेष्टीमध्यें सांगितला आहे, तसेंच इध्मा, बर्हि, वेदि हीं सर्व यज्ञाङ्गद्रव्यें यज्ञप्रकरणांत प्रसिद्ध आहेत. या सर्व पदार्थांची माहिती मूळ ग्रंथांमध्यें पहावी. हे उपरोक्त सर्व ग्रह व द्रव्यें ज्या ज्या यज्ञामध्यें आहेत ते सर्व-- मे कल्पताम् -- महान् श्रौतयज्ञ मला सुलभ होवोत, माझ्याकडून यांचे अनुष्ठान होवो हा आशय. असें महान् श्रौतयज्ञ हातून घडावयासही फार मोठा पुण्यसञ्चय गांठीं असावा लागतो.

## यज्ञप्रक्रियेंत शासनसंस्थेचीं मूल्यें.

यज्ञ हे कसे पार पाडले जातात हें जरा बारकाईनें पाहिलें तर त्यांत राष्ट्रव्यापी शासनसंस्थेचीं सर्व तत्त्वें सुसूत्र ग्रथित केलेलीं आढळून येतील. शिस्तबद्धता, आज्ञापालन, वेळच्यावेळीं काम करण्याची संवय, बिकट प्रसंगांत अचूक व त्वरित निर्णय घेण्याचें कौशल्य, चौफेर दक्षता, स्वावलम्बन इत्यादि सद्गुणांनीं माण्डित असेंच ऋत्विज यज्ञासाठीं लागत असत. असे सद्गुणमण्डित ऋत्विज व गुणज्ञ यजमान यांचा मणिकाञ्चना-प्रमाणें समसमा संयोग ज्यावेळीं होत असे त्यावेळीं यज्ञकर्मातला कर्मठपणा जाऊन अविनाशी तत्त्वज्ञानाच्या मङ्गलदीक्षेंत त्याचें सहज रूपांतर होत असे. कर्मयोगी बनणें म्हणजे कर्मठ बनणें नव्हे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. गाणें अनेकांना गातां आलें म्हणून त्यांतील स्वरविज्ञान व स्वरांवर ताबा स्वरयोग्याशिवाय कुणाचा असणार ? यज्ञ हा संग्राहक व मुख्यतः सामूहिक स्वरूपाचा असल्यानेंच भारताच्या राष्ट्रीय जीवनांत त्याला अपरंपार असें असाधारण महत्त्व प्राप्त झालें होतें. अशा या यज्ञांची पहिली सुरुवात देवांनींच केली. "यज्ञेन यज्ञमयजन्तदेवाः" असें पुरुषसूक्तांतील मन्त्रांत सांगितलें आहे. अर्जुनाला उद्देशून भगवंतांनींही —

सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः ।
अनेन प्रसविष्यध्वं एषवोऽस्त्विष्टकामधुक् ॥

असें यज्ञासंबंधीं मोठ्या मार्मिक शब्दांनीं सांगितलें आहे. यज्ञ हा "इष्ट-कामधुक्" आहे. इवें असेल तें यज्ञापासून मिळूं शकतें असें हें सारगर्भ विशेषण यज्ञाला लावून भगवंतांनीं सूचित केलें आहे. एवढेंच नव्हे तर पुढें "यज्ञशिष्टाशिनः सन्तोमुच्यन्ते सर्व किल्बिषैः" असें यज्ञाचें महत्त्वही वर्णन केलें आहे. यज्ञांत मिळणारी त्यागाची दीक्षाही स्वयंभू व निरपेक्ष होती. आज या त्यागाच्या दीक्षेचे संस्कार व्यक्तिजीवनांतही होत नाहींत. याचा परिणाम म्हणून आपल्या समाजजीवनांत बुद्धिवादाच्या तथाकथित भ्रामक युक्तिवादाच्या आहारीं जाऊन उपयुक्तता वादाचा आत्यंतिक अतिरेक दृष्टो-त्पत्तीस येऊं लागला आहे. "सर्वांसाठीं मी, आणि मग माझ्यासाठीं सर्व" या एका सूत्रांत भारतीय जीवनाच्या अनघ व रमणीय विविध पैलूंचे त्यावेळीं आपणांस जें दर्शन घडत असे तें केवळ एका यज्ञसंस्थेमुळेंच होय असें म्हटलें तर त्यांत भौतिकवाद्यांना खरोखरी राग येऊं नये.

चमक म्हणतांना यज्ञाविषयीं ऋषि-मुनींची काय धारणा होती याची कल्पना वाचकांना यावी म्हणून हें विवरण केलें. चमकांतील दहाव्या अनु-वाकांत ज्ञानेन्द्रियें, कर्मेन्द्रियें आणि आपल्या शरीरांत नांदणारे दशविध प्राण, फार काय शेवटीं या पार्थिव देहांतील अपार्थिव चिच्छक्तीही—' यज्ञे-न कल्पताम् '—यज्ञमय होवो अशी ऋषी प्रार्थना करीत आहेत. व्यक्तीच्या जीवनांतील साऱ्या प्रवृत्ती अशा तऱ्हेनें यज्ञमय झाल्या, शिवमय बनल्या कीं त्या व्यक्तीचें जीवन हाच मुळीं एक पवित्र यज्ञ बनतो. असा हा पवित्र जीवनयज्ञ महायज्ञांत एकरूप झाला कीं व्यष्टिजीवन संपुष्टांत येऊन ती व्यक्ति, व्यक्ति या नात्यानें न जगतां समष्टि या नात्यानेंच उर्वरित आयु-ष्यांत जगते हा या अनुवाकाचा महत्त्वाचा आशय आहे. हा भव्य आशय मनांत आणून त्या आशयाशीं समरस होतां आलें तर खात्रीनें अनेक जन्म पुण्यपुञ्जपरिपाकवशात् लाभलेलें हें क्षणभङ्गुर मानवी जीवन चरि-तार्थ-संपन्न झाल्यावांचून खचितच राहणार नाहीं.

## परिणत विचारांची दीप्ति.

यापुढें " एकाचमे तिस्रश्चमे पंचचमे " या शब्दांनीं शेवटचा अकरावा अनुवाक सुरू होतो. या अनुवाकांत ऋषींच्या परिणत-प्रज्ञविचारांची दीप्ति कळसास पोंहोचली आहे.

सम आणि विषम संख्या यांचें द्योतक असणारे कांहीं शब्द या अनु-वाकांत आले आहेत. हे शब्द केवळ संख्या सांगण्यासाठींच उच्चारले गेले आहेत असें समजणें चूक ठरेल.

विश्वांतील यच्चयावत् पदार्थांच्या धर्मांचें अचूक ज्ञान व्हावें यासाठीं जीं अनेक शास्त्रें भारतांत निर्माण झालीं त्यांत संख्याशास्त्र म्हणजेच गणित शास्त्र हें अत्यधिक महत्त्वाचें आहे. आधुनिक संशोधनाचीं उपकरणें जवळ नसतांना केवळ पर्णकुटींत राहून निसर्गाशीं समरस होऊन आपल्या ऋषींनीं याही शास्त्रांत आपली निरङ्कुश प्रज्ञा प्रगट केली आहे. दुर्बिणी-शिवायही खगोलाचें इतकें सूक्ष्म व इतकें अचूक ज्ञान कसें प्राप्त करून घेतलें असेल याचा आजही पाश्चात्य गणितज्ञांना मोठा विस्मय वाटतो. गणितांतील शून्याचा शोध हा त्या शास्त्रांत आमूलाग्र क्रान्ति करणारा आजही अबाधित असा मानला गेला आहे. गणित हें पूर्वेकडून पश्चिमे-कडे गेलें आहे याबद्दल आज विद्वानांची खात्री पटत चालली आहे.

अशा या गणितशास्त्राच्याआधारें सूक्ष्मातिसूक्ष्म व स्थूलातिस्थूल अशा पदार्थांच्या गतींचे सूक्ष्म अवलोकन करून त्यांच्या हालचालींचा या जगावर काय काय परिणाम होतो हें पाहून ऋषींनीं कांहीं मूलग्राही सिद्धांत मांडले आहेत. या सिद्धान्तानुसार देश आणि काल या सर्वव्यापी अशा दोन तत्त्वांचा त्यांच्या कक्षेंत येणाऱ्या प्रत्येक पदार्थावर परिणाम झाल्या-शिवाय रहात नाहीं. कालतः आणि देशतः अलिप्त अशी कोणतीच वस्तु या ब्रह्माण्डांत आपणांस दाखवितां येणार नाहीं. म्हणूनच विश्व हें देश-कालपरिच्छिन्न म्हणजे व्याप्त आहे असें म्हणतात. देश-काल यांनीं अपरि-च्छिन्न अशी एकच एक शक्ति आहे आणि ती म्हणजे देश-कालाच्या मर्यादेपलीकडे असणारी; तथापि देश-कालाच्या मर्यादेंतही असणारी अशी सर्वङ्कष परमात्मशक्तीच होय. या परमात्मशक्तीच्या नियन्त्रणामुळेंच

अणुपेक्षांही सूक्ष्मतम असणाऱ्या परमाणूंतील घटक द्रव्यांचें 'स्पन्दन' योग्य तऱ्हेनें आणि अचूक असे चालूं आहे. जर का हें नियन्त्रण नसतें तर अणूंतील केन्द्राणूचा तोल राहिला नसता व हा जर तोल न राहता तर या जगाचें भवितव्य काय झालें असतें याची आजच्या शास्त्रज्ञांना तरी पुरेपूर कल्पना येऊन चुकली आहे. महतो महीयान् अशा महत्तत्त्वाकडे गेल्यावर जशी मानवी बुद्धि कुंठित होते तशीच ती अणोरणीयान् अशा अणुपरिमाणापर्यंतही गेल्यावर कुंठित होते; म्हणून लोकोत्तर बुद्धीनें भारतीय ऋषींनीं गणितशास्त्रांतील जीं प्रमेयें जगासमोर ठेवलीं त्या प्रमेयांवरच आजचे बऱ्हंशी वैज्ञानिक-शोध आपली वाटचाल करीत आहेत. तेव्हां या गणितशास्त्रांतील प्रमेयांनीं जीं तत्त्वें जीवनाला उपकारक ठरलीं त्या विशिष्ट तत्त्व प्रणालीचा बोध करून देण्यासाठींच चमकांतील अकराव्या अनुवाकांत संख्यावाचक शब्दांचा उपयोग केला आहे हें या विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत येईलच. या विषयाचें याहून अधिक विवेचन होणें जरूर होतें; परंतु स्थलसंकोचास्तव येथें थांबणें इष्ट आहे.

मूळ एकचएक अशी जी परमात्मशक्ती होती त्या शक्तींतूनच पुढें 'तिस्रः' म्हणजे सत्व-रज-तम असे त्रिगुण निर्माण झाले, व पुढें या त्रिगुणांतूनच 'पञ्चचमे' या शब्दांनीं पञ्चमहाभूतें स्थूल आकारभावास प्राप्त झालीं असें सूचित केलें आहे. विश्वाच्या उत्पत्तीचा उगम अशा तऱ्हेनें थेट परमात्मशक्तीपर्यन्त नेऊन भिडवला असल्यामुळें सगुणोपासनेचें अंतिम उद्दिष्टही या अनुवाकांत सांगितलें आहे असें म्हटल्यास तें वावगें होणार नाहीं. चतुर्दश भुवनांवर आधिपत्य येण्यासाठींच त्या सर्वान्तर्यामि असूनही सर्वांपेक्षां पृथक् असणाऱ्या, 'तद्दूरेतद्वदन्तिके' 'तदेजति तन्नैजति' या उपनिषद्वाक्यांत सांगितल्याप्रमाणें एकाच वेळीं अत्यंत गतिशील व अत्यंत स्थिर अशा परस्पर विरुद्ध गुणधर्मांनीं युक्त असणाऱ्या त्या एकमेव आदिशक्तीशीं एकरूप होऊन जातां यावें, हेंच ऋषींनीं चौदादीभुवनांच्या पलीकडे प्रज्ञेची विराट् भरारी मारून या अनुवाकांत सूचित केलें आहे.

## रुद्राध्यायांतील कौस्तुभमणी

चमक विभागांतील हा अकरावा अनुवाक म्हणजे रुद्राध्यायांतील जणूं

कौस्तुभमणीच होय. भारतांत ज्या ज्या विद्या, जीं जीं दर्शनें, ज्या ज्या कला, फार काय ज्या ज्या गोष्टींतून-भारतीय जीवनाच्या अस्तित्वाचा दिव्य साक्षात्कार झाला त्या सर्वांचा या अनुवाकांत, लघुसंदेशपदा सरस्वतीनें ऋषींच्या अर्थगर्भ भारतीनें समावेश केला आहे, तो असा:—

सकल जगाचें उपादानकारण म्हणून जगदारम्भीं एकच 'प्रकृति' होती. या संबन्धीं मार्कण्डेय पुराणांत- "एकैवाहं जगत्यत्र द्वितीया का ममापरा" असा उल्लेखही आढळतो. या एका मूळ प्रकृतीपासून गुणत्रयरूपिणी अशा तीन देवता ( शक्ति ) प्रगट झाल्या. पुढें या तीन देवतां (शक्ति)-पासून पञ्चमहाभूतें साकार झाली. त्यानंतर या पञ्चमहाभूतांच्या तन्मात्रां-पासून ( अपञ्चीकृत महाभूतांपासून ) पांच ज्ञानेन्द्रियें, सहावें मन व सातवी बुद्धि निर्माण झाली. या सातांच्या समुदायानें नवद्वारोपलक्षित-नऊ द्वारांनीं युक्त असा पार्थिव देह तयार झाला. या स्थूल पार्थिव देहांत दश-प्राण आहेत. पांच मुख्य व पांच उप मिळून दहा. यांचीं नांवें १ प्राण २ अपान ३ व्यान ४ समान ५ उदान ६ नाग ७ कूर्म ८ कृकल ९ देवदत्त १० धनञ्जय अशीं आहेत. या दशप्राणांना आधारभूत अशी 'सुषुम्ना' नांवाची नाडीही तयार झाली. या आकरा तत्त्वांच्या अंशानें तेरा देवता ( शक्ति ) झाल्या. तसेंच पुष्या, युगंधरा, शङ्खिनी प्रभृति चौदा व उपरोक्त सुषुम्ना मिळून एकूण नाड्या तयार झाल्या. लिङ्गशरीराचे सतरा अवयव, एकोणीस सञ्जीवनी महौषधी— व्रणविरोपिणी, व्रणघ्नी, सहदेवी, ब्राह्मी, मुण्डी प्रभृति या वनस्पति नागार्जुनतन्त्रांत प्रसिद्ध आहेत. शरीरांतील एकवीस मर्मस्थानें वैद्यक शास्त्रांत प्रसिद्ध आहेत. तसेंच ज्वर, अतिसार, पाण्डु, क्षय वगैरे तेवीस महारोग-हे सर्व मानवी शरीरांत निर्माण होतात असें वैद्यकशास्त्र सांगतें. आतां स्वर्गांत जशा अप्सरा प्रसिद्ध आहेत तशाच त्या याही देहांत आहेत. उदाहरणार्थ उर्वशी, तिलोत्तमा, सुकेशी, मञ्जुघोषा, पूर्वचित्ति, रम्भा, मेनका प्रम्लोचा वगैरे पंचवीस अप्सरा या देहांत आहेत. या अप्सरा म्हणजे काय याचा सुंदर अर्थ योगलतिकेंत विस्तारानें दिला आहे. त्यांत म्हटलें आहे, कीं- पूर्वचित्ति म्हणजेच चित्त, बुद्धि हीच तिलोत्तमा, मन हेंच उर्वशी, अविद्या हीच कोणी एक रम्भा, परोक्षविद्या म्हणजे मेनका, तिची कन्या गौरी हीच अपरोक्ष विद्या ह. अशा तऱ्हेनें अर्थाचा समन्वय लावला आहे.

तसेंच चित्रसेन, विश्वावसु, नारदप्रभृति, सत्तावीस गंधर्व; तसेंच श्रुतींत एकोणतीस विद्युद्देवता सांगितलेल्या आहेत. यांनाच ‘ कृत्या ’ असेंही दुसरें नांव आहे. या कृत्या श्रुतींत पुढीलप्रमाणें सांगितल्या आहेत, “ ज्योतिष्मतीं त्वासादयामि ज्योतिर्विदं त्वासादयामि ” अशींच एकतीस भुवनेंही प्रसिद्ध आहेत तीं अशीं :—भूः, भूवः, स्वः, इत्यादि सात, अतलादि पातालपर्यंत सात अधोलोक, वैकुंठलोक, राधालोक, गोलोक, मणिद्वीप, महाकालपूर, शिवपूर, गणेशलोक मिळून सात यांना उपसर्ग असेंही म्हणतात. अयोध्या, मथुरा, माया इत्यादि सात नगरींना भूस्वर्ग अशी संज्ञा आहे. कैलास, मानस, मेरु यांचाही यांत समावेश केला कीं एकतीस ही संख्या पुरी होते. याप्रमाणेंच आठ वसु, अकरा रुद्र, बारा आदित्य, अश्विनीकुमार आणि प्रजापति या एकूण तेहतीस देवता. अनुवाकांत आलेल्या विषमसंख्यावाचक शब्दांनीं हा सर्व अर्थ व्यक्त केला आहेः—“**एकाचमे तिस्रश्च म इत्याह**”या श्रुतिवाक्यानें वरील अर्थ हा कल्पनागम्य नसून प्रमाणगम्य आहे असा निर्वाळा दिला आहे तो मुद्दाम ध्यानांत ठेवावा. आतां चतस्रः इत्यादि शब्दांचाही अर्थ पुढीलप्रमाणें ध्यावयाचा आहेः--धर्म,अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ ज्यांच्यांमुळें प्राप्त होतात त्या चार विद्या, चार वेद व चार उपवेद मिळून आठ, षट् या शब्दानें षडङ्गें (सहा अङ्गें) आणि सहा शास्त्रें मिळून बारा, सोळा सिद्धिस्वरूप अशा महाविद्या.या महाविद्यांमध्यें दूरश्रवण, दूरदर्शन प्रभृति सर्व सिद्धींचा समावेश आहे. पांच ज्ञानेन्द्रियांपासून प्राप्त होणाऱ्या सिद्धि, वाक्सिद्धि, अप्रतिहतगति दूरग्रहण वगैरे पांच कर्मेन्द्रियांपासून प्राप्त होणाऱ्या सिद्धि, तसेंच स्थापत्यविद्या, पर्जन्यविद्या, ज्योतिर्विद्या, आयुर्विद्या आणि परोक्ष ब्रह्मविद्या मिळून पांच, मन, चित्त, बुद्धि आणि अहंकार यांच्याशीं संबन्धित, अपरोक्ष ब्रह्मविद्या ही महत्तत्वाशीं संबद्ध, मिळून एकूण सोळा, महाभूतें स्थूल व सूक्ष्म या प्रकारांनीं दहा. विषयही त्याचप्रमाणें मिळून दहा, चोवीस तत्त्वें सांख्यप्रक्रियेंत प्रसिद्ध आहेत. अठ्ठावीस पशुपक्ष्यांचे भेद भागवतांत प्रसिद्ध आहेत. अष्टविध देवसर्ग ( देवांची सृजनशीलता ) सहा प्रकारचा मानुषसर्ग, कौमार आणि मानुषसर्ग मिळून दोन, ऐंद्रियसर्ग दहा प्रकारचा त्रिविध अहंकार आणि तीन गुण मिळून बत्तीस, याहून राहिलेल्या इतर सर्वांचाही

यांतच समावेश समजावा; या सर्व गोष्टी " मे यज्ञेन कल्पन्ताम् " मी करीत असलेल्या यज्ञानें उपलब्ध होवोत.

या अनुवाकांतील वरील सर्व आशय ध्यानीं घेतला कीं अकराव्या अनुवाकांतील संख्यावाचक शब्दांचें खरें मर्म वाचकांच्या ध्यानीं येईल.

पं. विष्णुसूरींनीं आपल्या भाष्यांत वरील अर्थ विस्तारानें सांगितला असला तरी त्याचें मूळ आपल्या योगविषयक उपनिषदांमध्यें आहे, म्हणून विशेष जिज्ञासा ज्यांना आहे त्यांनीं योगविषयक उपनिषदें हीं मूळांतून वाचावींत हें बरें.

अनंत सञ्चिताच्या अगाध सरोवरांतून मानवी जीवनाचें हें अनघ रमणीय असें मनोज्ञ कमलपुष्प निर्माण झालें आहे. शत-शत पाकळ्यांनीं विकसित होणाऱ्या या कमलपुष्पांत दैवी सद्गुणांचा दिव्य परिमल नेहमीं दरवळत रहावा व या परिमलानें सारें चराचर मोहित होऊन जावें आणि शेवटीं या जीवनाच्या कमलपुष्पाची एकेक पाकळी त्या विश्वरूपाच्या अङ्घ्रियुगुलीं आपोआप गळून पडावी. आणि अशी ती पडतां पडतां आपण एकाजनार्दनीं विश्वरूप होऊन जावें यापेक्षां मानवी जीवनाची अंतिम सफलता ती कोणती ?

या सफलतेचें क्षितिज अमर्याद आहे. रुद्रसूक्तानें हें अमर्याद क्षेत्रही पादाक्रांत करतां येतें असें आपणांस ऋषि सांगत आहेत. त्यांचा हा भव्य आशय मनांत ठसला तर रुद्र म्हणण्याचें खरें सार्थक झालें असेंच समजलें पाहिजे. असो.

रुद्राध्यायाचे ' नमक ' आणि ' चमक ' असे मुख्यतः दोन विभाग असल्याचें मागें येऊन गेलेंच आहे.

## संग्रहप्रधान नमक तर संप्रदानप्रधान चमक.

नमकमन्त्रांत मुख्यतः संग्रहाची कल्पना आहे, तर चमक विभागांत प्रामुख्यानें संप्रदानाची कल्पना अभिप्रेत आहे. चमकांतील, चमे, चमे, या शब्दांत जो ' मे ' शब्द आहे त्याचा अर्थ जरी ' मला ' असा स्थूल वाच्यार्थ असला तरी हा ऋषींचा मीपणा व्यष्टीशीं संबद्ध नसून समष्टीशीं एकरूप झाला होता, त्यामुळें अशा विश्वाकार झालेल्या ऋषींच्या मी-

पणांतही समष्टीचेंच कल्याण होतें; त्यांचा स्वार्थ तो परार्थ होतो. म्हणून चमकांत जें जें परमात्म्यापासून अपेक्षिलें तें तें समष्टीच्या अभ्युदयार्थ आहे यासाठींच चमकांत संप्रदानाची प्रबल अशी 'ऊर्मी' आहे. शक्तींचा सञ्चय नमकांत अपेक्षित आहे तर चमकांत सञ्चित शक्तींचें वितरण अभिप्रेत आहे;" आदानं हि विसर्गाय सतां वारिमुचामिव " असा आपला आदर्श आहे. आपल्याजवळ शक्तिसञ्चय नसेल तर या विश्वांत आपल्यासाठीं कोणतेंही मानाई स्थान नाहीं. कृष्णयजुर्वेदाच्या तैत्तिरीयारण्यकांतील आठव्या प्रपाठकांत माणसानें शक्तिसंपन्न, बलसंपन्न कां असावें हें पुढील उद्बोधक शब्दांत सांगितलें आहे तें आजही तरुणांनीं मनन करण्याजोगें आहे—ऋषि सांगतातः—

" युवास्यात्साधु युवाऽध्यायकः । आशिष्ठो दृढिष्ठो बलिष्ठः । तस्येयं पृथिवी सर्वा वित्तस्य पूर्णा स्यात् । स एको मानुष आनन्दः " ॥ इति ॥

मानवी योनींत जन्म घेतल्यावर मानुषआनंदाची प्राप्ति होण्यासाठीं शक्तिसंपन्न असलेंच पाहिजे. सामर्थ्याच्या अभावीं जिथें प्राथमिक स्वरूपाचा मानुषआनंदच नाहीं तिथें त्याहून उच्चस्तरीय आनंद कसे प्राप्त होणार ?

## निसर्गातील प्रत्येक पदार्थ हेंच सांगत नाहीं काय ?

त्यागप्रधान महान् श्रौतयज्ञ करण्यासाठींच नमकांत परमात्म्याच्या विविध शक्तींची अनुकूलता प्रार्थिली आहे. चमकांत या विविध शक्तींच्या साहाय्यानें प्राप्त करून घेतलेलें महदैश्वर्य यज्ञांत अर्पण करण्याची प्रेरणा आहे. 'आदान' आणि 'प्रदान' या दोन तत्त्वांनीं मिळून 'वैश्विकसंतुलन' राखलें गेलें आहे, फार काय पण चराचर सृष्टीचें सातत्य जें आजवर अविच्छिन्न राहिलें गेलें तेंही याच आदान-प्रदान तत्त्वाच्या जोरावर होय. निसर्गाकडे जरा बारकाईनें पाहिलें तर त्यांतील प्रत्येक पदार्थ आपल्याला हेंच तत्त्व सांगेल. परमेश्वरी सृष्टींत निसर्गतः आढळणारें हें तत्त्व मानवीजीवनांतही तितकेंच अपरिहार्य आहे. हीं तत्त्वें जीवनांत दृग्गोचर व्हावींत यासाठींच भगवंतांनीं गीतेमध्यें अस्तेय अपरिग्रह इत्यादि राष्ट्रीय स्वरूपाचीं व्रतें आचरावींत असें

सांगितलें आहे. पूर्वी यज्ञांतून ही दीक्षा आपोआपच मिळत असे. आज यज्ञ लुप्त झाले तरी त्यांतील तत्त्वांची उपयुक्तता मात्र नशीब्यानशीच आजही टिकून राहिली आहे.

## विज्ञान-सूक्त आणि यज्ञ यांचा संबन्ध.

असें यज्ञविषक ज्ञान ज्या वैदिक सूक्तांनीं प्राप्त होतें त्यांत रुद्रसूक्त हें प्रधानतम असें सूक्त आहे. आपलें विज्ञान हें यज्ञ निर्मितीला कारण असे हें तैतिरीयारण्यकांत सांगितलें आहे—

"विज्ञानं यज्ञं तनुते। कर्माणि तनुतेऽपि च।" कर्म हें यज्ञोद्भव व यज्ञ हा विज्ञानोद्भव व विज्ञान हें रुद्रसूक्तोद्भव असा या सर्वांचा परस्पर कार्यकारणभाव आहे. हा कार्य-कारणभाव स्पष्ट होण्यासाठींच आतांपर्यंत विवेचन केलें.

## रुद्र आणि त्याची उपासना.

भट्टभास्कराचार्यांनीं आपल्या रुद्रावरील भाष्यांत रुद्रांतर्गत नमकमन्त्रां-तील प्रत्येक मन्त्राचें विविध फलांच्या उद्देशानें पुरश्चरणात्मक अनुष्ठान विस्तारानें सांगितलें आहे. तथापि अशीं अनुष्ठानें म्हणजे काम्य अनुष्ठानें सकलाङ्ग कलापयुक्त व गुरूपदिष्ट मार्गानें केलीं तरच तीं यशस्वी होण्याची खात्री देतां येते.

मन्त्रांतील शब्दांपासून निर्माण होणारे ध्वनिप्रवाह किती विलक्षण कार्य करूं शकतात याचा जराही प्रत्यय ज्यांना आजवर आलेला नाहीं त्यांनीं प्रथम आपली मनोभूमिका शुद्ध व निःशंक करून मगच या मार्गांत पदार्पण करणें उचित ठरेल; शब्दशक्ति ही ऋषि-मुनींची केवळ कल्पना नसून ती किती प्रत्ययकारी आहे याचीं प्रात्यक्षिकें आजही विज्ञानवादी राष्ट्रांत चालू आहेत. शब्द तन्मात्रेनेंच आपण अखिल ब्रह्माण्डावकाशाशीं संबद्ध आहोंत याची जाणीव विज्ञानवाद्यांना नव्यानें होऊं लागली तरी भारतांत ती नवी नव्हती व नाहीं. साधकांनीं हें ध्यानांत ठेवून अश्रद्धमनाच्या वातावरणापासून स्वतःला अलिप्त राखावें हें उत्तम.

मन्त्रोपासनेनें मनाचें सामर्थ्य कसें वाढतें याचा अनुभव घेण्यासाठीं तरी रुद्राची उपासना करावी. मात्र अशी उपासना करतांना आज जी पद्धति चालू आहे तींत थोडा बदल करणें जरूर आहे.

आज रुद्राची एकादशिनी, लघुरुद्र, महारुद्र, अतिरुद्र इत्यादि प्रकारांनीं रुद्र म्हटला जातोच. परंतु त्यांत पूर्वीं सांगितल्याप्रमाणें सकलाङ्गकलापाचें विधिवत् आचरण होत नाहीं; लघुरुद्र वा महारुद्र हे करीत असतांना ऋषींनीं प्रथम न्यास सांगितले आहेत ते अतीव महत्त्वाचे आहेत. अन्तर्मातृकान्यास व बहिर्मातृकान्यास जर अर्थ समजून केले गेले तर मंत्रशक्तीचें जागरण व्हावयास वेळ लागणार नाहीं. बौधायनासारखे साक्षात्कृतधर्माण ऋषि रुद्राच्या उपासनेपूर्वीं आवश्यक त्या पूर्वाङ्गांचे अनुष्ठान करावें असें जें मुद्दाम सांगतात तें निरर्थक आहे असें मानणें योग्य नव्हे. त्यांत हानिप्रद अशी आत्मवञ्चनाच ठरेल. रुद्राचें जपादि पद्धतीनें विशेष अनुष्ठान करूं इच्छिणाऱ्या साधकांसाठीं बौधायन ऋषींनीं—"**अथातः पञ्चाङ्गरुद्राणां महान्यासपूर्वकं जपहोमार्चनाभिषेकविधिं व्याख्यास्यामः**" असा उपक्रम करून विस्तारानें या अङ्गोपाङ्गांची माहिती दिली आहे. साधकांनीं ती मूळांतूनच समजून घेणें अधिक सोईचें होईल. बौधायनाच्या वरील वाक्यांत 'पञ्चाङ्गरुद्र' हा शब्द आला आहे त्याचा अर्थ पांच प्रकारचे अङ्गन्यास ज्यांचे आहेत ते पञ्चाङ्ग रुद्र असा आहे.

हे पांच प्रकारचे अङ्गन्यास पुढीलप्रमाणें आहेत—

(१) शिखाद्यस्त्रान्त एकत्रिंशदङ्गन्यास,
(२) मूर्धादिपादान्त दशाङ्गन्यास,
(३) पादादिमूर्धान्त पञ्चाङ्गन्यास,
(४) गुह्यादि मस्तकान्तन्यास,
(५) हृदयाद्यस्त्रान्त पञ्चाङ्गन्यास.

हे सर्व न्यास व इतर सर्व अङ्गोपाङ्गें, यांचें शास्त्रशुद्ध ज्ञान गुरुपदिष्ट मार्गानें प्राप्त करून घेतलें तरच तें मंत्रांतील प्रसुप्तशक्ति जागृत करण्याचें दृष्टीनें उपयुक्त ठरेल. येथें हा सर्व विषय सोपपत्तिक सांगतां येणें केवळ अशक्य आहे यासाठीं फक्त दिग्दर्शन करूनच थांबणें भाग आहे.

## रुद्रोपासनेनें प्राप्त होणारीं विविध फलें.

अशा या रुद्रसूक्ताचा विधिपूर्वक जर जप केला तर त्यापासून निर्माण होणाऱ्या विविध फलांचाही निर्देश बौधायनांनीं पुढीलप्रमाणें केला आहे—

**“ एतत्पापक्षयार्थी, व्याधिमोचनार्थी, श्रीकामः शान्तिकाम आयुष्काम आरोग्यकामश्चकुर्यात् । एवंकुर्वन्नेतत्सर्वमाप्नोति, इत्याह भगवान्बौधायन इति ” ॥**

या वाक्याचा अर्थ स्पष्ट आहे. ‘ एवं कुर्वन् ’ हे शब्द महत्त्वपूर्ण आहेत— “ सकल पूर्वोत्तराङ्गसहित जपानुष्ठान झालें तरच ” हा या शब्दांचा महत्त्वाचा आशय आहे; साधकांनीं तो आपल्या हृत्पटलावर कायमचा कोरून ठेवावा.

## निराश होऊं नका.

सध्याच्या संस्कारशून्य आणि अश्रद्ध वातावरणांतही ज्यांना या विषयासंबंधीं आदर आहे त्यांनींही ‘ विशेष ज्ञान नाहीं ’ म्हणून मुळींच निराश होण्याचें कारण नाहीं. अनंतावकाशांत गरुडाची झेप घेतां आली नाहीं म्हणून चिमण्या कांहीं आकाशांत विहार करण्याचें सोडून देत नाहींत हें लक्षांत ठेवून आधिक कांहीं परिस्थितीनुसार करतां आलें नाहीं तरी पञ्च पञ्च उषःकालीं, रम्य, शांत व आल्हादक अशा पवित्र वेळीं उठून आवश्यक तें सर्वपूर्व कृत्य आटोपून, काया-वाचा-मनानें अंतर्बाह्य शुचिर्भूत होऊन—

त्या अघटित घटना पटीयान् करुणासागर कर्पूरगौर अशा शिवशंकराला श्रद्धेनें अभिवादन करून जर प्रत्यहीं नियमितरीत्या हें पावन रुद्रसूक्त नुसतें जरी म्हटलें तरीहि तो दयाघन कृपेचा वर्षाव केल्याशिवाय राहणार नाहीं. दीनांसाठीं दीन, मोठ्यांसाठीं मोठा, लहानांसाठीं लहान बनणारा तो परमभक्त वत्सल आपली उपेक्षा करील असें मनांतही आणूं नये. मुक्या मनानें जरी त्याची आळवणी केली तरी तो सर्वाङ्गांनीं विरघळणारा आहे. गजेन्द्राच्या मोक्षासाठीं धांव घेणारा तो दीन दयासागर प्रभू— त्याला आपण काय सांगणार व देणार तरी काय ? निष्ठेनें, श्रद्धेनें आणि

विश्वासानें त्याच्या त्रैलोक्यपावन चरणकमलाजवळ विनम्र व्हा कीं तुमचें काम झालें. पुढचें तो पाहून घेईल. नाहींतरी यापेक्षां त्याच्या बाबतींत — " मुक्या मनानें किती उधळावे शब्दांच बुडबुडे " ?

**आतां थोडेसें ऋणस्मरण—**

ही रुद्रार्थदीपिका मी लिहिली असली तरी या मागची प्रेरणा आपल्या अनलङ्कृत परंतु भावगर्भ लेखणीनें मराठी सारस्वतांत सुपरिचित असलेले, प्रकाशनकार्यांत 'साहसी' म्हणून सुविख्यात झालेले य. गो. जोशी, यांची आहे, हें मुद्दाम नमूद केलें पाहिजे. अशा तऱ्हेनें श्री. य. गो. जोशी यांनीं जरी प्रेरणा दिली तरी माझेकडून प्रत्यक्ष लिहवून घेण्याचें थोडेसें त्रासदायक वाटणारें काम यशवंत प्रकाशनाचे मुख्य व माझे मित्र अनंतराव वैद्य यांनीं पार पाडलें आहे. त्यांच्या उत्साहामुळेंच ही रुद्रार्थदीपिका खरोखरी प्रकाशित झाली आहे. आणि यापुढें रुद्रार्थदीपिकेच्या मुद्रितांचे काळजीपूर्वक संशोधन करण्याचें अत्यंत किचकट असें काम ज्यांनीं मोठ्या तत्परतेनें व उत्साहानें पार पाडलें ते, कै. वामन शिवराम आपटे यांच्या दुर्मीळ संस्कृत-इंग्रजी कोशाच्या प्रकाशनकार्यांत केवळ हौसेमुळें सेवानिवृत्त झाल्यावरही बहुविध भाग घेऊन आपली गुणज्ञवृत्ति प्रगट केली त्यांचे श्री. महादेव पांडुरंग आपटे, बी ए., यांचें मनःपूर्वक अभिनंदन केलेंच पाहिजे. शेवटीं प्रत्यक्षा-प्रत्यक्ष ज्यांचें ज्यांचें या कामीं साहाय्य लाभलें त्या सर्वांचा नामोल्लेख अवश्य असला तरी अशक्य आहे म्हणून मी त्या सर्वांचा अभिमानानें येथें फक्त ऋणनिर्देश करीत आहें. इति लेखनसीमा.

अक्षय्य तृतीया<br>शके १८८२,<br>पुणें ४.

श्रीपादशास्त्री किंजवडेकर

॥ श्री ॥

श्रीकमलेश्वर चरणीं —

कमलेश्वर हा भोळा । ले सायणोक्ति कुसुममाळा ।
परि माझिया बिल्वदळा । ना न म्हणे कीं ॥

—समर्पण.

अक्षय्य तृतीया,
शके १८८२, पुणें ४.

— श्रीपादशास्त्री किंजवडेकर.

॥ श्री ॥

यत्कृपालेशसिध्यर्थं ऋषिभिर्बहुलीकृतम् ।
रुद्रसूक्तमिदं भव्यमाम्नाय समुदीरितम् ॥ १ ॥

यद्वशाद्राजते विश्वं विश्वात्मा स हि राजते ।
कोरग्रामे स्वयं साक्षात्स्वयम्भू कमलेश्वरः ॥ २ ॥

तदङ्घ्रिकमलं ध्यात्वा तत्कृपालोलमानसः ।
रुद्रार्थदीपिकां कुर्वे भाषायां सुखबोधिनीम् ॥ ३ ॥

॥ श्री कमलेश्वरायनमः ॥

हरिः ॐ, इडादेवहूर्मनुर्यज्ञनीर्बृहस्पतिरुक्था मदानि शꣳसिषद्विश्वेदेवाः सूक्तवाचः पृथिवी-मातर्मा मा हिꣳसीर्मधु मनिष्ये मधु जनिष्ये मधु वक्ष्यामि मधु वदिष्यामि मधुमतीं देवेभ्यो वाच-मुद्यासꣳशुश्रूषेण्यां मनुष्येभ्यस्तं मा देवा अवन्तु शोभायै पितरोऽनुमदन्तु ॥ ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥ ॐ नमो भगवते रुद्राय ॥

(हा शांतिमंत्र आहे. रुद्राध्याय म्हणण्यापूर्वी हा मंत्र म्हणण्याचा प्रघात आहे. या शांतिमंत्रानें मनोभूमिका परिमार्जित झाली— शुद्ध झाली-कीं त्या शुद्ध झालेल्या मनानें पुढें रुद्रसूक्त म्हणावयाचें- म्हणून हा शांतिमंत्र अवश्य म्हणावा).

**अर्थः**— इडा या शब्दाचा अर्थ ब्रह्मरूपिणी विद्या असा आहे. ही ब्रह्मविद्या प्राप्त झाली कीं, ती स्वयमेव- आपोआप— 'देवहूः' म्हणजे देवांना बोलावणारी होते. देवांची उपस्थिति ब्रह्मविद्येशिवाय नाहीं हा आशय. अशी ही देवांचे सांनिध्य घडवून आणणारी ब्रह्मविद्याच पुढें 'मनुर्यज्ञनीः' मनु म्हणजे ब्रह्मविद्याप्रापक मंत्र. हा मंत्र यज्ञनीः-

यज्ञं–नयति यज्ञाप्रत नेऊन पोहोंचविणारा असा आहे. मंत्ररूप वाग्देवता धर्ममार्गाचा उपदेश करून यज्ञाला प्रवृत्त करते, बृहस्पतिः 'ब्रह्म वै देवानां बृहस्पतिः' या श्रुतीवरून कर्मसाक्षी परमेश्वर असा अर्थ—हा परमेश्वरच कर्मापासून निर्माण होणाऱ्या सुखांची प्रशंसा करून मनुष्याला कर्मयोगी होण्याचा आदेश देत आहे असें उक्थामदानि या शब्दानें सांगितलें आहे. उक्थामदानि म्हणजेच कर्मजन्य सुखें.

हे सूक्तवाचः, म्हणजे शुभ आहे वाणी ज्यांची अशा विश्वांतील कल्याणप्रद देवतांनों, माझी हिंसा होणार नाहीं याकडे तुम्ही लक्ष द्या, तसेंच हे धरणीमाते ( पृथिवी मातः ), तूंही माझा नाश न होईल इकडे लक्ष दे. हें तुम्ही करावेत या साठींच—मी मधु म्हणजे मधुर असें तुझें रूप, मनिष्ये-मनन करतों. तुझ्या सुंदर रूपाचें मी सतत ध्यान करितों. तसेंच मधु जनिष्ये म्हणजे तुझें मधुर स्तोत्र स्तवन करितों आणि मी स्वतः मधुवक्ष्यामि मधुर, गोड तर बोलेनच, परंतु स्वजनान् मधु वदिष्यामि, संबंधीं लोकांशीही गोड वाणीनेंच व्यवहार करीन. त्या प्रमाणेंच देवांना उद्देशून ही मधुमतीं वाचमुद्यासं म्हणजे मधुर आणि यथार्थ असेंच बोलेन, असत्य बोलणार नाहीं. तरी तुम्ही सर्वांनीं मिळून माझें रक्षण करावें, माझी कीर्ति उत्तरोत्तर वृद्धिंगत व्हावी, माझे सर्व पूर्वज माझ्या कर्मानें संतुष्ट व्हावेत— आणि या जगांत माझा निरंतर शुक्लेन्दुवत् महिमा चढत्या श्रेणीनें वाढत रहावा. ॐ शांतिः शांतिः शांतिः । शांति शब्दाचा तीन वेळा उच्चार त्रैलोक्याच्या दृष्टीनें, तीनही लोकांत शांति नांदावी हा आशय मनांत ठेवून केला असावा असें मानतात.

॥ श्रीः ॥

# श्रीरुद्रार्थदीपिका

हरिः ॐ

नम॑स्ते रुद्र म॒न्यव॑ उ॒तो त॒ इष॑वे॒ नमः॑ ।
नम॑स्ते अस्तु॒ धन्व॑ने बा॒हुभ्या॑मु॒त ते॒ नमः॑ ॥ १ ॥

**अर्थः**—हे रुद्र, तुझ्या क्रोधाला मी नमस्कार करतों. [तुझा क्रोध आमच्या शत्रूंच्या बाबतींत चरितार्थ होवो.] तसेंच तुझा बाण आणि तुझे धनुष्य आणि तें धारण करणारे तुझे दोन बाहू यांनाही मी नमस्कार करतों. [या सर्व आयुधांचा उपयोग आमच्या शत्रूंच्या बाबतींत होवो.]

**टीप**:—नमस्ते रुद्र या मंत्राचा ऋषि कश्यप, देवता रुद्र, छंद अनुष्टुभ् या मंत्रांत आलेल्या रुद्र शब्दाचा अर्थ। अशुभ द्रावको रुद्रो यज्जहार पुनर्भवम् । तस्मात् शिवस्ततो रुद्रशब्देनात्राभिधीयते ॥ असा सांगितला आहे. रुतिम् शब्दम् राति ददाति इति प्राणो रुद्रः असाही कांहींच्या मतानें आहे.

या त॒ इषुः॑ शि॒वत॑मा शि॒वं ब॒भूव॑ ते॒ धनुः॑ ।
शि॒वा श॑र॒व्या॑ या तव॒ तया॑ नो रुद्र मृडय ॥ २ ॥

**अर्थ:**—हे रुद्र–अशुभाचा परिहार करणाऱ्या शंकरा, जो हा तुझा बाण शिवतमा बभूव शांत झाला, तसेंच तुझे धनुष्य शांत झाले, त्या शांत झालेल्या धनुर्बाणांनीं तूं आम्हांला सुख दे.

**टीप:**—या मंत्राचा ऋषि आत्रेय, देवता शंभू, छंद अनुष्टुभ्.

## यां ते रुद्र शिवा तनूरघोराऽपापकाशिनी । तया नस्तनुवा शंतमया गिरिशंताभि चाकशीहि ॥ ३ ॥

**अर्थ:**—हे रुद्र, तुझी जी प्रसिद्ध तनू ( शरीर, मूर्ति ) ( रुद्राच्या दोन मूर्ति, तनू प्रसिद्ध आहेत. “ रुद्रोवा एषयदग्निः तस्यै ते तनुवौ घोराऽन्या शिवाऽन्या इति ) हिंसक मूर्ति ही घोरा तनू, अनुग्राहक मूर्ती ती अघोरा, या उभयविध स्वरूपांतील जी तुझी अघोरा तनू जी अपाप काशिनि–पुण्य प्रकाशिनी म्हणूनच कल्याण करणारी अशा या तुझ्या कल्याण स्वरूपधारी मूर्तीनें तूं आमचें अज्ञान दूर कर. अनंत जन्मांचें संचित नाहींसें करून ब्रह्मज्ञानाला योग्य असें कर.

**टीप**— या मंत्राचा ऋषि काश्यप, देवता शंभू, स्वराडनुष्टुभ् छंद. कांहींच्या मतानें बृहति.

## यामिषुं गिरिशंत हस्ते बिभर्ष्यस्तवे । शिवां गिरित्र तां कुरु मा हिंसीः पुरुषं जगत् ॥४॥

**अर्थ:**—हे गिरीशंत, कैलासनिवासी शंकरा जो बाण तूं शत्रूवर प्रहार करण्यासाठीं धारण केलास तो बाण हे गिरित्र, वेद प्रतिपाद्य

तूं सर्वांशानें शांत कर. पुरुषं अस्मदीयं पुत्रपौत्रादि रूपम्, आमच्या मुलाबाळांचें, भावी संततीचें तसेंच जगत म्हणजे अस्मदीयम् गोमहीष्यादिकम् प्रहाराम क्षेत्रादिकंच मा हिंसीः. आमचीं गुरेंवासरें, जमीन जुमला वगैरे स्थावरजंगम संपत्तीचें तूं रक्षण कर.

**टीप**— या मंत्राचा ऋषि गौतम. कांहींच्या मतें गोधूम, देवता रुद्र. छंद निचृदनुष्टुभ्.

**शिवेन वचसा त्वा गिरिशाच्छा वदामसि ।**
**यथा नः सर्वमिज्जगदयक्ष्मꣳ सुमना असत् ॥ ५ ॥**

**अर्थ**—हे गिरिश, तुझी प्राप्ती व्हावी म्हणून चांगल्या शब्दांनीं तुझी मी प्रार्थना करतों. मंगलमय वाणीनें आम्ही प्रार्थना करतों. या प्रार्थनेमुळें आम्ही व आमचें सर्व जग, गाई वगैरे स्थावर जंगम रोगरहित आणि सुमना ( चांगल्या मनाचे ) होईल असें कर.

**टीप**— या मंत्राचा ऋषि गौतम, छंद गायत्री, देवता रुद्र.

**अध्यवोचदधिवक्ता प्रथमो दैव्यो भिषक् ।**
**अहीꣳश्च सर्वाञ्जम्भयन्सर्वाश्च यातुधान्यः ॥ ६ ॥**

**अर्थ**—सर्वान् अहीन् सर्प, व्याघ्र वगैरे हिंस्रश्वापदांचा तसेंच सर्वाश्च यातुधान्यः म्हणजे राक्षस जातीमध्यें निर्माण झालेल्या सर्व श्रेष्ठ पशुवृत्तींचा जंभयन् म्हणजे नाश करणारा तूं सर्व देवांमध्यें सर्वश्रेष्ठ आणि मुख्य आहेस म्हणून तुला देवांचा वैद्य धन्वंतरी म्हणण्यांत

येतें. तेव्हां तूं मला आपला असें म्हण. माझ्या बाबतींत तुझी ममत्व-बुद्धि निर्माण झाली म्हणजे अर्थातच इतरांचीही ती होईल. [ या मंत्रांत, यातुधान्य हा शब्द अत्यंत महत्त्वाचा आहे. नितरां धीयते इति धानी यातयन्ति इति यातयः यातयन्ति दुःखयन्ति निवासेन इति यातुधानी– ( अनंत जन्म सञ्चिताः वासनाः ताः यत्र निधीयन्ते ताः यातुधान्यः )

टीप— या मंत्राचा ऋषि कण्व, छंद अनुष्टुभ्, आणि देवता शंभु.

## असौ यस्ताम्रो अरुण उत बभ्रुः सुमङ्गलः ।
## ये चेमाᳪं रुद्रा अभितो दिक्षु श्रिताः सहस्रशो
## वैषाᳪं हेड ईमहे ॥ ७ ॥

अर्थः—पूर्वीच्या आतापर्यंतच्या मंत्रांत वर्णन केलेल्या परोक्ष शंकराचेंच वर्णन आतां प्रत्यक्ष स्वरूपांत करत आहेत. असौ म्हणजे हा वर आकाशांमध्यें दिसणारा ताम्रः म्हणजे अरुण वर्णाचा सूर्य हाच आदित्यरूप रुद्र उदयाच्या वेळीं ताम्र, उदयानंतर अरुण वर्णाचा व त्यानंतर बभ्रुः म्हणजे पिंगल वर्णाचा आणि सुमंगलः म्हणजे सम्यक् चांगल्या तऱ्हेनें मंगल करणारा किंवा अनेक वर्णांचा असा हा सूर्य स्वरूपामध्यें प्रत्यक्ष रुद्रच आहे. तसेंच आजूबाजूच्या सर्व दशदिशांना व्यापून उरणारे इतर अनंत जे रुद्र आहेत, सूर्याचें किरण, हें सर्व जग व्यापतात. म्हणून त्यांना रुद्र असेंही म्हटलें आहे. या सर्वांचा हेडः म्हणजे क्रोध ईमहे अवेमहे भाक्तिपूर्वक नमस्कार करून त्यांचा क्रोध दूर करतो.

टीप— या मंत्राचा ऋषि काल–कांहींच्या मतें मरुत्वान, छंद आस्तारंपाक्ति, देवता आदित्यस्वरुप रुद्र.

असौ योऽवसर्पति नीलग्रीवो विलोहितः।
उतैनं गोपा अदृशन्नदृशन्नदहार्यः। उतैनं
विश्वा भूतानि स दृष्टो मृडयाति नः ॥ ८ ॥

अर्थः— जो नीलग्रीव नीलकंठ वर्णाचा रुद्र तोच विशेष करून लोहित वर्णाचा, आरक्त वर्णाचा अवसर्पति आकाशांत संचार करतो. आकाशांत संचार करणाऱ्या सूर्यरूपी रुद्राला म्हणूनच सर्व गोपाः म्हणजे गुराखी आणि उदहार्यः पाणी नेणाऱ्या घटदासी याही पाहूं शकतात.

टीप— या मंत्राचा ऋषि मरुत्वान्, देवता आदित्यरूपी भगवान्-छंद षटपदजगति.

टीप—या मंत्राचा योग दृष्टीनेंही अर्थ महत्त्वाचा आहे. गोपः याचा अर्थ इंद्रियांचा संयम करणारे योगी ध्यानावस्थित होऊन ज्याला पाहूं शकतात, म्हणजे योग्यांना जो ध्यानगम्य आहे तो.

नमो अस्तु नीलग्रीवाय सहस्राक्षाय मीढुषे।
अथो ये अस्य सत्त्वानोऽहं तेभ्योऽकरं नमः ॥ ९ ॥

अर्थः— कालकूट विष प्राशनानें ज्याचा कंठ नीलवर्णाचा झाला आहे अशा शंकराला आणि सहस्राक्ष म्हणजे असंख्य डोळे ज्याला

आहेत अशा शंकराला नमस्कार असो. तसेंच याची सेवा करणारे जे सेवक आणि त्यांना सुद्धां मी नमस्कार करतों.

टीप—या मंत्राचा ऋषि भगवान् शंभु. देवताही शंभूच. छंद-अनुष्टुभ्.

**प्रमुञ्च धन्वनस्त्वमुभयोरार्त्नियोर्ज्याम् ।**
**याश्चं ते हस्त इषवः परा ता भगवो वप ॥१०॥**

अर्थः— हे भगवन्, महदैश्वर्यसंपन्न तुझ्या धनुष्याची दोरी सोडून ठेव. आणि तुझ्या हातांत तुझे बाण आहेत तेही टाकून दे.

टीप—या मंत्राचा ऋषि नारद, देवता श्रीरुद्र, छंद, अनुष्टुभ्. या मंत्रांत आलेल्या ' भगव ' शब्दाचा अर्थ खाली दिलेल्या कारिकेंत आहे.

ऐश्वर्यस्य समग्रस्य धर्मस्य यशसः श्रियः
ज्ञानवैराग्ययोश्चैव षण्णाम् भग इतीरणा.

**अवतत्य धनुस्त्वँ सहस्राक्ष शतेषुधे ।**
**निशीर्य शल्यानां मुखा शिवो नः सुमना भव ॥११॥**

अर्थः— हे सहस्राक्ष, हे शतेषुधे असंख्य भाते असलेल्या हे रुद्रा, तुझ्या धनुष्याची दोरी शिथिल करून तुझ्या बाणांची टोकें बोथट कर. आणि आमच्याकडे चांगल्या दृष्टीनें पहा आणि आमच्या बाबतींत तूं कल्याणप्रद हो.

टीप—या मंत्राचा मुनि नारद-देवता श्रीरुद्र-छंद अनुष्टुभ्.

विज्यं धनुः कपर्दिनो विशल्यो बाणवाँ॑ उत ।
अनेशन्नस्येषव आभुरस्य निषङ्गाथिः ॥ १२ ॥

अर्थः—कपर्दिनः जटाधारी शंकराचें धनुष्य विज्य म्हणजे दोरीपासून अलग झालेलें असो. तसेंच शंकराचे भाते हे बाणरहित होवोत. या शंकराचे बाण भात्यामध्यें ठेवलेले दुसऱ्याचा वेध करण्याचे बाबतींत असमर्थ ठरोत. तसेंच या शंकराचा निषंगथि—म्हणजे तलवार खड्ग् यांचे सामर्थ्य कमी होवो.

टीप—या मंत्राचा मुनि नारद—देवता श्रीरुद्र छंद—अनुष्टुभ्.

या ते हेतिर्मीढुष्टम हस्ते बभूव ते धनुः ।
तयाऽस्मान्विश्वतस्त्वमयक्ष्मया परिभुज ॥ १३ ॥

अर्थः—हे भक्तवत्सल, भक्तांच्या कामना पूर्ण करणाऱ्या देवा, ज्या तुझ्या हेति म्हणजे धनुष्यादि आयुधें ही शांत करून शांत अशा या तुझ्या आयुधांनीं—अनुपद्रवकारी आयुधांनीं आमचें या जगांत सर्वांपासून रक्षण कर.

टीप—या मंत्राचा ऋषि भगवान्, देवता—भगवान्, छंद अनुष्टुभ्.

नमस्ते अस्त्वायुधायानातताय धृष्णवे ।
उभाभ्यामुत ते नमो बाहुभ्यां तव धन्वने ॥ १४ ॥

**अर्थः**—हे रुद्र, न ताणलेल्या तुझ्या धनुष्यरूप आयुधाला आणि बाणरूप आयुधाला नमस्कार असो. धैर्यशाली ( समर्थ ) अशा या तुझ्या बाहूंना नमस्कार असो.

**टीप**—या मंत्राचा ऋषि भगवान्, देवता भगवान्, छंद अनुष्टुभ्.

**परि॑ ते॒ धन्व॑नो हे॒ति॒रस्मान्वृ॑णक्तु वि॒श्वतः॑ ।**
**अथो॒ य इ॑षु॒धिस्तवा॒ऽऽरे अ॒स्मन्नि धे॑हि॒ तम् ॥१५॥**

**अर्थः**—हे रुद्र, तुझ्या आयुधाच्या बाणरूप शल्यापासून आमचे रक्षण कर. तुझा भाता आमच्यापासून दूर ठेव.

**टीप**—या मंत्राचा ऋषि भगवान्, देवता भगवान्, छंद अनुष्टुभ्.

**इति श्रीरुद्रार्थदीपिकायां प्रथमोऽनुवाकः ॥**

## अनुवाक दुसरा.

पहिल्या अनुवाकांत धनुष्यबाण धारण केलेली श्रीशंकराची प्रधानतनु म्हणजे मूर्ति हिचीच प्रामुख्यानें स्तुति केली आहे. या पुढील आठही अनुवाकांत श्रीशंकराचे सर्वांतरव्यापित्व व सर्वगामित्व मुख्यतः सांगावयाचे आहे. पुढील अनुवाकामध्यें सर्व मंत्र यजुःस्वरूप आहेत. म्हणजे यजुर्वेदांतर्गत आहेत. हे मंत्र दोन प्रकारचे, मंत्राच्या आरंभीं व शेवटीं 'नमः' शब्द असणारे व मंत्राच्या आरंभींच 'नमः' शब्द असणारे अशा दोन्ही स्वरूपांतील म्हणजे उभयतो नमस्कारात्मक [ मंत्रादौ मंत्रान्ते च ] व अन्यतो नमस्कारात्मक [ मंत्रादावेव ] असे आहेत. त्यापैकीं सुरुवातीला उभयतो नमस्कारात्मक मंत्र या दुसऱ्या अनुवाकांत सुरू होत आहेत. दुसऱ्या अनुवाकांतील

पहिला मंत्र—

**नमो हिरण्यबाहवे सेनान्यें**
**दिशां च पतये नमः ॥ १ ॥**

**अर्थः**—सुवर्णनिर्मित अलंकार हे ज्याच्या बाहूमध्यें आहेत अशा व युद्धामध्यें सेना संचलन व नियमन करणारा जो सेनानी त्याचें स्वरूप धारण करणाऱ्या आणि दिशांचा जो अधिपति आहे अशा शंकराला नमस्कार.

**टीप**—नमो हिरण्यबाहवे या अनुवाकाचा ऋषि मंडूक, देवता रुद्र आणि छंद महागायत्री.

नमो॑ वृक्षेभ्यो॒ हरि॑केशेभ्यः

पशूनां॒ पत॑ये॒ नमः॑ ॥ २ ॥

**अर्थः**—हिरवीगार पानें ज्या वृक्षाची आहेत त्या वृक्षस्वरूप रुद्राला नमस्कार आणि पशूंचा म्हणजे साऱ्या प्राणसृष्टीचा जो पालन-कर्ता त्याला नमस्कार.

**टीप**—या मंत्रांतील वृक्ष शब्द आणि हरिकेश हा शब्द महत्त्वाचा आहे. वृक्ष शब्दानें संसारवृक्ष व हरिकेश शब्दानें त्रिगुण—सत्त्व- रज–तम हे घ्यावयाचे. त्रिगुणोद्भव संसारवृक्ष हा गीतेंत सांगित्याप्रमाणें । उर्ध्वमूलमधः-शाखम् । असा आहे. अशा संसाररूप वृक्षस्वरूपी रुद्राला नमस्कार या मंत्रांत अभिप्रेत आहे.

नमः॑ स॒स्पिञ्ज॑राय॒ त्विषी॑मते

पथी॒नां पत॑ये॒ नमः॑ ॥ ३ ॥

**अर्थ**—बालतृणाप्रमाणें ( कोवळ्या गवताप्रमाणें ) अनेक वर्णांच्या तेजस्वी शरीर धारण करणाऱ्या लौकिक आणि वैदिक अशा उभय-विध मार्गांचा प्रवर्तयिता ( प्रवृत्ति करणारा ) प्रवर्तक असलेल्या शंकराला नमस्कार असो.

**टीप**—या अनुवाकाचा ऋषि मंडूक, देवता रुद्र, छंद महागायत्री.

नमो॑ बभ्लु॒शाय॑ विव्या॒धिनेऽन्ना॑नां॒

पत॑ये॒ नमः॑ ॥ ४ ॥

अर्थः--बिभर्ति रुद्रम् इति बभ्रुः म्हणजे वृषभ (नंदी) त्याच्या-वर जो बसतो तो बभ्लुश—त्याला म्हणजे वृषभारूढ शंकराला आणि विव्याधी, विशेषेकरून वध करणाऱ्या शंकराला नमस्कार, आणि अन्नांचा अधिपति असलेल्या रुद्राला नमस्कार असो.

टीप—या अनुवाकाचा ऋषि मंडूक, देवता रुद्र, छंद महागायत्री.

नमो॒ हरि॑केशायोपवी॒तिने॑
पु॒ष्टा॒नां॒ पत॑ये॒ नमः॑ ॥ ५ ॥

अर्थः—हरिकेशाय नीलवर्णाचा केशसंभार ज्याचा आहे अशा शंकराला नमस्कार. आणि मंगल म्हणून यज्ञोपवीत धारण करणाऱ्या रुद्राला नमस्कार. तसेंच पुष्टांनां म्हणजे परिपूर्ण गुण ज्यांच्या जवळ आहेत अशांचा रक्षणकर्ता जो शंकर त्याला नमस्कार. [ कांहींच्या मतें पुष्ट शब्दाचा अर्थ पुष्टि असा आहे आणि अशा दहा पुष्टी सांगितलेल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणेंः—वाक्पुष्टिः, ज्ञानपुष्टिः, शरीरेंद्रियपुष्टिः, ग्रहक्षेत्रपुष्टिः, धनधान्यपुष्टिः, प्रजापुष्टिः, पशुपुष्टिः, ग्रामपुष्टिः, धर्मपुष्टिः, आणि अणिमादिपुष्टिरिति. ]

टीप—छंद–ऋषि–देवता पहिल्या मंत्राचे शेवटीं सांगितल्याप्रमाणें.

नमो॑ भ॒वस्य॑ हे॒त्यै
जग॑तां॒ पत॑ये॒ नमः॑ ॥ ६ ॥

अर्थः—भव म्हणजे संसार – त्याचा नाश करणाऱ्या आणि जगाचें पालन करणाऱ्या शंकराला नमस्कार. कांहींच्या मतें या मंत्रांत संसार छेदक अशा पंचमुखी शंकराचें वर्णन केलें आहे.

टीप—छंद–ऋषि–देवता मागीलप्रमाणें.

नमो॑ रु॒द्राया॑ऽऽतता॒विने॒
क्षेत्रा॑णां॒ पत॑ये॒ नमः॑ ॥ ७ ॥

अर्थः—आकृष्ट धनुष्यानें रक्षण करतो तो " आततावी " अशा सज्ज धनुष्य असलेल्या शंकराला नमस्कार आणि क्षेत्राणां पति म्हणजे शरीरांचें पालन करणाऱ्या किंवा अविमुक्तादि पुण्यक्षेत्रे; ( प्रयाग, काशी इ. ) यांचा अधिपति असलेल्या शंकराला नमस्कार.

टीप—ऋषि–देवता–छंद पहिल्या मंत्राप्रमाणें.

नमः॑ सू॒ताया॑हन्त्याय॒ वना॑नां॒ पत॑ये॒ नमः॑ ॥८॥

अर्थः—सूत म्हणजे सारथी आणि अहन्त्याय म्हणजे शत्रूंकडून ज्याचा नाश होऊं शकत नाहीं अशा आणि वनांचा पालन करणारा जो शंकर त्याला नमस्कार. [ कांहींच्या मतें जगद्रूपी यंत्र आहे ज्या रथाला अशा रथाचें नियंत्रण करणारा देव किंवा सूत म्हणजे पुराण सांगणारा. ]

टीप—ऋषि–देवता–छंद वरीलप्रमाणें.

नमो रोहिताय स्थपतये
वृक्षाणां पतये नमः ॥ ९ ॥

अर्थः—लोहित वर्णाचा जो स्थपति म्हणजे प्रभु शंकर त्याला आणि वृक्षांचें पालन करणाऱ्या रुद्राला नमस्कार. यांत वृक्ष शब्द स्थापयति वृश्चति अशा व्युत्पत्तींनी सिद्ध होतो.

टीप—ऋषि–देवता–छंद वरीलप्रमाणें

नमो मन्त्रिणे वाणिजाय
कक्षाणां पतये नमः ॥ १० ॥

अर्थः—राजसभेमध्यें कुशल सल्ला देणाऱ्या आणि वाणिजाय पदार्थांचा विनिमय करणाऱ्यांचा अधिपति असणाऱ्या, तसेंच गहन अरण्याचें रक्षण करणाऱ्या रुद्राला नमस्कार असो. कांहींच्या मतें मंत्रि शब्दाचा अर्थ पांच ब्रह्मदेव असाही आहे.

टीप—ऋषि–देवता–छंद वरीलप्रमाणें.

नमो भुवन्तये वारिवस्कृतायौषधीनां
पतये नमः ॥ ११ ॥

अर्थः—भुवम् तनोति इति भुवन्तिः चतुर्दश भुवनें निर्माण करणाऱ्या आणि वारिवस्कृताय वरिवः म्हणजे धन तें निर्माण करणाऱ्या आणि अरण्यांचें रक्षण करणाऱ्या रुद्राला (रुद्रस्वरूप शंकराला नमस्कार). वारिवस्कृत या शब्दाचे आणखीही अर्थ आहेत. वरिवः म्हणजे परि-चर्या (सेवा.) ती करणारे भक्त, त्यांच्या बाबतींत भक्तवत्सल असा

एक अर्थ. दुसरा वारीणि म्हणजे पाण्यांत जो रहातो तो वारिवस्कृत म्हणजे विष्णुस्वरूप किंवा वरुणस्वरूप अशा रुद्राला नमस्कार.

**टीप**—ऋषि-देवता-छंद वरीलप्रमाणें.

## नमं उच्चैर्घोषायाऽऽक्रन्दयंते पत्तीनां पतंये नमंः ॥ १२ ॥

**अर्थः**— युद्धकालांत गगनभेदी ज्याचा ध्वनि होतो तो उच्चैर्घोष अशा, आक्रंदयते म्हणजे शत्रूंना रडवणाऱ्या आणि पत्ती म्हणजे पादचारी योद्धे त्यांचा पाति असणाऱ्या रुद्राला नमस्कार. पाति शब्दाचा अर्थ पुढील श्लोकांत सांगितला आहे.

एकोरथो गजश्चैको नरः पंचपदातयः।
त्रयश्च तुरगास्तज्ञैः पत्तिरित्यभिधीयते ॥

**टीप**—ऋषि-देवता-छंद वरीलप्रमाणें.

## नमंः कृत्स्नवीताय धावंते सत्त्वनां पतंये नमंः ॥ १३ ॥

**अर्थः**— संपूर्ण सैन्य ज्यानें वेढलेलें आहे, ज्यानें तो कृत्स्नवित सर्व सैन्यांचा अधिपति असणाऱ्या आणि युद्धांत पळणाऱ्या शत्रुसैन्याचा पाठलाग करणाऱ्या आणि शरणागतांचें रक्षण करणाऱ्या अशा शंकराला नमस्कार असो.

**टीप**—ऋषि-देवता-छंद-मागीलप्रमाणें.

इति श्रीरुद्रार्थदीपिकायां द्वितियोऽनुवाकः

## अनुवाक तिसरा.

तिसऱ्या अनुवाकामध्यें मागील अनुवाकांप्रमाणेंच मंत्राच्या आरंभीं आणि शेवटीं 'नमः' शब्द असलेलेच कांहीं मंत्र आहेत. त्यांतील पहिला मंत्र पुढीलप्रमाणें—

नमः सहमानाय निव्याधिने
आव्याधिनीनां पतये नमः ॥ १ ॥

**अर्थः**— शत्रूंचा पराभव करण्यामध्यें समर्थ असलेल्या आणि शत्रूंचा निश्चयानें निःपात करणाऱ्या शंकराला नमस्कार असो. आणि आपल्या कक्षेंतल्या तसेंच आजूबाजूला दूर असणाऱ्या सर्व शत्रूंचा निःपात करूं शकणाऱ्या शूर सेनेचा सेनापति असलेल्या शंकराला नमस्कार असो.

**टीप**—या अनुवाकस्वरुप मंत्राचा ऋषि महादेव, देवता-महादेव, छंद-बृहति.

नमः ककुभाय निषङ्गिणे स्तेनानां
पतये नमः ॥ २ ॥

**अर्थः**— श्रेष्ठतम आणि खड्ग हस्त अशा शंकराला नमस्कार. तसेंच चोरांचा अधिपाति असलेल्या शंकराला नमस्कार.

**टीप**—ह्या व अशा स्वरूपाच्या मंत्रांत स्तेनानाम् पति वगैरे जे शब्द येतात त्यांचा वाच्यार्थ घेऊं नये. मुख्यार्थाच्या अनुसंधानासाठीं लोकप्रसिद्ध

शब्द ऋषि वापरत असतात. परमात्मा दोन स्वरूपांनीं प्रत्येक पदार्थामध्यें, व्यक्तीमध्यें असतो. जीवस्वरूप आणि ईश्वरस्वरूप ही तीं दोन स्वरूपें होत. स्तेनादि शब्दांचा वाच्यार्थ चोर असा असला व तो निंद्य असला तरी या स्तेन शब्दानें वाच्यार्थ जो चोर तो न घेतां तो ईश्वर स्वरूपाचें अनुसंधान करणारा उपलक्षक समजावा, म्हणजे ईश्वराचा बोध करुन देणारा हा स्तेन शब्द आपामर प्रसिद्ध असल्यामुळें प्रसिद्ध शब्दांनीं ईश्वराचें अनुसंधान करणें सर्वांना सुलभ जातें. म्हणून स्तेन शब्द उच्चारला तरी त्याचा चोर असा वाच्यार्थ न घेतां लक्ष्यार्थ घ्यावयाचा. लक्ष्यार्थ ईश्वर आहे. हें वर सांगितलेंच आहे. अशा रीतीनें स्तेनसदृश शब्दांनीं होणारें ईश्वरस्मरण पापक्षय करणारे होतें, असें खुद्द सायणाचार्यही आपल्या भाष्यामध्यें सुचवितात.

**नमो निषङ्गिणे इषुधिमते**
**तस्कराणां पतये नमः ॥ ३ ॥**

**अर्थः**— धनुष्यावर शरसंधान करण्यासाठीं हातांत घेतलेला जो बाण तो निषङ्ग, बाण ठेवण्यासाठीं पाठीवर बांधलेला भाता त्याला इषुधि म्हणतात. ज्याच्या पाठीवर बाणांचा भाता आहे व ज्यानें हातांत बाण घेतलेला आहे अशा श्री शंकराला या मंत्रांत नमस्कार सांगितला आहे.

**नमो वञ्चते परिवञ्चते स्तायूनां पतये नमः ॥ ४ ॥**

**अर्थः**—प्रथम स्वतःबद्दल विश्वास निर्माण करून त्या विश्वासाचा फायदा म्हणून चोरी करणारा त्याला वञ्चक असें म्हणतात. अशा चोरीमध्यें बुद्धीचा उपयोग केला जातो. म्हणून याला बौद्धिक चोरी ( बुद्धीच्या आधारें करणारा ) म्हणतां येईल. आणि मिळेल

त्याची आणि मिळेल तिथें जो चोरी करतो त्याला 'परिवञ्चक' असें म्हणतात. समाजांत चोर आणि भुरटे चोर असे दोन प्रकार आढळतात. चोरांच्या समाजांत भुरटे चोर हे कमी दर्जाचे मानले जातात. तेव्हां अशा त्यांच्याही समाजांत उभयविध कनिष्ठ आणि श्रेष्ठ अशा स्वरूपांत असणाऱ्या श्री शंकराला नमस्कार. आतां स्तायू म्हणजे गुप्तचोर हे दोन प्रकारचे, गुप्त वेषानें रात्रीच्या वेळीं येऊन कपाट इ. फोडून जे चोरी करतात त्यांना स्तेन म्हणतात. हे आपल्या निवासस्थानापासून लांब अशा ठिकाणींच चोरी करतात, आणि मी तुमच्यांतलाच आहे असें भासवून जे चोरी करतात त्यांना स्तायू असें म्हणतात. स्तेन आणि स्तायू या स्वरूपांत असणाऱ्या व त्यांचे रक्षण करणाऱ्या श्री शंकराला नमस्कार.

## नमो॒ निचेर॒वे प॑रिच॒राया॑र॒ण्याना॒ं पत॑ये॒ नम॑: ॥ ५ ॥

**अर्थ:**—धन्याच्या घरांतच केव्हां बरं मी चोरी करूं शकेन ? मला तशी सुवर्णसंधि केव्हां प्राप्त होईल ? अशा विचारानें घरांत वावरणारा जो चोर त्याला निचेरव असें म्हणतात. येतां जातां बाजारांत व इतर सार्वजनिक ठीकाणीं चोरी करण्याच्या बुद्धीनें हिंडणारा तो परिचर, आणि एकट्या दुकट्या पांथस्थाला गांठून त्याचें सर्वस्व अपहरण करणारे ते अरण्यचोर. ते नेहमीं अरण्यांतच रहातात, अशा त्रिविध चोरांचें पालन करणाऱ्या श्रीशंकराला नमस्कार.

## नम॑: सृका॒विभ्यो॒ जिघा॑ꣳसद्भ्यो
## मुष्ण॒तां पत॑ये॒ नम॑: ॥ ६ ॥

**अर्थः**—सृक शब्द हा वज्रवाची आहे. शस्त्रधारी चोरांना सृकावि म्हणतात. ठार करून चोरी करणारे त्यांना जिघांसक म्हणतात. शेतीचा पेशा असणारे आणि प्रसंगानें मालकाचें धान्य चोरणारे त्यांना धान्यचोर (मुष्णन्तः) असें म्हणतात. या सर्वांचा अधिपति असणाऱ्या श्री शंकराला नमस्कार.

नमोऽसिमद्भ्यो नक्तं चरद्भ्यः
प्रकृन्तानां पतये नमः ॥ ७ ॥

**अर्थः**— नेहमीं खड्गधारी चोर आणि रात्रीं अपरात्रीं नगरांत हिंडून चोरी करणारे ते नक्तंचर, या दोघांचा अधिपति श्री शंकर त्याला नमस्कार. आणि ठार मारून चोरी करणारे त्यांना प्रकृन्त असें म्हणतात. त्यांचाही पालक अशा श्री शंकराला नमस्कार.

नम उष्णीषिणे गिरिचराय
कुलुञ्चानां पतये नमः ॥ ८ ॥

**अर्थः**— मुंडासे बांधलेल्या खेडुताप्रमाणें स्वतः मुंडासे बांधून त्यांच्यांत वावरणाऱ्या आणि लाकूडफांटा आणण्यासाठीं डोंगरांत गेलेल्या लोकांचें वस्त्र अपहरण करण्यासाठीं त्यांच्यांत संचार करणाऱ्या श्री शंकराला नमस्कार असो. तसेंच घरें, शेतीवाडी वगैरे हरण करणाऱ्या चोरांचा अधिपति असलेल्या श्री शंकराला नमस्कार.

नम इषुमद्भ्यो धन्वाविभ्यश्च वो नमः ॥ ९ ॥

**अर्थः**— बाण धारण करणाऱ्या बाणधारी आणि धनुर्धारी अशा तुम्हांला नमस्कार असो.

**टीपः**—या मंत्रांत प्रत्यक्ष अनेक रूपांत वावरणाऱ्या अनेक रुद्र देवांना नमस्कार सांगितलेला आहे. याच्या पूर्वींच्या मंत्रांत त्यांच्या पतीला नमस्कार होता. लोकशासनासाठीं स्वतः श्री शंकर अनेक रूपें धारण करुन त्या त्या ठिकाणीं वावरत असे. आणि त्यांना वाईट कृत्याबद्दल शिक्षा देऊन वा पश्चात्ताप निर्माण करुन चुकलेल्यांना मार्गावर आणणें व समाजधारणा स्थिर करणें हेंच श्री शंकराचें कार्य, ते ते वेष धारण करुन त्यांच्या त्यांच्यात मिसळल्यामुळें कोण कशी चोरी करतो कोणत्या पद्धतीनें करतो हें आपोआपच शंकराच्या निदर्शनाला येत असे. त्यांचे मार्ग कोणते, युक्त्या कोणत्या, पद्धति कशा इ. गोष्टींचें सूक्ष्म ज्ञान समाजनेत्याला आवश्यकच होय. ह्या पुढील मंत्रांत प्रत्यक्ष रुद्र स्वरूपांत वावरणाऱ्या अनेकविध रुद्र देवांना नमस्कार सांगितला आहे, हें मागें येऊन गेलेंच आहे.

**नम॑ आतन्वा॒नेभ्यः॑ प्रति॒दधा॑नेभ्यश्च**
**वो॒ नमः॑ ॥ १० ॥**

**अर्थ**—धनुष्यावर प्रत्यंचा ( दोरी ) चढविणाऱ्या आणि शर-संधान करणाऱ्या तुम्हाला नमस्कार.

**नम॑ आ॒यच्छ॑द्भ्यो वि॒सृजद्भ्य॑श्च वो॒ नमः॑ ॥११॥**

**अर्थ**—धनुष्याची दोरी ताणणारे ते आयछन्त रुद्र आणि बाण सोडणारे ते विसृजन्त रुद्र अशा तुम्हाला नमस्कार असो.

**नमोऽस्य॑द्भ्यो॒ विध्य॑द्भ्यश्च वो॒ नमः॑ ॥१२॥**

**अर्थ**—लक्ष्यापर्यंत बाण सोडणाऱ्या आणि लक्ष्यापर्यंत गेलेल्या बाणाला लक्ष्यांत घुसवणाऱ्या तुम्हाला नमस्कार.

## नम॒ आसीनेभ्य॒: शया॑नेभ्यश्च वो॒ नम॑: ॥१३॥

**अर्थ**—बसलेल्या आणि झोपलेल्या अशा उभय स्थितींत असणाऱ्या तुम्हाला नमस्कार.

## नम॑: स्व॒पद्भ्यो॒ जाग्र॑द्भ्यश्च वो॒ नम॑: ॥१४॥

**अर्थ**—झोंपी गेलेल्या आणि जागृत अवस्थेंत असलेल्या म्हणजे सुषुप्ति आणि जागृति अशा दोन्ही अवस्थांत असलेल्या तुम्हाला नमस्कार.

## नम॒स्तिष्ठ॑द्भ्यो॒ धाव॑द्भ्यश्च वो॒ नम॑: ॥ १५ ॥

**अर्थ**—उभे राहणाऱ्या आणि धांवणाऱ्या तुम्हाला नमस्कार.

## नम॑: स॒भाभ्य॑: स॒भाप॑तिभ्यश्च वो॒ नम॑: ॥ १६ ॥

**अर्थ**—एकत्र येऊन संघश: बसलेल्या आणि त्यांचे अधिपति असलेल्या तुम्हाला नमस्कार.

## नमो॒ अश्वे॒भ्योऽश्व॑पतिभ्यश्च वो॒ नम॑: ॥ १७ ॥

**अर्थ**—अश्वशरीरेभ्यः घोडयांचे शरीर असणाऱ्या आणि त्यांचे अधिपति असणाऱ्या तुम्हाला नमस्कार.

**टीप**— कांहींच्या मतें अश्व या शब्दाचा अर्थ न विद्यते स्वम् धनम् येषाम् ते अश्वः निष्कांचन असाहि अर्थ. स आणि श यांच्यामध्यें कोणी भेद मानीत नाहींत. कांहींजण स आणि श यांच्यात अभेद मानण्यापेक्षां न विद्यते श्वस्तनम् धनम् येषाम् ते अश्वः असाहि अर्थ करतात. हे सर्व रुद्र श्री शंकराचे अनुचर किंवा त्याचेच लीलाविग्रह विशेष होत.

इति श्रीरुद्रार्थदीपिकायां तृतीयोऽनुवाकः ।

---

## अनुवाक चौथा.

या अनुवाकापासून क्रिया गुण आणि द्रव्य या विषयांचें आधिपत्य ( रुद्राचें ) वर्णन केलेलें आहे. प्रत्यक्ष रुद्राला आणि त्यांच्या समुदायाला नमस्कार केलेला आहे.

**नम आव्याधिनीभ्यो विविध्यन्तीभ्यश्च वो नमः ॥१॥**

**अर्थ**—आसमंतांत असणाऱ्या शत्रूंचा नाश करण्यास समर्थ असलेल्या इतकेच नव्हे तर विशेष प्रकारानें नाश करण्यास समर्थ असलेल्या तुम्हाला नमस्कार.

**टीप**—या अनुवाकाचा ऋषि दुर्वास, देवता शंभू, छंद उष्णिक्.

**नम उगणाभ्यस्तृंहतीभ्यश्च वो नमः ॥ २ ॥**

**अर्थ**—उत्कृष्टगणरूपः सप्तमातृकाद्यः स्त्रियः उगणः उत्कृष्ट गण असलेल्या, आणि हिंसा करण्यास समर्थ असलेल्या अशा दुर्गाप्रभृति उग्र देवता त्या तृंहती, अशा उभय स्वरूपांतील हे रुद्र देवांनो, तुम्हाला नमस्कार.

**टीप**—" पत्त्यंगैस्तृगणैः सर्वैः क्रमादाख्या यथोत्तरम् । सेनामुखम् गुल्मगणौ " इति गणलक्षणम्

**नमो गृत्सेभ्यो गृत्सपतिभ्यश्च वो नमः ॥ ३ ॥**

**अर्थः**—गर्धनशील ते गृत्स, विषयलंपट त्यांना आणि त्यांचे अधिपति असलेल्या तुम्हाला नमस्कार.

## नमो व्रातेभ्यो व्रातपतिभ्यश्च वो नमः ॥ ४ ॥

**अर्थः**— नाना जातींचे संघ म्हणजे व्रात त्यांना आणि त्यांचे जे अधिपति ते व्रातपति त्यांना नमस्कार.

## नमो गणेभ्यो गणपतिभ्यश्च वो नमः ॥ ५ ॥

**अर्थः**— प्रमथादि जे भूतगण आणि त्यांचा पति तो गणपति अशा उभयविध स्वरूपांत असलेल्या तुम्हाला नमस्कार.

## नमो विरूपेभ्यो विश्वरूपेभ्यश्च वो नमः ॥ ६ ॥

**अर्थः**— विकृत रूप धारण करणाऱ्या नग्न मुंडादि भृत्य आणि तुरंग गज वक्त्रादि नाना तऱ्हेचीं रूपें धारण करणारे जे भृत्य त्यांना नमस्कार.

## नमो महद्भ्यः क्षुल्लकेभ्यश्च वो नमः ॥ ७ ॥

**अर्थः**—अणिमादि सिद्धीमुळें प्राप्त होणारें जें ऐश्वर्य तें ज्यांच्या जवळ आहे ते महान्, क्षुद्रसिद्धियुक्त ते क्षुल्लक अशा उभयविध रुद्रांना नमस्कार.

## नमो रथिभ्योऽरथेभ्यश्च वो नमः ॥ ८ ॥

**अर्थः**—रथारूढ असणाऱ्या आणि रथा विरहित असणाऱ्या अशा श्री रुद्रांना नमस्कार.

## नमो रथेभ्यो रथपतिभ्यश्च वो नमः ॥ ९ ॥

**अर्थः**—रथस्वरूप असणाऱ्या आणि रथावयवभूत असणाऱ्या रुद्राला नमस्कार—

**टीप**—महाभारतांमध्यें 'हयांश्च चतुरो वेदान्सर्वदेवमयं रथम्' । अशी रथ शब्दाची व्याख्या केली आहे. भविष्यपुराणांतही अर्कोऽब्जनेमिर्वेदाश्वस्त्रयस्त्रिंशन्मरुन्मयः पुरारे कल्पितो दैवैः सरथो ब्रह्मसारथिः । असें रथ शब्दाचें निर्वचन आढळून येतें. रथपति म्हणजे रथस्वामी.

## नमः सेनाभ्यः सेनानिभ्यश्च वो नमः ॥ १० ॥

**अर्थः**—सेनास्वरूप रुद्राला नमस्कार आणि सेनेचें नेतृत्व करणाऱ्या रुद्राला नमस्कार.

## नमः क्षत्तृभ्यः संग्रहीतृभ्यश्च वो नमः ॥ ११ ॥

**अर्थः**—रथ कसे करावेत याचें शिक्षण देणाऱ्या आणि रथ चालवावेत कसे याचें शिक्षण देणाऱ्या रुद्राला नमस्कार [ संगृहीतृभ्यः ये रश्मीन् संगृह्णन्ती यावरून रथ चालविण्याचें शिक्षण देणारे ते रुद्र असा अर्थ होतो. ] .

## नमस्तक्षभ्यो रथकारेभ्यश्च वो नमः ॥ १२ ॥

**अर्थ**:—तक्षक म्हणजे रंधा मारणारे. तक्षणकुशल आणि रथकार म्हणजे रथ निर्माण करणारे या सर्वांच्या ठिकाणीं दैवी शक्ति असते या भावनेनें या सर्वांना नमस्कार केला आहे. सायुध रथ युद्धांत जाण्यासाठीं आवश्यक त्या शस्त्रांसह जो रथ निर्माण करतो तो रथकार.

## नमः कुलालेभ्यः कर्मारेभ्यश्च वो नमः ॥ १३ ॥

**अर्थ**:—मातीचे घट निर्माण करणारे जे कुंभकार—कुंभं करोति इति कुंभकारः। म्हणजेच कुंभार—त्यांना आणि कर्मारेऽभ्यः म्हणजे लोहकार म्हणजे लोहार यांनाहि समाजघटकाच्या दृष्टीनें उपयुक्तता आहे म्हणून नमस्कार.

**टीप**— यावरून तत्कालीन ग्रामरचनेची कल्पना येते. आज ही अठरा बलुत्यांची पद्धत लुप्त झाली- परंतु त्याचें पुनरुज्जीवन होणें आवश्यक वाटतें.

## नमः पुञ्जिष्टेभ्यो निषादेभ्यश्च वो नमः ॥ १४ ॥

**अर्थ**:—पक्षिसमुदायांचा वध करणारे ( जाळ्यांत पकडून ) आणि निषाद म्हणजे मत्स्यघाती म्हणजे मासे मारणारे या दोघांनाहि नमस्कार.

## नमः इषुकृद्भ्यो धन्वकृद्भ्यश्च वो नमः ॥ १५ ॥

**अर्थः**—चांगले बाण आणि चांगलीं धनुष्यें करणाऱ्या रुद्राला नमस्कार.

## नमो मृगयुभ्यः श्वनिभ्यश्च वो नमः ॥ १६ ॥

**अर्थः**—मृगयु म्हणजे पशूंची शिकार करणारे आणि श्वनिभ्यः म्हणजे कुत्र्यांच्या गळ्यांत दोरी बांधून त्यांना पाळणारे ( शिकारी-करितां ) अशा रुद्राला नमस्कार.

## नमः श्वभ्यः श्वपतिभ्यश्च वो नमः ॥ १७ ॥

**अर्थः**—कुत्र्यांचें रूप धारण करणाऱ्या आणि त्यांचा अधिपति असणाऱ्या अशा उभयविध रुद्राला नमस्कार.

**टीप**—आतांपर्यन्त दुसऱ्या अनुवाकांत लीलार्थ अनेक देवतांच्या मूर्ति धारण करणाऱ्या रुद्राची स्तुति, तिसऱ्या अनुवाकांत चोरी करणाऱ्यांचीच प्राधान्यानें स्तुति आहे आणि प्रस्तुत चौथ्या अनुवाकांत नाना जातींतल्या मूर्तींचें प्राधान्य आहे.

इति श्रीरुद्रार्थदीपिकायां चतुर्थोऽनुवाकः ।

## अनुवाक पांचवा.

आतांपर्यंतच्या अनुवाकांत आदी आणि अन्ती म्हणजे आरंभीं आणि शेवटीं नमः शब्द असणारेच मंत्र होते. आतां यापुढील अनुवाकांत नवव्या अनुवाकापर्यंत आरंभीं नमः शब्द असणारे कांही यजुर्मंत्र सांगावयाचे आहेत. त्यांतील पहिला मंत्र पुढीलप्रमाणें —

### नमो भवाय च रुद्राय च ॥ १ ॥

**अर्थ**—भवन्ति प्राणिनः अस्मात् इति भवः । सर्व प्राणिमात्र आणि चराचर विश्व ज्याच्यापासून निर्माण होतें त्या शंकराला आणि रुद्राला ( रोदनहेतुभूतम् दुःखम् द्रावयाति इति रुद्रः ) दुःख हरण करणाऱ्या शंकराला नमस्कार.

**टीप**—हा व पुढील नमो ज्येष्ठायच या दोन्ही अनुवाकस्वरूप मंत्राचा ऋषि–ऋषि–देवता–शंभू–छंद–महाविराट.

### नमः शर्वाय च पशुपतये च ॥ २ ॥

**अर्थ**—सर्व पाप हरण करणाऱ्या आणि पशूसमान अज्ञानी लोकांचें पालन करणाऱ्या देवाला नमस्कार.

### नमो नीलग्रीवाय च शितिकण्ठाय च ॥ ३ ॥

**अर्थः**—कालकूट प्राशनानें ज्याचा कंठ नीलवर्णाचा झाला आहे तो नीलकंठ त्याला नमस्कार आणि जो शितिकंठ आहे ( गौर वणाचा ज्याचा कंठ आहे ) त्याला नमस्कार.

## नमः कपर्दिने च व्युप्तकेशाय च ॥ ४ ॥

अर्थः—जटाधारी शंकराला नमस्कार. आणि मुंडितकेश ज्याचे आहेत, त्याला म्हणजे मुंडन केलेल्या शंकराला नमस्कार.

## नमः सहस्राक्षाय च शतधन्वने च ॥ ५ ॥

अर्थः—इंद्ररूपानें सहस्राक्ष म्हणजे हजार डोळे असलेल्या आणि असंख्य धनुष्यें धारण केलेल्या शंकराला नमस्कार.

## नमो गिरिशाय च शिपिविष्टाय च ॥ ६ ॥

अर्थः—कैलासावर राहणाऱ्या शंकराला नमस्कार आणि विष्णुस्वरूप असलेल्या शंकराला नमस्कार.

## नमो मीढुष्टमाय चेषुमते च ॥ ७ ॥

अर्थः—मेघांच्या रूपानें अतिशय वर्षाव करणारा तो मीढुष्टम ( पाऊस पाडणारा ) त्याला आणि बाण धारण करणाऱ्या शंकराला नमस्कार.

## नमो ह्रस्वाय च वामनाय च ॥ ८ ॥

अर्थः—ठेंगू असलेल्या शंकराला नमस्कार आणि वामन म्हणजे हातपाय इत्यादि अवयव ज्याचे अल्प आहेत त्याला नमस्कार.

टीप—ऱ्हस्व म्हणजे शरीराची उंची कमी असणें आणि वामन म्हणजे अवयव लहान असणें.

## नमो॑ बृह॒ते च॒ वर्षी॑यसे च ॥ ९ ॥

अर्थः—आकारानें मोठा तो बृहत् आणि गुणांनीं समृद्ध तो वर्षीयान्. आकारानें विशाल असलेल्या आणि गुणांनींही समृद्ध असलेल्या शंकराला नमस्कार. ( आकारसदृशः प्रज्ञा प्रज्ञया सदृशागमः ) ही कालिदासोक्ति प्रसिद्धच आहे. )

## नमो॑ वृ॒द्धाय॑ च सं॒वृध्व॑ने च ॥१०॥

अर्थः—वयानें वृद्ध असलेल्या आणि ज्ञानानेंही वृद्ध असलेल्या शंकराला नमस्कार. वृद्ध म्हणजे वयानें वृद्ध आणि संवृध्वा म्हणजे ज्ञानानें वृद्ध. वयोवृद्ध आणि ज्ञानवृद्ध अशा शंकराला नमस्कार.

## नमो॒ अग्रि॑याय च प्र॒थमा॑य च ॥११॥

अर्थः—जगाच्या उत्पत्तिपूर्वीं असणाऱ्या आणि सभेमध्यें मुख्य असलेल्या शंकराला नमस्कार.

## नम॑ आ॒शवे॑ चाजि॒राय॑ च ॥ १२ ॥

अर्थः—सर्वव्यापी आणि कुशल आणि गतिकुशल असणाऱ्या शंकराला नमस्कार.

नमः शीघ्रियाय च शीभ्याय च ॥१३॥

**अर्थः**—शिघ्रियः म्हणजे शीघ्रगामी आणि शीभ्य म्हणजे उदक-प्रवाहामध्यें असणारा. शीभ शब्दाचा अर्थ उदकप्रवाह. तत्र स्थितः शीभ्यः शीघ्रगामी आणि उदक-प्रवाह-स्थित अशा शंकराला नमस्कार.

नम ऊर्म्याय चावस्वन्याय च ॥ १४ ॥

**अर्थः**—तरंगाकार असणाऱ्या आणि निस्तरंगाकार असणाऱ्या शंकराला नमस्कार.

नमः स्रोतस्याय च द्वीप्याय च ॥१५॥

**अर्थः**—प्रवाहांत असलेल्या आणि द्वीपप्रदेशावर असलेल्या ( जलमध्यवर्ति प्रदेशावर ) शंकराला नमस्कार.

इति श्रीरुद्रार्थदीपिकायां पंचमोऽनुवाकः ।

---

## अनुवाक सहावा.

### नमो ज्येष्ठाय च कनिष्ठाय च ॥ १ ॥

**अर्थः—** विद्या आणि ऐश्वर्य यांनीं युक्त असलेला तो जेष्ठ. आणि यांनीं रहित असलेला तो कनिष्ठ. अशा उभयस्वरूप शंकराला नमस्कार.

### नमः पूर्वजाय चापरजाय च ॥ २ ॥

**अर्थः**—जगाच्या आरंभीं हिरण्यगर्भ रूपानें उत्पन्न झालेल्या आणि जगदुत्पत्तिनंतर जगाच्या अवसानकालीं काल, अग्नि इत्यादि रूपांनीं असलेल्या शंकराला नमस्कार.

**टीप**—यांत सृष्टीच्या उत्पत्तीचें सूक्ष्म रहस्य सांगितलें आहे.

### नमो मध्यमाय चापगल्भाय च ॥ ३ ॥

**अर्थ**—मधल्या कालखंडांत देव, तिर्यक् इत्यादि स्वरूपांनीं निर्माण झालेल्या आणि अपगल्भ म्हणजे ज्याच्या इंद्रियांचा विकास झाला नाहीं अशा शंकराला नमस्कार.

### नमो जघन्याय च बुध्नियाय च ॥ ४ ॥

**अर्थ**—जघनांतून निर्माण झालेला तो जघन्य. आणि बुध्निय म्हणजे वृक्षांच्या मुळांतून निर्माण झालेला. जघन्य आणि बुध्निय अशा शंकराला नमस्कार.

**टीप**—जघन शब्दाचा अर्थ कटिपश्चात्‌भागः कमरेच्या पाठीमागचा भाग. गायीच्या पाठीमागच्या भागांतून निर्माण होणारे वासरूं त्याला जघन्य असें म्हणतात. अशा स्वरूपाच्या शंकराला नमस्कार.

## नमः सोभ्याय च प्रतिसर्याय च ॥ ५ ॥

**अर्थ**—मनुष्यलोकामध्यें निर्माण झालेल्या आणि विवाहकालीं हातांत रक्षाबंध धारण करणाऱ्या शंकराला नमस्कार.

**टीप**—सोभ शब्दाचा अर्थ मनुष्यलोक असा केला आहे. उभाभ्याम् पुण्यपापाभ्याम् सह वर्तत इति सोभः मनुष्य लोकः। अशी त्याची व्युत्पत्ति आहे. पुण्येन पुण्यलोकं जयति। पापेन पापम् उभाभ्यामेव मनुष्यलोकम् ॥ अशी आथर्वणिकांची उक्ति आहे.

## नमो याम्याय च क्षेम्याय च ॥ ६ ॥

**अर्थ**—यम लोकामध्यें असणाऱ्या शंकराला नमस्कार. आणि मोक्षकालीं असणाऱ्या शंकराला नमस्कार.

## नम उर्वर्याय च खल्याय च ॥ ७ ॥

**अर्थ**—उर्वरा म्हणजे सर्वसस्याढ्या भूमिः—धान्यसमृद्ध अशी जी भूमि—तिच्या स्वरूपांत असणाऱ्या शंकराला नमस्कार. आणि धान्य गोळा करण्याचा जो प्रदेश त्याला खल असे म्हणतात. तिथें असणारा तो खल्य त्यालाही नमस्कार.

## नमः श्लोक्याय चावसान्याय च ॥ ८ ॥

**अर्थ**—वेदप्रतिपाद्य अशा शंकराला नमस्कार. आणि वेदान्त-प्रतिपाद्य अशाही शंकराला नमस्कार. उपनिषदांत वर्णन केलेल्या अद्वैतस्वरूप शंकराला नमस्कार.

## नमो वन्याय च कक्ष्याय च ॥ ९ ॥

**अर्थ**—अरण्यामध्यें वृक्ष इत्यादि रूपानें असलेल्या आणि लता वगैरे स्वरूपानें असणाऱ्या शंकराला नमस्कार.

## नमः श्रवाय च प्रतिश्रवाय च ॥ १० ॥

**अर्थ**—ध्वनिस्वरूपानें असणाऱ्या आणि प्रतिध्वनिस्वरूपानें असणाऱ्या शंकराला नमस्कार.

**टीप**—या उल्लेखावरून ध्वनि-विज्ञानाची सूक्ष्म प्रक्रिया ऋषींना माहिती होती हें यावरून दिसतें.

## नम आशुषेणाय चाऽऽशुरथाय च ॥ ११ ॥

**अर्थ**—शीघ्रगामी ज्याची सेना आहे आणि ज्याचा रथही शीघ्र-गामी आहे अशा शंकराला नमस्कार.

## नमः शूराय चावभिन्दते च ॥ १२ ॥

**अर्थ**—युद्धामध्यें शूर असलेल्या आणि शत्रूंनीं ज्याचें अभिनंदन केलें आहे अशा शंकराला नमस्कार.

## नमो॑ व॒र्मिणे॑ च वरू॒थिने॑ च ॥ १३ ॥

**अर्थ**—चिलखत घातलेल्या आणि गुप्तस्थान असलेल्या शंकराला नमस्कार.

## नमो॑ बि॒ल्मिने॑ च कव॒चिने॑ च ॥ १४ ॥

**अर्थ**—सच्छिद्र शिरोवेष्टन ज्याचें आहे तो बिल्मी आणि कवच शरीर रक्षण करणारें ज्याचें आहे तो कवची, चिलखत धारण करणाऱ्या, अशा शंकराला नमस्कार.

## नमः॑ श्रु॒ताय॑ च श्रुतसे॒नाय॑ च ॥ १५ ॥

**अर्थ**—वेदप्रसिद्ध असलेल्या आणि ज्याची सेना प्रसिद्ध आहे अशा शंकराला नमस्कार.

इति श्रीरुद्रार्थदीपिकायाम् षष्ठोऽनुवाकः ॥

## अनुवाक सातवा.

### नमो दुन्दुभ्याय चाऽऽहनन्याय च ॥ १ ॥

अर्थ—दुन्दुभी म्हणजे भेरी ( नगारा ) तिथें ध्वनिरूपानें उत्पन्न होणाऱ्या आणि आहनन्य म्हणजे भेरी वाजविण्यासाठीं घेतला जाणारा दंड म्हणजे टिपरी तिथें असणाऱ्या शंकराला नमस्कार.

टीप—या अनुवाकाचा ऋषि–हेमकोश–देवता–श्रीरुद्र छंद–महापंक्ति.

### नमो धृष्णवे च प्रमृशाय च ॥ २ ॥

अर्थ—युद्धामध्यें पळ न काढणाऱ्या आणि शत्रूंकडील वित्तंबातमी काढण्यांत कुशल असलेल्या श्री शंकराला नमस्कार.

### नमो दूताय च प्रहिताय च ॥ ३ ॥

अर्थ—वृत्तांत सांगण्यामध्यें कुशल असलेल्या आणि पाठविलेल्या दूताची चिंता वाहणाऱ्या शंकराला नमस्कार.

टीप—अग्नि हे रुद्राचें स्वरूप मानलें आहे. रुद्रो वा एषयदग्निः । अग्नि हा देवांना बोलावून आणण्याचें काम करतो असें यज्ञप्रकरणामध्यें सांगितलें आहे.

अग्निंदूतम् वृणीमहे अग्निः देवतानाम् दूत आसीत् "त्वं दूतः कविरसि प्रचेताः" इति ।

नमो निषङ्गिणे चेषुधिमते च ॥ ४ ॥

**अर्थ**—खड्ग आणि भाता धारण करणाऱ्या महादेवाला नमस्कार.

नमस्तीक्ष्णेषवे चाऽऽयुधिने च ॥ ५ ॥

**अर्थ**—तीक्ष्ण बाण ज्याच्या जवळ आहेत आणि असंख्य आयुधें ज्याच्या जवळ आहेत त्या श्री शंकराला नमस्कार.

नमः स्वायुधाय च सुधन्वने च ॥ ६ ॥

**अर्थ**—त्रिशूळ हें ज्याचें खास आयुध आहे आणि ज्याच्या-जवळ सुंदर धनुष्य आहे त्याला नमस्कार.

नमः स्रुत्याय च पथ्याय च ॥ ७ ॥

**अर्थ**—स्रुति म्हणजे लहानशी पाऊलवाट. तिथेंही असणाऱ्या आणि राजमार्गावरही असणाऱ्या शंकराला नमस्कार.

नमः काट्याय च नीप्याय च ॥ ८ ॥

**अर्थ**—काट: म्हणजे अल्प प्रवाह—(लहानसें डबकें). तिथेंही असणाऱ्या आणि पर्वतावरून जिथें पाण्याचा प्रपात (झोत) पडतो त्याला नीप असें म्हणतात. तिथेंही असणाऱ्या शंकराला नमस्कार.

टीप— काट शब्दाचा अर्थ लिंग असाही केलेला आहे. 'नता आर्वा रेणूक काटो अश्नुते' त्यामुळें 'काट्याय' याचा अर्थ लिंगामध्यें नित्य असणारा असाही होतो.

## नमः सूद्याय च सरस्याय च ॥ ९ ॥

अर्थ—सूद म्हणजे चिखलाचा प्रदेश, तिथें असणारा तो सूद्य. आणि सरः म्हणजे सरोवर, तिथें असणारा तो सरस्य. या दोघांनाही नमस्कार.

## नमो नाद्याय च वैशन्ताय च ॥ १० ॥

अर्थ—नदींतल्या पाण्यांत असणाऱ्या आणि थोड्या पाण्यांत असणाऱ्या शंकराला नमस्कार.

टीप—नाद्य या शब्दाचा अर्थ नादे भवः अशी व्युत्पत्ति करून ध्वनिमध्यें निर्माण होणारा असाही केला आहे.

## नमः कूप्याय चावट्याय च ॥ ११ ॥

अर्थ—खोल विहिरींतल्या पाण्यांत असणाऱ्या आणि लहानशा खड्ड्यांत असणाऱ्या पाण्यांत राहणाऱ्या शंकराला नमस्कार.

## नमो वर्ष्याय चावर्ष्याय च ॥ १२ ॥

अर्थ—पावसाच्या पाण्यांत असणाऱ्या आणि पावसाशिवाय समुद्रांतल्या पाण्यांत असणाऱ्या शंकराला नमस्कार.

## नमो॑ मे॒घ्या॑य च विद्यु॒त्या॑य च ॥ १३ ॥

अर्थ—मेघामध्यें असलेल्या आणि विजेमध्यें असलेल्या शंकराला नमस्कार.

## नम॑ ई॒ध्रिया॑य चाऽऽत॒प्या॑य च ॥ १४ ॥

अर्थ—ईध्र म्हणजे निर्मल असा शरदांतील मेघ, त्यांत राहतो तो ईध्रिय. आणि सूर्यामध्यें असणाऱ्या म्हणजे सूर्यापासून उत्पन्न होणाऱ्या उष्णतेमध्येंही असणाऱ्या शंकराला नमस्कार.

## नमो॒ वात्या॑य च॒ रेष्मि॑याय च ॥ १५ ॥

अर्थ—वावटळीमध्यें असणाऱ्या आणि प्रलयकालीं निर्माण होणाऱ्या झंझावातामध्यें असणाऱ्या शंकराला नमस्कार.

## नमो॑ वास्त॒व्या॑य च वास्तु॒पाय॑ च ॥ १६ ॥

अर्थ—वस्तु म्हणजे पदार्थ-धन-नाना तऱ्हेचे पदार्थ-त्यांत रहातो तो वास्तव्य. आणि हे पदार्थ जिथें ठेवले जातात तो वास्तु, त्याचें पालन करणारा तो वास्तुप. वास्तव्य आणि वास्तुप अशा शंकराला नमस्कार.

इति श्री रुद्रार्थदीपिकायाम् सप्तमोऽनुवाकः ।

---

## अनुवाक आठवा.

### नमः सोमाय च रुद्राय च ॥ १ ॥

अर्थ—उमेसहवर्तमान असणाऱ्या आणि दुःख हरण करणाऱ्या शंकराला नमस्कार.

टीप— उमा याचा अर्थ पार्वती असा आहे. पार्वतीसह असणारा तो सोम-शंकर. गूढार्थ–शक्तिसह असणारा असा आहे.

### नमस्ताम्राय चारुणाय च ॥ २ ॥

अर्थ—सूर्यरूपानें उदयकालीं अत्यंत आरक्तवर्णाच्या असणाऱ्या आणि उदयानंतर अरुणवर्णाच्या असणाऱ्या शंकराला नमस्कार.

### नमः शंगाय च पशुपतये च ॥ ३ ॥

अर्थ—सुख प्राप्त करून देतो तो शंग. ( शं गमयति इति शंगः ). पशूंचें पालन करणारा तो पशुपति या दोघांनाही नमस्कार.

### नम उग्राय च भीमाय च ॥ ४ ॥

अर्थ—शत्रूंचा नाश करण्यांत कठोर असलेल्या आणि केवळ दर्शनानेंच भीति निर्माण करणाऱ्या शंकराला नमस्कार.

टीप— ज्याच्यापासून जगाला भीति वाटते ते पापरोगादि तुला भितात–म्हणून त्याला भीम असें म्हटलें आहे. शंकराच्या आठ तनु,

प्रसिद्ध आहेत. त्यापैकीं आकाशमूर्तीचा अधिष्ठाता यांत सांगितला आहे.

## नमो॑ अग्रेव॒धाय॑ च दूरेव॒धाय॑ च ॥ ५ ॥

**अर्थ**—समोरासमोर वध करूं शकणाऱ्या आणि दुरूनही वध करूं शकणाऱ्या शंकराला नमस्कार.

## नमो॑ ह॒न्त्रे च॒ हनी॑यसे च ॥ ६ ॥

**अर्थ**—जो कोणी ज्याचा वध करील त्याच्या स्वरूपामध्यें असणाऱ्या आणि त्याच्या स्वरूपांत राहून निश्चयानें वध करणाऱ्या शंकराला नमस्कार.

**टीप**— म्हणूनच गीतेमध्यें भगवंतांनीं "मयैवैते निहता पूर्वमेव निमित्तमात्रम् भव सव्यसाचिन्" असें सांगितलें आहे.

## नमो॑ वृ॒क्षेभ्यो॒ हरि॑केशेभ्यः ॥ ७ ॥

**अर्थ**—नमो वृक्षेभ्यो हरिकेशेभ्यः । हरित पर्णें ज्यांचीं आहेत असे जे कल्पवृक्ष ( हरित पर्णें म्हणजे हिरवीगार पानें ) त्यांच्या स्वरूपांत असलेल्या तुला नमस्कार.

**टीप**— यामध्यें आलेला वृक्ष शब्द आणि हरिकेश हे दोन शब्द अत्यंत महत्वाचे आहेत. वृक्ष शब्दानें संसार वृक्ष असा अर्थ घ्यावयाचा व हरिकेश शब्दाचा अर्थ पळाशपर्ण असा आहे. पळसाला पानें तीन असतात. म्हणून पळसाचें पान हें सत्व-रज-तम या तीन गुणांचें उपलक्षक आहे.

संसारवृक्ष या त्रिगुणांतूनच निर्माण होतो. मात्र हा वृक्ष वनस्पति सृष्टींतल्या वृक्षाप्रमाणें अधोमूल नसतो. तर ऊर्ध्वमूल असतो. ऊर्ध्वमूलमधशाखमश्वत्थं प्राहुरव्ययम्।

## नमस्ताराय ॥ ८ ॥

अर्थ—ॐकारानें वर्णन केलेल्या म्हणजेच प्रणवप्रतिपाद्य अशा तुला नमस्कार. तार शब्दाचा अर्थ प्रणवप्रतिपाद्य असा आहे. तारयति संसारसागरात् जंतून् इति तारः अशी त्याची व्युत्पत्ति आहे.

## नमः शंभवे च मयोभवे च ॥ ९ ॥

अर्थ—ऐहिक आणि पारलौकिक सुख देणाऱ्या शंकराला नमस्कार.

## नमः शंकराय च मयस्कराय च ॥ १० ॥

अर्थ—विषयसुख आणि मोक्षसुख देणाऱ्या शंकराला नमस्कार.

## नमः शिवाय च शिवतराय च ॥ ११ ॥

अर्थ—स्वतः कल्याणस्वरूप असणारा म्हणजेच निष्कल्मष आणि निस्त्रैगुण्य, म्हणूनच शिवतर असलेल्या—सर्वांशानें कल्याण करूं शकणाऱ्या—श्रीशंकराला नमस्कार.

## नमस्तीर्थ्याय च कूल्याय च ॥ १२ ॥

**अर्थ**—प्रयाग आदि तीर्थाजवळ असलेल्या आणि नदीतीरावर असलेल्या श्रीशंकराला नमस्कार.

**टीप**—नदीतीरावर लिंगाची प्रतिष्ठापना करतात हें प्रसिद्धच आहे.

## नमः पार्याय चावार्याय च ॥ १३ ॥

**अर्थ**—संसारसमुद्राच्या पैलतीरावर असणाऱ्या आणि समुद्राच्या ऐलतीरावर म्हणजेच संसार समुद्राच्या ऐलतीरावर असणाऱ्या शंकराला नमस्कार.

## नमः प्रतरणाय चोत्तरणाय च ॥ १४ ॥

**अर्थ**—मंत्र-जपानें पापांतून तरून जाण्याला कारणीभूत असणारा तो प्रतरण. तत्त्वज्ञानानें मोक्षप्राप्ती होण्याला कारणीभूत होणारा तो उत्तरण. अशा श्रीशंकराला नमस्कार.

## नम आतार्याय चाऽऽलाद्याय च ॥ १५ ॥

**अर्थ**—पुनःपुनः या संसारांत जन्म घेणाऱ्या जीवांच्या स्वरूपांत असणाऱ्या आणि प्रत्यक्ष भोग घेणाऱ्या जीवात्म्याच्या स्वरूपांत असणाऱ्या शंकराला नमस्कार.

टीप—अलम् संपूर्णम् यथा भवति तथा कर्मफलम् अत्ति इति आलद्यः-जीवः। जीवात्मा सर्व विषयांचा भोग घेतो म्हणून त्याला आलद्यः असें म्हणतात. साक्षित्वानें पाहणारा तो कूटस्थ आत्मा असें म्हणतात." समानम् वृक्षम् परीषस्वजाते। तयोरन्यः पिप्पलम् स्वाद्वत्ति" अशी श्रुतिही आहे.

## नमः शष्प्याय च फेन्याय च ॥ १६ ॥

अर्थ—बालतृण-नदीतीरावर निर्माण होणारे कुशकाश नांवाचें दर्भ-यांच्या स्वरूपांत असणाऱ्या आणि फेंसाच्या स्वरूपांत असणाऱ्या शंकराला नमस्कार.

## नमः सिकत्याय च प्रवाह्याय च ॥ १७ ॥

अर्थ—पाण्यापासून निर्माण होणाऱ्या, वाळूंत असणाऱ्या आणि प्रवाहामध्यें असणाऱ्या अशा श्रीशंकराला नमस्कार.

इति श्रीरुद्रार्थदीपिकायाम् अष्टमोऽनुवाकः ॥

## अनुवाक नववा.

**नम॑ इरि॒ण्या॑य च प्रप॒थ्या॑य च ॥ १ ॥**

अर्थ—इरिण म्हणजे ऊषर म्हणजे बीळ, तिथें असणाऱ्या आणि राजमार्गावर असणाऱ्या शंकराला नमस्कार.

**नमः॑ किꣳशि॒लाय॑ च॒ क्षय॑णाय च ॥ २ ॥**

अर्थ—लहान लहान दगडांचा जो प्रदेश त्याला किंशिल असें म्हणतात. ( शार्करिल प्रदेश ) तिथें असणाऱ्या आणि क्षयण म्हणजे निवासयोग्य अशा जागीं असणाऱ्या शंकराला नमस्कार.

**नमः॑ कप॒र्दिने॑ च पु॒लस्तये॑ च ॥ ३ ॥**

अर्थ—जटाधारी शंकराला नमस्कार. आणि नेहमीं भक्तांच्या समोर असणाऱ्या शंकराला नमस्कार. अगाध महिमा असला तरी शंकर हा सर्वसुलभ आहे हा आशय.

**नमो॒ गोष्ठ्या॑य च॒ गृह्या॑य च ॥ ४ ॥**

अर्थ—गायीच्या गोठ्यांत असणाऱ्या आणि घरांत असणाऱ्या शंकराला नमस्कार.

**नम॒स्तल्प्या॑य च॒ गेह्या॑य च ॥ ५ ॥**

**अर्थ**—खाटेवर असणाऱ्या आणि राजप्रासादांत असणाऱ्या शंकराला नमस्कार.

## नमः काट्याय च गह्वरेष्ठाय च ॥ ६ ॥

**अर्थ**—काटयाकुटयानीं प्रवेश करण्याला अशक्य अशा कठीण प्रदेशांत असणाऱ्या आणि गुहेमध्यें असणाऱ्या अशा शंकराला नमस्कार.

**टीप**—मागें काटय याचा अर्थ विहिरींतील जल असा केलेला होता. इथे दुर्गम अरण्य-विशेषः-काटः असा केलेला आहे.

## नमो ह्रद्य्याय च निवेष्प्याय च ॥ ७ ॥

**अर्थ**—मोठमोठ्या डोहामध्यें असणाऱ्या आणि निवेष्प म्हणजे बर्फरूप पाणी त्यामध्यें असणाऱ्या शंकराला नमस्कार.

## नमः पांसव्याय च रजस्याय च ॥ ८ ॥

**अर्थ**—अतिसूक्ष्म परमाणूमध्यें असणाऱ्या आणि दृष्टिगोचर अशा धुळींच्या कणांमध्यें असणाऱ्या शंकराला नमस्कार.

## नमः शुष्क्याय च हरित्याय च ॥ ९ ॥

**अर्थ**—वाळलेल्या नीरस पदार्थांमध्यें असणाऱ्या शंकराला नमस्कार. आणि हरित म्हणजे आर्द्र. जीवनरसानें रसरसलेल्या पदार्थांमध्यें असणाऱ्या शंकराला नमस्कार.

## नमो लोप्याय चोलप्याय च ॥१०॥

अर्थ—ज्या ठिकाणीं गवत सुद्धां उगवूं शकत नाहीं असा जो कठीण प्रदेश त्याला लोप असें म्हणतात. तिथें असणारा तो लोप्य. आणि उलप म्हणजे लहान लहान गवत. त्याच्यामध्यें असणारा तो उलप्य. लोप्य आणि उलप्य अशा शंकराला नमस्कार.

## नम ऊर्व्याय च सूर्म्याय च ॥ ११ ॥

अर्थ—पृथ्वीपासून निर्माण होणाऱ्या आणि तरंगांत असणाऱ्या शंकराला नमस्कार.

## नमः पर्ण्याय च पर्णशद्याय च ॥१२॥

अर्थ—पानांमध्यें असणारा तो पर्ण्य. आणि शुष्कानाम् पर्णानाम् संघातः पर्णशदः, वाळलेला पाचोळा तिथें असणाऱ्या, पर्ण्य आणि पर्णशद्य अशा शंकराला नमस्कार.

## नमोऽपगुरमाणाय चाभिघ्नते च ॥१३॥

अर्थ—उद्यतायुद्ध आणि प्रहार करणाऱ्या शंकराला नमस्कार.

## नम आक्खिदते च प्रक्खिदते च ॥ १४ ॥

अर्थ—अपराधानुसार अल्प क्लेश देणाऱ्या आणि तदनुसारच आत्यंतिक क्लेश देणाऱ्या शंकराला नमस्कार.

## नमो वः किरिकेभ्यो देवाना॑ हृदयेभ्यः ॥ १५ ॥

**अर्थ**—भक्तांना धन, ऐश्वर्य जे देतात त्यांना किरिक असें म्हणतात. किरन्ति भक्तेभ्यः धनानि । अशी त्याची व्युत्पत्ति आहे. हे किरिक म्हणजे रुद्रावतार म्हणून प्रसिद्ध आहेत. हे सर्व देवांना प्रिय असल्यामुळें यांना देवांचें हृदय असें म्हटलेलें आहे. सर्व देव-प्रिय आणि उदार असणाऱ्या अशा हे रुद्रांनो तुम्हाला नमस्कार.

**टीप**—या मंत्रापासून अनुवाक समातीपर्यंत एकच मंत्र आहे. त्याचा ऋषि-भगवान् शंभु. देवता–भगवान् शंभूच. छंद–जगती षट्पदा.

आतांपर्यन्त शंकराच्या नानाविध पदार्थांमध्यें असणाऱ्या शक्तीला नमस्कार केला आहे. आतां समुदाय रूपानें शंकराचे जे रुद्रावतार प्रसिद्ध आहेत त्यांना नमस्कार केला आहे.

## नमो विक्षीणकेभ्यः ॥ १६ ॥

**अर्थ**—केव्हांही ज्यांचा क्षय होत नाहीं ते विक्षीणक. अशा तुम्हाला नमस्कार.

## नमो विचिन्वत्केभ्यः ॥ १७ ॥

**अर्थ**—विचिन्वन्ति अपेक्षितमर्थम् संपादयन्ति इति विचिन्वत्काः। हे दुर्जन, हे सज्जन–असा विभाग करणाऱ्या हे रुद्रांनो तुम्हाला नमस्कार.

## नम आनिर्हतेभ्यः ॥ १८ ॥

**अर्थ**—निशेःष रीतीनें जे पापाचा नाश करतात ते आनिर्हत रुद्र. भक्तांचें पाप निःशेष रीतीनें नाहींसे करणाऱ्या हे रुद्रांनो तुम्हाला नमस्कार.

## नम॑ आमीव॒त्केभ्य॑ः ॥ १९ ॥

**अर्थ**—सर्व विषयांची भक्तांना समृद्धि प्राप्त करून देणाऱ्या हे रुद्रांनो तुम्हाला नमस्कार.

**टीप**—या मंत्रांत किरिक, विक्षिणक, विचिन्वत्क, आनिर्हत आणि आमीवत्क अशी रुद्राला विशेषणें लावलीं आहेत. या विशेषणांचा संबंध देवानाम् हृदयेभ्यः याच्याशीं आहे. हे सर्व रुद्र देवप्रिय आहेत हा त्याचा अर्थ. विश्वब्रह्मांडांत ह्या रुद्रांच्या मार्फत महादेव लोकव्यवस्था पहात असतो. आणि त्याच्यावर नियंत्रणही ठेवतो. जे ईशसेवेंत मग्न झाले त्यांचे दारिद्र्य दूर करण्याचें कार्य **विकिरिक** नांवांचे रुद्र करीत असतात. त्यांना कधींही कोणत्याही गोष्टींची कमतरता पडूं न देण्याचें काम **विक्षीणक** नांवांचे रुद्र करीत असतात. तसेच खरे सज्जन कोण, आणि दुर्जन कोण हे ओळखून सज्जनांच्या मनोवांच्छा पूर्ण करणें आणि दुर्जनांना शासन करणें हें कार्य **विचिन्वत्क** नांवांचे रुद्र करीत असतात. आणि भक्तांचें निशेःष पाप नाहींसें करून त्यांना परमेश्वरी साक्षात्काराला योग्य अधिकारी करण्याचें काम **आनिर्हत** नांवांचे रुद्र करीत असतात. आणि शेवटीं सुखसमृद्धि निर्माण करून अक्षय्य, शाश्वत, अजर, अशा परमात्म साक्षात्काराचा ठेवा देऊन सज्जनांना कृतार्थ करण्याचें काम **आमीवत्क** नांवांचे रुद्र करीत असतात. आणि म्हणून हे सर्व रुद्र देवांच्या हृदयस्थानीं आहेत.देव ज्यांचें स्मरण करतात म्हणजे सर्व देवप्रिय आहेत हा या मंत्राचा आशय.

**इति श्रीरुद्रार्थदीपिकायाम् नवमोऽनुवाकः ।**

माणसाला सुख देण्याचे मार्ग म्हणजेच कल्याणप्राप्तीचा मार्ग कसा असतो हें या मंत्रांत ऋषींनें सांगितलें आहे. तपश्चर्या करीत असतांना, पात्रता जोपर्यंत एका विशिष्ट पातळीपर्यंत वाढणार नाहीं तोपर्यंत त्यांना बाजूला सारण्यांत येते. ज्यांची साधना प्रगाढ आणि परिपुष्ट झाली आहे त्यांच्या मार्गांतील विघ्नें दूर केलीं जातात व नंतरच त्यांना निरंतर सुखप्राप्ति होते. तेव्हां ज्याला अखंड कल्याणै-श्वर्य हवें असेल त्यानें सतत श्रम केले पाहिजेत, म्हणजेच तपश्चर्या केली पाहिजे. श्रमांवांचून सुख भोगण्याचा अधिकार आपणांस नाहीं असा संदेश " न ऋते श्रांतस्य सख्याय देवाः " या मंत्रद्वारा जणूं ऋषि आपणांस देत आहे. हाच या मंत्राचा आशय.

## अनुवाक दहावा.

आतापर्यंतच्या अनुवाकामध्यें आरंभीं व शेवटीं नमस्कार असणारे कांहीं मंत्र तसेच काहीं मंत्र फक्त आरंभींचि नमस्कार असणारे, असे येऊन गेले. त्यामध्यें शंकराचे सर्वव्यापित्व व भक्तवत्सलता इत्यादि गुणविशेष सांगितले आहेत.

या अनुवाकांत ऋक्स्वरूपाचे मंत्र आलेले असून त्यांत शंकराला उद्देशून उत्कटत्वानें प्रार्थना केली आहे.

दहाव्या अनुवाकाचा पहिला मंत्र पुढील प्रमाणें:—

**द्रापे अन्धसस्पते दरिद्रन्नीललोहित । एषां पुरुषाणामेषां पशूनां मा भेर्माऽरो मो एषां किंचनाऽऽममत् ॥ १ ॥**

**अर्थ**—अभक्तांना वाईट गति प्राप्त करून देणाऱ्या व भक्तांना अन्नादि गोष्टी देऊन त्यांचे पालन करणाऱ्या अन्नपति असूनही निष्कांचन वृत्तीनें रहाणाऱ्या (स्वत:साठीं संग्रह न करणाऱ्या) आणि कंठाच्या बाबतींत नीलवर्ण आणि इतरत्र आरक्तवर्ण असणाऱ्या हे देवाधिदेवा रुद्रा, ह्या आमच्या पुत्रपौत्रादिकांना आणि गाई- महिषी- वगैरे आमच्या ह्या पशूंना तूं भीति दाखवूं नकोस आणि ह्या माझ्या उभयविध संपत्तिपैकीं एकही गोष्ट नाहींशी होऊं देऊं नकोस. तसेंच यांच्यापैकीं कोणालाही कसलाही विकार तूं होऊं देऊं नकोस.

**टीप**—या मंत्राचा ऋषि–पुलह, देवता–श्रीरुद्र, छंद–आस्तारपंक्ति: या मंत्रांत आलेला अंधसस्पति हा शब्द अंध व त्याचा स्वामी या अर्थी

आलेला आहे. अंध म्हणजे अध अद्यते इति अंधः तसेच माऽरः याचा अर्थ नष्ट न होवो. आणि मो आममत् म्हणजे मैव ऋग्णम् भूत् याचा अर्थ रुग्ण न होवो.

## या ते॑ रुद्र शि॒वा त॒नूः शि॒वा वि॒श्वाह॑भेष॒जी । शि॒वा रु॒द्रस्य॑ भेष॒जी तया॑ नो मृड जी॒वसे॑ ॥२॥

**अर्थ**—हे रुद्रा, तुझी कल्याणकारक आणि शांत अशी जी तनु आहे त्या तनूनें तूं आम्हाला सुख दे. तुझी तनु कल्याणकारक कां? तर ती विश्वाहभेषजी अशी आहे. म्हणजे सर्वेषु अहस्सु रोगदारिद्र्यादेः औषधवत् विनाशहेतुः । तस्मात् शिवा विश्वानि अहानि विश्वाः । सर्व दिवसांमध्यें तुझी तनु भेषजी आहे. भेषजी म्हणजे औषधाप्रमाणें उपयुक्त आहे. तेव्हां अशा तुझ्या परमकल्याणप्रद आणि संसाररोग नाहीसें करणाऱ्या तुझ्या शांत व मंगल तनूनें तूं आम्हाला निरंतर सुख निर्माण कर.

**टीप**—या मंत्राचा ऋषि–स्कंद, देवता–स्कंदरूपी रुद्र, छंद–अनुष्टुभ्.

## इ॒माꣳ रु॒द्राय॑ त॒वसे॑ कप॒र्दिने॑ क्ष॒यद्वी॑राय॒ प्रभ॑रामहे म॒तिम् । यथा॑ नः॒ शमस॑द्द्वि॒पदे॒ चतु॑ष्पदे॒ विश्वं॑ पु॒ष्टं ग्रामे॑ अ॒स्मिन्ननातु॒रम् ॥ ३ ॥

**अर्थ**—भक्तांच्या अपेक्षा पूर्ण करण्यास समर्थ असलेल्या, जटाबंध युक्त व तापसवेष धारण केलेल्या आणि ज्याच्या समोर शत्रु टिकूं

शकत नाहीं अशा रुद्राविषयीं म्हणजे रुद्राकरितां इमाम् मतिम् पूजाध्यानविषयक बुद्धि आम्ही धारण करितों. ज्या बुद्धीमुळें आमच्या पुत्रपौत्रादि संततीला व चतुष्पद गोमाहिष्यादि पशुरूप संपत्तीला यथा शम् असत् म्हणजे सुख होईल. येवढेंच नव्हे तर आम्ही ज्या गांवामध्यें रहातो त्या गांवांतील सर्वम् विश्वम् म्हणजे सर्व प्राणिजात सुखपूर्ण आणि उपद्रवरहित होईल. निरंतर तुझ्या ध्यानपूजेंत निमग्न असलेल्या आम्हा भक्तांवर व आमच्या गांवावर तुझी पूर्ण कृपा राहील हा या मंत्रांतील आशय.

टीप—या मंत्रांत आलेला मति हा शब्द अत्यंत महत्त्वाचा आहे. ऐतरेयोपनिषदामध्यें आलेल्या संज्ञानमाज्ञानम्, विज्ञानम्, प्रज्ञानम्, धृतिः, मतिः, या मंत्रांत मनाच्या एकंदर ज्या सात अवस्था सांगितल्या आहेत त्यापैकीं मति ही एक मनाची अवस्था आहे. यौगिक सांप्रदायांत मनाच्या या अवस्थेला फार महत्त्व आहे. परमात्मसाक्षात्कारासाठीं कमीत कमी मनाच्या या अवस्थेपर्यंत साधकांना यावेंच लागते. रुद्रभक्त ज्या गावांत राहतात त्या गावांत रोगराई, दुःख ही पळून जातात असें पुराणांतही वर्णन केलें आहे. रुद्राध्यायी वसेद्यत्र ग्रामे वा नगरेऽपि वा। न तत्र क्षुत् पिपासाद्या दुर्भिक्षव्याधयोऽपि च ॥

या मंत्राचा ऋषि–मांडव्य. देवता रूद्र. छंद अनुष्टुभ्.

**मृडा नो रुद्रो तनो मयस्कृधि क्षयद्वीरया नमसा विधेम ते। यच्छं च योश्च मनुरायजे पिता तदश्याम तव रुद्र प्रणीतौ ॥ ४ ॥**

अर्थ —हे रुद्रा, आम्हाला इहलोकामध्यें सुख दे, आणि परलोकामध्येंही दे. आमचीं पापें नाहींशी करणाऱ्या तुझी नमस्कारानें आम्ही सेवा करूं. पिता मनूनें आणि प्रजापतिनें सुख आणि दुःख जें कांहीं आमच्यासाठीं निर्माण केलें तें तुझी आमच्यावर कृपा झाली असतां आम्ही सुखानें ग्रहण करूं. सुखातिरेकानें आम्ही उन्मत्तही होणार नाहीं आणि हातून घडलेल्या अपराधामुळें तुझ्या कृपेनें अधोगतीलाही जाणार नाहीं.

टीप— या मंत्राचा ऋषि–मांडव्य, देवता–श्रीरुद्र, छंद–अनुष्टुभ्.

मा नो॑ महान्तमुत मा नो॑ अर्भकं मा न॒ उक्षन्तमुत मा न॑ उक्षितम् । मा नो॑ वधीः पितरं॒ मोत मातरं॑ प्रिया मा न॑स्तनुवो॑ रुद्र रीरिषः ॥ ५ ॥

अर्थ—हे रुद्रा, आमच्यांतील वृद्ध पुरुषांना तूं त्रास देऊं नकोस. आमच्यांतील लहान मुलांना तूं मारूं नकोस. तसेच आमच्यांतील उक्षन्तम् सेचनसमर्थम् अशा तरुण पुरुषांना तूं मारूं नकोस आणि उक्षितम् म्हणजे गर्भस्थ जीवांनाही तूं त्रास देऊं नकोस. आमच्या पितरांना तूं मारूं नकोस आणि आमच्या मातरांनाही. ( मातृदेवतांना) तूं मारूं नकोस तसेंच आमच्या प्रिय शरीरांनाही तूं इजा पोंहोचूं देऊं नकोस.

टीप—या मंत्राचा ऋषि–देवरात, देवता–नंदीश्वररूपी रुद्र, छंद–जगति.

मा नस्तोके तनये मा न आयुषि मानो गोषु मा नो अश्वेषु रीरिषः। वीरान्मा नो रुद्र भामितो वधीर्हविष्मन्तो नमसा विधेम ते ॥ ६ ॥

अर्थ—हे रुद्रा, आमच्या संततीला विशेषतः पुत्राला त्रास देऊं नकोस. आमचें आयुष्य विनासंकट जावें. आम्ही पाळलेल्या गाईंच्या बाबतींत तूं त्रास देऊं नकोस. तसेंच आमच्या घोड्यांनाही उपद्रव देऊं नकोस. आणि रागाच्या भरांत आमच्या वीर पुरुषांना तूं त्रास देऊं नकोस. हविर्द्रव्याच्या योगानें आणि नमस्कारानें आम्ही तुझी परिचर्या करूं.

टीप—तोक शब्दाचा अर्थ पुत्र, व तनय शब्दाचा अर्थ पुत्राचा पुत्र म्हणजे पौत्र ( नातू ) असाही कांहींनीं केला आहे. पुत्रपौत्रादि संततीला रोगराईची बाधा न होवो हा आशय.तसेंच "आयुषि मा रीरिषः" याचा अर्थ मानवी आयुष्याची जी मर्यादा सांगितली आहे त्या मर्यादेपर्यंत आयुष्य आम्हाला मिळावें. छांदक्योपनिषदामध्यें आयुः षोडशवर्षशतम् प्राह षोडशम् वर्षशतम् अजीवत् प्राह षोडशम् वर्षशतम् जीवति। कांहींच्या मतें विंशतिवर्षशतम् तर कांहींच्या मतें सप्तविंशत्यधिकानि शतम् वर्षाणि तर कांहींच्या मतें शतमेव चरुपुरोडाशादि हविर्द्रव्य आणि नमस्कार यांच्या योगानें आम्ही तुझी परीचर्या करूं.

या मंत्राचा ऋषि–भगवान्, देवता–भगवान, छंद–जगति.

आरात्ते गोघ्न उत पूरुषघ्ने क्षयद्वीराय सुम्नमस्मे ते अस्तु। रक्षा च नो अधि च देव ब्रूह्यधा च नः शर्म यच्छ द्विबर्हाः ॥ ७ ॥

**अर्थ**— गोवध आणि पुरुषवध तसेंच सर्व वीर पुरुष नाहींसे करणाऱ्या तुझें अत्यंत भयानक आणि उग्र स्वरूप आमच्यापासून दूर राहूं दे. आणि तुझें सुखकर जें रूप आहे तें आमच्याजवळ राहूं दे. तुझ्या दोन शरीरापैकीं घोर शरीर हें दूर राहूं दे व शिव शरीर आमच्या समोर येऊं दे. हे देवा, इतर यजमानापेक्षांही आमच्या बाबतींत तूं इतर देवांकडे अधिक शिफारस कर. आणि इहपर-लोकांमध्यें आमचें कल्याण कर.

**टीप**—सृष्टि निर्माण केल्यानंतर ईश्वराला कर्मविपाकाच्या तत्त्वाला अनुसरून गोवध किंवा पुरुषवध करणें हें क्रमप्राप्तच ठरतें. गोवध किंवा पुरुषवध शब्दांनीं केवळ गायी अथवा पुरुष एवढाच स्थूल व वाच्यार्थ घ्यावयाचा नसून गाय या शब्दानें सर्व चतुष्पाद प्राणिसृष्टि व पुरुष या शब्दानें सर्व द्विपाद प्राणिसृष्टि असा अर्थ घ्यावयाचा.

या मंत्राचा ऋषि-अत्री, देवता-शंभु, छंद-त्रिष्टुभ्.

स्तुहि श्रुतं गर्तसदं युवानं मृगं न भीममु-पहत्नुमुग्रम् । मृडा जरित्रे रुद्र स्तवानो अन्यं ते अस्मन्निवपन्तु सेनाः ॥ ८ ॥

**अर्थ**—हा मंत्र स्वतःला उद्देशून आहे. भक्त आपल्या मनाला उद्देशून म्हणतो हें मना तूं श्रतम् रुद्रम् स्तुहि. तूं प्रसिद्ध अशा त्या रुद्राची स्तुति कर. हृदयपुंडरीकामध्यें सर्वदा ज्याचा निवास आहे आणि जो नित्य तरुण आहे आणि प्रलयकालीं हत्तीवर झडप घालणाऱ्या सिंहाप्रमाणें उग्र असणारा असा तो भगवान् श्रीरुद्र आहे.

अशा गुणांनीं युक्त असलेल्या रुद्रा, दिवसा दिवसाला नाश पावणाऱ्या आमच्या शरीरांना तूं सुख दे. आणि तुझ्या सेना आमच्या वैऱ्यांचा निःपात करूं दे.

**टीप**—गर्तसद याचा अर्थ गर्तसदृश हृदयपुंडरीक असा आहे. हृदयाकाशामध्यें परामात्म्याचें ध्यान करावें असें उपनिषद्कार सांगतात. "ईश्वरः सर्व भूतानाम् हृद्देशेऽर्जुन तिष्ठति" असें भगवद्गीतेमध्येंही सांगितलें आहे. ही दहरविद्या अत्यंत महत्त्वाची असून आपल्या ऋषींनीं ऐहिक दुःख नाशाकरितां तिची उपासना करण्यास सांगितलें आहे.

या मंत्राचा ऋषि–वैय्याघ्र, देवता–रुद्र, छंद--त्रिष्टुभ्.

**परि॑णो रु॒द्रस्य॑ हे॒तिर्वृ॑णक्तु॒ परि॑ त्वे॒षस्य॑ दुर्म॒तिर॑घा॒योः। अव॑ स्थि॒रा म॒घव॑द्भ्यस्तनुष्व॒ मीढ्व॑स्तो॒काय॒ तन॑याय मृडय ॥ ९ ॥**

**अर्थ**—हे रुद्रा, तुझी "हेति" म्हणजे आयुध हें आम्हाला पुत्रपौत्रादिसह वर्ज्य करो. तुझ्या आयुधापासून आम्हाला कोणताही त्रास न होवो, हा आशय. क्रोधानें लाल झालेल्या आणि प्रहार करूं इच्छिणाऱ्या तुझी जी दुर्मति म्हणजे उग्र बुद्धि तिच्यापासूनही आम्हाला दूर ठेव. शत्रूंचा नाश करण्याची जी तुझी निश्चयात्मक बुद्धि तिच्यापासूनही हविर्लक्षण असें जें अन्न त्यांनीं युक्त असलेल्या यजमानांचें रक्षण कर आणि भक्तेच्छा पुऱ्या करणाऱ्या हे देवा, आमच्या पुत्राला आणि त्याच्या पुत्राला तूं सुख दे.

**टीप**—या मंत्राचा ऋषि–भगवान्, देवता–भगवान्, छंद–त्रिष्टुभ्.

**मीढुंष्टम शिवंतम शिवो नः सुमनां भव। परमे वृक्ष आयुंधं निधाय कृतिं वसांन आचंर पिनांकं बिभ्रदागंहि ॥ १० ॥**

**अर्थ**— हें मीढुष्टम, म्हणजे भक्त मनोरथ पूर्ण करणाऱ्या रुद्रा, हे शिवतम, म्हणजे शांत मंगल स्वरूप असणाऱ्या, तूं आमच्याही बाबतींत तसाच हो. आणि तुझें आयुध ( त्रिशूळ ) हें उंच अशा एखाद्या वडावर किंवा पिंपळावर ठेव. आम्हाला दिसणार नाहीं असें ठेव. आणि मग केवळ व्याघ्रचर्म परिधान करून धनुष्य घ्यावयाचें असेल तर केवळ शोभेकरितां म्हणून धारण करून आमच्याजवळ ये. बाण वगैरे बाजूला ठेव. केवळ शोभा म्हणूनच धनुर्धारी बनून तूं आम्हाला दर्शन दे. तूं निःशस्त्र होऊन आमच्याशीं एकरूप हो हा आशय.

**टीप**—या मंत्राचा ऋषि वैराज, देवता–शंभु आणि छंद–पंचपदा त्रिष्टुभ्.

**विकिंरिद बिलोंदित नमंस्ते अस्तु भगवः। यास्तें सहस्रꣳ हेतयोऽन्यमस्मान्निवंपन्तु ताः ॥ ११ ॥**

**अर्थ** — भक्तांना यथेष्ट धनधान्य देणाऱ्या आणि गौरवर्ण असणाऱ्या किंवा सुवर्णाप्रमाणें तेजःपुंज असणाऱ्या आणि षड्गुणैश्वर्यसंपन्न असणाऱ्या हे भगवंता, रुद्रा, तुला आमचा नमस्कार असो. तुझी असंख्य आयुधें आमच्याव्यतिरिक्त आमच्या शत्रूंवर जाऊन प्रहार करूं देत.

टीप—या मंत्रांत आलेल्या भग शब्दाचा अर्थ षड्गुणैश्वर्यसंपन्न असा आहे.

ऐश्वर्यस्य समग्रस्य धर्मस्य यशसः श्रियः ।
ज्ञानवैराग्ययोश्चैव षण्णाम् भग इतीरणा ॥

असें सांगितलें आहे.

उत्पत्तिं च विनाशं च भूतानामागतिं गतिम् ।
वेत्ति विद्यामविद्यांश्च स वाच्यो भगवान् इति ॥

असाही काहींनीं भग शब्दाचा अर्थ केला आहे.

या मंत्राचा ऋषि–पुलह, देवता–शंभु, छंद–अनुष्टुभ्.

**सहस्राणि सहस्रधा बाहुवोस्तव हेतयः । तासामीशानो भगवः पराचीना मुखा कृधि ॥१२॥**

अर्थ—हे समर्थ रुद्रा, तुझ्या हातांत जीं असंख्य आयुधें आहेत धनुष्य खड्ग त्रिशूळ इ. प्रकारापैकीं प्रत्येक आयुध हजार प्रकारचे, अशीं अगणित आयुधें तुझ्या हातांत आहेत. हे षडगुणैश्वर्यसंपन्न भगवंता, तूं समर्थ असल्यामुळें त्या आयुधांचीं अग्रें आमच्यापासून मागें कर. आमच्यापासून तुझीं आयुधें तूं पराङ्गमुख कर. कारण त्या आयुधांची आतां गरज नाहीं.

टीप—या मंत्राचा ऋषि–नारद, कांहींच्या मतें कण्व. देवता–रुद्र. छंद–अनुष्टुभ्.

इति श्रीरुद्रार्थदीपिकायाम् दशमोऽनुवाकः ।

## अनुवाक अकरावा.

दहाव्या अनुवाकांत ऋक्स्वरूपाचे कांहीं मंत्र सांगितले. आतां या अनुवाकांत राहिलेले कांहीं ऋक्स्वरूपाचे मंत्र आणि यजुर्मंत्र सांगावयाचे आहेत. आरंभींचे दहा मंत्र हे ऋक्स्वरूप आहेत व शेवटचे तीन यजुःस्वरूप आहेत. या अनुवाकांतील पहिला मंत्र पुढील प्रमाणें :—

**सहस्राणि सहस्रशो ये रुद्रा अधि भूम्याम् ।**
**तेषाꣳ सहस्रयोजनेऽव धन्वानि तन्मसि ॥ १ ॥**

**अर्थ**—या पृथ्वीतलांवर जे हजारो विनायक, प्रमथ, शैलाद इत्यादि विविध जातींचे रुद्र आहेत— रुद्र स्वरूपानें वावरणारे श्रीशंकराचे सृष्टि-नियमनाकरितां जे भृत्य त्यांची अगणित, अपरिमित आयुधें म्हणजे धनुष्यें आहेत ती आमच्यापासून हजारों योजनें दूर ठेव व धनुष्याची दोरी शिथिल करून किंवा काढून ठेव अशी आम्ही प्रार्थना करितों.

**टीप**— या अनुवाकांत संहार करणाऱ्या शंकराचे जणूं क्रोधाचे स्फुल्लिंगच कीं काय असे सृष्टिनियमनाकरितां सर्व लोकांत संचार करणारे जे रुद्र त्यांना शांत व प्रसन्न करण्यासाठीं प्रार्थना केली आहे. कर्माला अनुसरून प्रत्येकाला त्याचें बरें वाईट फल देण्यासाठीं शंकरानें या रुद्रांची योजना केली आहे. त्यामुळें कोणालाही त्याच्या बऱ्या वाईट कर्मांचें फल त्याचें पुरेपूर माप त्याच्या पदरांत टाकल्याशिवाय हे रुद्र रहात नाहींत. हें जाणून आपल्या प्रत्येक बऱ्यावाईट आणि बारीकसारीक सुद्धां कर्मा-वर रुद्रद्वारा भगवान् श्री शंकराची दृष्टि असते म्हणून प्रत्येकानें प्रयत्न-पूर्वक शुभ कर्मच आचरावें. सामाजिक, राष्ट्रीय व वैयक्तिक स्वरूपाचे नीति-

नियमांचे, सभ्यतेचे, मानवतेचे जे जे संकेत किंवा आदर्श असतील ते ते अवश्यमेव पाळावेत असाच जणूं संदेश या अनुवाकाचे द्रष्टे जे दुर्वास, देवल प्रभृति ऋषि आपणांस देत आहेत.

या अनुवाकांतील पहिल्या चार मंत्रांचा ऋषि-दुर्वास व राहिलेल्या मंत्रांचा ऋषि- देवल. सर्वांची देवता रुद्र. छंद- अनुष्टुभ्.

## अस्मिन्महत्यर्णवेऽन्तरिक्षे भवा अधि ॥ २ ॥

**अर्थ:**—या महान् समुद्रसदृश असणाऱ्या अंतरिक्षामध्यें म्हणजे विश्वाच्या अनंत अवकाशांत जे भव म्हणजे रुद्र राहतात त्यांचीं धनुष्यें हजारों योजन दूर आम्ही ठेवतों.

**टीप**— पहिल्या मंत्राचा उत्तरार्ध तेषाँ सहस्रयोजनेऽव धन्वानि तन्मसि.। हा येथून पुढें प्रत्येक मंत्राचा उत्तरार्ध म्हणून घ्यावा. तसा तो आहे म्हणूनच दहाव्या मंत्राच्या शेवटीं पुनः त्याचा उल्लेख केला आहे.

## नीलग्रीवाः शितिकण्ठाः शर्वा अधः क्षमाचराः ॥ ३ ॥

**अर्थ:**—नीलकंठ आणि गौर वर्णाचे असे जे अधोलोक म्हणजे पाताळांत संचार करणारे रुद्र आहेत त्यांचीं धनुष्यें आम्ही हजारों योजनें दूर ठेवतों.

## नीलग्रीवाः शितिकण्ठा दिवँ रुद्रा उपश्रिताः ॥ ४ ॥

**अर्थः**—नीलकंठ आणि गौर वर्णांचे जे रुद्र स्वर्गांत राहतात त्यांचीं धनुष्यें आम्ही हजारों योजनें दूर ठेवतों.

## ये वृक्षेषु सस्पिञ्जरा नीलग्रीवा विलोहिताः॥५॥

**अर्थः**—ज्याप्रमाणें तिन्ही लोकांमध्यें कांहीं रुद्र राहतात तसेच कांहीं रुद्र वृक्षांवरही राहतात. त्यांतील कांहीं कोवळया तृणांप्रमाणें पिंजर वर्णाचे आणि नीलकंठ व गौरवर्ण ज्यांचा आहे अशा रुद्रांचीं धनुष्यें आम्ही हजारों योजनें दूर ठेवतों.

**टीप**— लोकांना त्रास देणाऱ्यांचा धुव्वा उडविणारे जे रुद्र त्यांनाही कांहींच्या मतें नीलग्रीव असें म्हणतात.

## ये भूतानामधिपतयो विशिखासः कपर्दिनः॥६॥

**अर्थ**—प्राण्यांच्या शरीरांतून सूक्ष्म रूपानें प्रवेश करून जे जंतू त्यांना उपद्रव देतात त्यांचा निःपात करून सर्वांना कल्याण देणारे अधिपति असे जे रुद्र त्यांच्यामध्यें कांहीं विशिख म्हणजे मुंडितकेश तर कांहीं कपर्दी म्हणजे जटाधारी असे आहेत. अशा रुद्रांचीं धनुष्यें आम्ही हजारों योजनें दूर ठेवतों.

**टीप**—या मंत्रांतील भूतानाम् अधिपति या शब्दांचा सायणाचार्यांनीं केलेला अर्थ ध्यानीं घेतां त्या काळीं जंतूमुळें रोग निर्माण होतात ही स्पष्ट कल्पना तत्कालिन लोकांना असावी असें वाटतें.

**ये अन्नेषु विविध्यन्ति पात्रेषु पिबतो जनान्**
**॥ ७ ॥**

**अर्थ** — जे रुद्र आहारांतील अन्नामध्यें गुप्त रूपानें राहून आहाराचा अतिरेक झाला असतांना धातुवैषम्य निर्माण करून विविध रोग निर्माण करतात व अशा रीतीनें अत्याहाराचें प्रायश्चित्त लोकांना देतात आणि असावधपणानें कसेंतरी पाणी पितात त्यांनाही याच स्वरूपानें प्रायाश्चित्त देणारे जे रुद्र आहेत त्यांचीं धनुष्यें आम्ही सहस्र योजनें दूर ठेवतों.

**ये पथां पथिरक्षय ऐलबृदा यव्युधः ॥ ८ ॥**

**अर्थ** — लौकिक, वैदिक व तांत्रिक असे जे विविध पंथ आहेत त्यांचें रक्षण करणारे वर सांगितलेल्या कोणत्याही मार्गानें जाणाऱ्या लोकांचें रक्षण करणारे असे जे रुद्र ते पथिरक्षय रुद्र, आणि ऐलबृद रुद्र म्हणजे विपुल अन्न धारण करणारे, अन्न प्रदान करून लोकांचे पोषण करणारे जे रुद्र त्यांना ऐलबृद असे म्हणतात. इरा म्हणजे अन्न, त्याचा समूह तो ऐर, त्याला धारण करणारे जे ते ऐलबृद अशी त्याची व्युत्पत्ति आहे. तसेच यव्युध असेही कांहीं रुद्र आहेत. यव्युध रुद्र म्हणजे शत्रूंचा नाश करणारे रुद्र. युः म्हणजे शत्रू. युधिसह युध्यन्ति ते यव्युध, अशी त्याची व्युत्पत्ति आहे. विविध मार्ग रक्षक, ऐलबृद आणि यव्युध असे तीन प्रकारचे जे रुद्र आहेत त्यांचीं धनुष्यें आम्ही हजारों योजनें दूर ठेवतों.

**ये तीर्थानि प्रचरन्ति सृकावन्तो निषङ्गिणः ॥९॥**

**अर्थ**—जे रुद्र काशी–प्रयाग इत्यादी तीर्थक्षेत्रें रक्षण करण्या-करितां त्या त्या क्षेत्रांत संचार करतात व जे सृकावन्त म्हणजे हातांत शस्त्र धारण करतात व कांहीं नंगी तलवार धारण करून संचार करतात, अशा रुद्रांचीं धनुष्यें आम्ही हजारों योजनें दूर ठेवतों.

**य एतावन्तश्च भूयाꣳसश्च दिशो रुद्रा वितस्थिरे ।**
**तेषाꣳ सहस्रयोजनेऽव धन्वानि तन्मसि ॥ १० ॥**

**अर्थ**—आतांपर्यंतच्या मंत्रांनीं आतांपर्यंत सांगितलेले विविध प्रकारचे हे असे रुद्र आणि याहून दशदिशांमध्यें वास्तव्य करून राहिलेले जे अगणित, अपरिमित व असंख्येय असे जे रुद्र आहेत त्या सर्वांचीं धनुष्यें विविध प्रकारचीं आयुधें ही आतां त्यांचें प्रयोजन संपल्यामुळें आम्हीं हजारों योजनें दूर ठेवतों.

**नमो रुद्रेभ्यो ये पृथिव्यां येऽन्तरिक्षे ये दिवि येषामन्नं वातो वर्षमिषवस्तेभ्यो दश प्राचीर्दश दक्षिणा दश प्रतीचीर्दशोदीचीर्दशोर्ध्वास्तेभ्यो नमस्ते नो मृडयन्तु ते यं द्विष्मो यश्च नो द्वेष्टि तं वो जम्भे दधामि ॥ ११ ॥**

**अर्थ**—पृथ्व्यादि जे तीन लोक आहेत त्यांच्या तीन प्रकारा-मुळें यांत तीन यजुर्मंत्र आहेत ते असे नमोरूपेभ्यः येथून ये पृथि-व्याम् येषाम् अन्नम् ईषवः । येथपर्यंत एक मंत्र. ये अंतरिक्षे येषाम्

वात ईषवः येथपर्यंत २ रा मंत्र. ये दिवि येषाम् वर्षमिषवः हा तिसरा मंत्र. या तिन्ही मंत्राशीं मिळून दश प्राचीः हा पुढील मंत्र संबद्ध होतो. जे रुद्र पृथ्वीतलावर राहून अन्नरूपी बाणानेंच अपथ्यकारक अन्न भक्षण करणारे किंवा अन्नाकरितां चौर्य कर्म करणारे व त्याकरितां प्रसंगीं दुसऱ्याचा खूनही करणारे असे जे लोक आहेत त्यांना या अन्नरूपी बाणानेंच शुद्धीवर आणणारे, तसेच जे रुद्र अंतराळांत राहून वायुरूप बाणानें नानाप्रकारचे रोग निर्माण करून शासन करणारे आणि जे रुद्र स्वर्गांत राहून वृष्टिरूप बाणानें दुराचारी लोकांना शासन करणारे केव्हां अतिवृष्टीनें तर केव्हां अनावृष्टीनें असे हे तीन प्रकारचे रुद्र सांगितले. अन्नेषु रुद्र, वातेषु रुद्र आणि वर्षेषु रुद्र अशा त्रिविध रुद्रांना आम्ही दश प्राचीः म्हणजे पूर्वेला दहा अंगुली सरळ करून नमस्कार करतों. त्याचप्रमाणें दश दक्षिणा दक्षिणेलाही तसाच नमस्कार करतों. दश प्रतीचीः पश्चिमेलाही तसाच आणि उत्तरेलाही तसाच नमस्कार करतों. नमस्कार कसा करतों याचें वर्णन दश प्राचीः या मंत्रांत केलें आहे. पूर्वेला दोन्ही हातांची अंजली केली म्हणजे दोन्ही हातांची मिळून दहा बोटें ही पूर्वाग्र होतात. त्याचप्रमाणें दक्षिण, पश्चिम आणि उत्तर समजावी. अशा विशिष्ट तऱ्हेनें वरील सांगितलेल्या तीन प्रकारच्या रुद्रांना आमचा नमस्कार असो. आमच्या नमस्कारानें प्रसन्न झालेले रुद्र आम्हाला सुख देवोत. आणि ज्यांचा आम्ही मनापासून द्वेष करतों आणि जे आम्ही स्वस्थ राहिलों असतांनाही आमचा मनापासून द्वेष करतात असे जे उभयविध शत्रू त्या शत्रूंना हे रुद्रांनो, तुमच्या जंभे म्हणजे पसरलेल्या जबड्यांमध्यें आम्ही ठेवून देतों.

**टीप— या मंत्राचा ऋषि–भगवान्, देवता–श्रीरुद्र, छंद–अनुष्टुभ्.**

**इति श्रीरुद्रार्थदीपिकायाम् एकादशोऽनुवाकः ।**

॥ श्रीः ॥

# चमकविभाग

## अनुवाक पहिला

आतांपर्यंत रुद्राध्यायांतील महत्त्वाच्या भागाचें विवेचन झालें आहे. या पुढील चमक विभागाचें विवेचन सुरू होणार आहे. चमक विभागांत अकरा अनुवाक मिळून एक मंत्र होतो. अशा अकरा चमकांचा विनियोग प्रामुख्यानें वसोर्धारा होमामध्यें करण्यांत आला आहे. एतद् विषयक पुढील कल्पसूत्र.

"अग्ना विष्णू सजोषसा इति चतुर्गृहीतम् हुत्वौदुंबरीम् स्रुचम् व्याममात्रिम् मृदा प्रदीग्धाम् पश्चादासेचनवतीम् घृतस्य पूरयित्वा वाजश्चमे प्रसवश्चमे इति संततम् वसोर्धाराम् जुहोत्या मंत्र समापन्नादिति"

या प्रमाणें आहेत.

अग्नाविष्णू येथून चमकाला सुरुवात होते.

**ॐ अग्नाविष्णू सजोषसे मा वर्धन्तु वां गिरः। द्युम्नैर्वाजेभिरा गतम् ॥ १ ॥**

**अर्थ**—हे अग्नाविष्णू, तुम्ही परस्पर प्रीतियुक्त व्हा. तुमचें परस्परावर प्रेम असो. आम्ही करीत असलेल्या स्तुतीनें आमची वाणी

समृद्ध होवो. वाणीचें पावित्र्य आणि मांगल्य आमच्या वाणीना प्राप्त होवो. आणि आपण दोघे धनधान्यासह समृद्धीसह ऐश्वर्ययुक्त असे होऊन येथें या.

वाजश्च मे प्रसवश्च मे प्रयतिश्च मे प्रसितिश्च मे धीतिश्चं मे क्रतुश्च मे स्वरश्च मे श्लोकश्च मे श्रावश्चं मे श्रुतिश्च मे ज्योतिश्च मे सुवश्च मे प्राणश्च मेऽपानश्चं मे व्यानश्च मेऽसुश्च मे चित्तं च म आधीतं च मे वाक्चं मे मनश्च मे चक्षुश्च मे श्रोत्रं च मे दक्षश्च मे बलं च म ओजश्च मे सहश्च म आयुश्च मे जरा चं म आत्मा चं मे तनूश्च मे शर्म च मे वर्म च मेऽङ्गानि च मेऽस्थानिं च मे परूंषि च मे शरीराणि च मे ॥ १ ॥

अर्थ—या व पुढील अनुवाकांमध्यें जो चकार आलेला आहे तो समुदाय वाचक म्हणून आलेला आहे. आणि मे या शब्दाचा अन्वय दहाव्या अनुवाकामध्यें आलेल्या कल्पताम् या पदाशीं आहे. मला प्राप्त होवो. असा मे कल्पताम् याचा अर्थ आहे.

वाजः म्हणजे अन्न. प्रसव म्हणजे अनुज्ञा. म्हणजेच अन्नाचे स्वामित्व. प्रयति म्हणजे शुद्धि. प्रसितिः म्हणजे अन्नासंबंधीं औत्सुक्य. धीति म्हणजे अन्न धारण करण्याची क्षमता ( कुवत ), ( अन्न पचविण्याची शक्ति ). क्रतु म्हणजे अन्नाला कारणीभूत असणारा यज्ञ. यज्ञात् भवति पर्जन्यः पर्जन्यादन्नसंभवः असें सांगितलेंच आहे. स्वर म्हणजे मंत्रगत उपात्त–अनुपात्त इ. निषाद, धैवत, गांधार हेही संगीतशास्त्रांतील स्वर यांत येतात. स्वर शब्दाचा अर्थ स्वतः रंजयति इति स्वरः। व्यंजननिरपेक्ष स्वर अनुरंजन करतो म्हणूनच त्याला स्वर असें म्हटलें आहे. श्लोक म्हणजे स्तुति. ही दोन प्रकारची.यथार्थ आणि अयथार्थ. परमात्मशक्तीची यथार्थ स्तुति करण्याची शक्ति म्हणजेच श्लोक असा अर्थ आहे. श्रावः म्हणजे ऐकविण्याचें सामर्थ्य. माझ्या मुखांतून अशी अमृतस्रावी वाणी निघूं दे कीं जी ऐकल्यामुळें चराचर मोहित व्हावें. श्रुतिः ऐकण्याचें सामर्थ्य. विश्वावकाशांत निर्माण झालेला ध्वनिचा अति सूक्ष्महि स्पंद आपल्या कानांना पकडतां यावा. ज्योतिः म्हणजे प्रकाश. कधींही कमी न होणारा असा ज्ञानाचा प्रकाश माझ्या हृदयाकाशांत निर्माण होऊं दे. ( आकाशांतील सूर्य अस्ताला जातो आणि नंतर जगांत अंधाराचें साम्राज्य सुरू होतें. परंतु हृदयाकाशांत ज्ञानसूर्य एकदां उदयाला आला म्हणजे त्याला कधींही अस्त नाहीं.) या दृष्टीनें हा अर्थ मनांत आणूनच भगवंतांनीं नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते असें सांगितलें आहे. सुवः म्हणजे स्वर्ग. स्वर्ग या शब्दाचा अर्थ दुःखानें कलुषित न झालेलें असें सुख म्हणजे स्वर्ग. प्राण अपान् हे शरीरांत असणारे वायुविशेष आहेत. त्यांच्यावर माझें प्रभुत्व असो हा आशय. असुः प्राणशक्तीनें युक्त असें वायुचित्त, म्हणजे मनोजन्य ज्ञान, म्हणजेच प्रगट मनानें ग्रहण केलेलें ज्ञानाचे संस्कार ज्या ठिकाणीं चिरंतन वज्रलेप होतात तें चित्त समर्थ असो.

आधीतं म्हणजे ज्ञान विषयक पदार्थजात. वागादि चार शब्द प्रसिद्धार्थक आहेत. दक्ष म्हणजे ज्ञानेंद्रियामध्यें असणारे कौशल आणि बल म्हणजे कर्मेंद्रियाचें सामर्थ्य. ओज म्हणजे सामर्थ्याचा मुख्य आधा असलेला आठवा धातू. सह म्हणजे शत्रूंचा पराभव करण्याचें सामर्थ्य. आयुः म्हणजे आयुष्य हें प्रसिद्ध आहे. जरा म्हणजे केस पांढरे होईपर्यंत आयुष्य ( दीर्घायुष्य ). आत्मा म्हणजे शास्त्रप्रसिद्ध परमात्मा. तनुः म्हणजे रेखीव अवयवानें सौंदर्य प्राप्त झालेलें आणि लावण्याची लव्हाळी असलेलें शरीर. शर्म म्हणजे सुख. वर्म म्हणजे शरीराचें रक्षण करणारें कवच ( चिलखत ). अङ्गानि म्हणजे संपूर्ण अवयव, अस्थानि म्हणजे त्या त्या स्थानांत असणाऱ्या आस्थि (हाडें). परूंषि म्हणजे बोटांचीं पेरें, शरीराणि म्हणजे शरीरांतर्गत सर्व अवयव. हें सर्व या अनुवाकांत सांगितलेलें—मे कल्पताम्—म्हणजे मला प्राप्त होवो.

**इति श्रीरुद्रार्थदीपिकायाम् चमकविभागे प्रथमोऽनुवाकः ।**

---

## अनुवाक दुसरा.

ज्यैष्ठ्यं च मे आधिपत्यं च मे मन्युश्च मे भामश्च मेऽमश्च मेऽम्भश्च मे जेमा च मे महिमा च मे वरिमा च मे प्रथिमा च मे वर्ष्मा च मे द्राघुया च मे वृद्धं च मे वृद्धिश्च मे सत्यं च मे श्रद्धा च मे जगच्च मे धनं च मे वशश्च मे त्विषिश्च मे क्रीडा च मे मोदश्च मे जातं च मे जनिष्यमाणं च मे सूक्तं च मे सुकृतं च मे वित्तं च मे वेद्यं च मे भूतं च मे भविष्यच्च मे सुगं च मे सुपथं च मे ऋद्धं च म ऋद्धिश्च मे क्लृप्तं च मे क्लृप्तिश्च मे मतिश्च मे सुमतिश्च मे ॥ २ ॥

अर्थ— ज्यैष्ठ्य म्हणजे श्रेष्ठता. आधिपत्य म्हणजे स्वामित्व. मन्यु आणि भाम हे दोन शब्द क्रोधाचे वाचक आहेत. एक आंतरक्रोध व एक बाह्य. आंतर म्हणजे मानसक्रोध, बाह्य म्हणजे शारीरिक अक्षमतेमुळें निर्माण होणारा. अमः म्हणजे गणना करण्याला अशक्य. अम्भः शैत्य आणि माधुर्य यांनीं युक्त असें पाणी, जेमा म्हणजे जिंकण्याचें सामर्थ्य, महिमा म्हणजे शत्रूंना जिंकून आणलेली संपत्ति. वरिमा म्हणजे पूज्यत्व. प्रथिमा म्हणजे गृह. गृहक्षेत्रादि स्थावर संपत्तीचा विस्तार.

वर्ष्मा म्हणजे पुत्रपौत्र यांचीं शरीरें. आणि द्राघुया म्हणजे पुत्रपौत्रांचें दीर्घकाल सातत्य, अविच्छिन्न संतती. वृघ्दम् म्हणजे अन्न आणि धन यांची वृद्धि. वृद्धि म्हणजे विद्यादि गुणांनीं होणारा उत्कर्ष. सत्य म्हणजे यथार्थ भाषण. श्रद्धा म्हणजे परलोक आहे अशी बुद्धि. जगत् म्हणजे जंगम गायी वगैरे संपात्ति. धन म्हणजे सुवर्णादि. वशः म्हणजे सर्ववशताः त्विषिः. म्हणजे शरीरकांति; क्रीडा अक्षद्युतादि ( जुगार-फांसे वगैरे ). मोद– म्हणजे त्या पासून निर्माण होणारा आनंद. जातम्–पूर्वीं झालेली संतति. जनिष्यमाणम् म्हणजे पुढें होणारी संताति. सूक्तं म्हणजे वेदांतील ऋचांचा समूह. (ऋचा म्हणजे दोन मंत्र मिळून एक ऋचा आणि अशा अनेक ऋचांचें मिळून एक सूक्त होतें.) सुकृतं म्हणजे सूक्तांच्या जपामुळें निर्माण होणारें अपूर्व (पुण्य). वित्त म्हणजे पूर्वीं मिळालेलें द्रव्य. वेद्यम्–म्हणजे पुढें मिळविलें जाणारें (भावी काळांत ) द्रव्य. भूतं–म्हणजे वडिलार्जित किंवा स्वतःच्या पूर्व संचितानें मिळालेली संपत्ति. भविष्यत् म्हणजे स्वतःच्या पराक्रमावर भिस्त ठेवून मिळविली जाणारी संपत्ति. सुगं म्हणजे स्नेही सोबती, बंधुजन यांच्यासमवेत सहलीला जाणें. सुपथं–म्हणजे निष्कंटक-आणि चोरांची भीति नसलेला मार्ग. ऋद्धं म्हणजे वाढलेलें ऐश्वर्य किंवा अनुष्ठित कर्माचें फल. ऋद्धि म्हणजे पुढें अनुष्ठान केल्या जाणाऱ्या यज्ञाचें फल. क्लृप्तं म्हणजे समर्थ, आपल्या हातीं असलेलें द्रव्य. क्लृप्तिः म्हणजे स्वतःचें सामर्थ्य, ( युक्ति सामर्थ्य, बुद्धि सामर्थ्य वगैरे ). मतिः म्हणजे बरें वाईट ओळखण्याची बुद्धि. सुमति म्हणजे अत्यंत दुर्घट अशीं कार्यें अंगावर घेऊन तडीस नेण्याचें साहस. हें सर्व–मे कल्पताम्–तुझ्या कृपेनें मला प्राप्त होवो.

**इति श्रीरुद्रार्थदीपिकायां चमकविभागे द्वितीयोऽनुवाकः ॥**

## अनुवाक तिसरा.

शं च मे मयश्च मे प्रियं च मेऽनुकामश्च मे कामश्च मे सौमनसश्च मे भद्रं च मे श्रेयश्च मे वस्यश्च मे यशश्च मे भगश्च मे द्रविणं च मे यन्ता च मे धर्ता च मे क्षेमश्च मे धृतिश्च मे विश्वं च मे महश्च मे संविच्च मे ज्ञात्रं च मे सूश्च मे प्रसूश्च मे सीरं च मे लयश्च म ऋतं च मेऽमृतं च मेऽयक्ष्मं च मेऽनामयच्च मे जीवातुश्च मे दीर्घायुत्वं च मेऽनमित्रं च मेऽभयं च मे सुगं च मे शयनं च मे सूषा च मे सुदिनं च मे ॥ ३ ॥

अर्थ—शम् म्हणजे ऐहिक सुख. मयः म्हणजे पारलौकिक सुख. प्रियं म्हणजे प्रीतिला कारणीभूत होणारी वस्तु. अनुकाम म्हणजे अनुकूल स्वभावामुळें अपेक्षिला जाणारा पदार्थ. प्रिय आणि अनुकाम या दोन्ही गोष्टी ऐहिकच घ्यावयाच्या. तारतम्यानें परंतु ऐहिकच. काम म्हणजे आमुष्मिक ( परलोकांमध्यें मिळणारें ) स्वर्गादिरूप फल. सौमनसः म्हणजे मनाला स्वास्थ्य देणारा हितचिंतक व प्रिय असा बंधुवर्ग. भद्र आणि श्रेय म्हणजे इहपरलोकांमध्यें कल्याण. वस्य-

म्हणजे निवासस्थान, गृह, प्रासाद वगैरे. यशः, भगः, व द्रविणम् म्हणजे कीर्ति, सौभाग्य, आणि धन. यन्ता म्हणजे नियामक आचार्य, गुरु वगैरे. धर्ता म्हणजे पोषण करणारे, पित्रादि. क्षेमः म्हणजे असलेल्या संपत्तीचें रक्षण करण्याची असलेली शक्ति. धृतिः म्हणजे संकटकालांतही धीर न सोडणें. विश्व म्हणजे सर्व लोकांचें आनूकूल्य. महः म्हणजे—पूजा. संवित्—वेद्र शास्त्रादि विज्ञान. ज्ञानम्—म्हणजे दुसऱ्याला समजावून देण्याचें सामर्थ्य. सूः आणि प्रसूः म्हणजे पुत्र आणि भृत्य ( नौकर—सेवक ) यांना प्रेरणा देण्याचें सामर्थ्य. सीरम् म्हणजे नांगर इत्यादि शेतीचीं अवजारें. लयः म्हणजे शेती करीत असतांना येणाऱ्या अडचणींचें निराकरण करण्याचें सामर्थ्य. ऋतम् आणि अमृतम् म्हणजे यज्ञादि कर्म आणि त्याचें फल. यक्ष्मम्, अनामयत् म्हणजे क्षयासारखे जीवनव्यापी आणि दुःसाध्य व ज्वरासारखे अल्पकाल राहणारे व लौकर बरे होणारे असे रोग. जीवातुः म्हणजे जीवनाला कारणीभूत होणारे ( आरोग्यकर ), व्याधींचा परिहार करूं शकणारें औषध. दीर्घायुत्वम् म्हणजे अपमृत्यूरहित अशा दीर्घायुष्याचा लाभ. अनमित्रम् म्हणजे शत्रु नसणारे ( अजातशत्रु ). अभयम्—भय नसणें. सुगम्—सद्वर्तन ( शुभ आचार )—ज्याचें अनुकरण इतरांनीं करावें. शयनम् म्हणजे गाद्यागिरद्या, पलंग वगैरे झोंपण्याचीं समृद्ध साधनें. सुषा—म्हणजे—स्नान, संध्या, देवपूजा इ. शुभ कर्मांनीं सुरुवात होणारा रमणीय प्रातःकाल. आणि सुदिनम् म्हणजे यज्ञ, दान, अध्ययनादि दैवी कर्माचरणानें गेलेला संपूर्ण दिवस. हें सर्व तुझ्या कृपेनें—मे कल्पताम्— मला प्राप्त होवो.

इति श्रीरुद्रार्थदीपिकायां चमकविभागे तृतीयोनुवाकः ॥

## अनुवाक चौथा.

उर्क्चं मे सूनृता च मे पयश्च मे रसश्च मे घृतं च मे मधु च मे सग्धिश्च मे सपीतिश्च मे कृषिश्चं मे वृष्टिश्च मे जैत्रं च म औद्भिद्यं च मे रयिश्चं मे रायश्च मे पुष्टं चं मे पुष्टिश्च मे विभु चं मे प्रभु चं मे बहु चं मे भूयश्च मे पूर्णं चं मे पूर्णतरं च मेऽक्षितिश्च मे कूयवाश्च मेऽन्नं च मेऽक्षुच्च मे व्रीहयश्च मे यवाश्च मे माषाश्च मे तिलाश्च मे मुद्गाश्चं मे खल्वाश्च मे गोधूमाश्च मे मसुराश्च मे प्रियङ्गवश्च मेऽणवश्च मे श्यामाकाश्च मे नीवाराश्च मे ॥ ४ ॥

अर्थ—उर्क म्हणजे सामान्य अन्न. सूनृता म्हणजे प्रियोक्ति, प्रिय-वचनम्. पयः शद्बापासून पुढील शब्द विशेष अन्नवाचक समजावेत. तें असे. पयः म्हणजे दूध (दूध हें पूर्णान्न व लौकर पचणारें म्हणून सर्व आहारांमध्यें श्रेष्ठ ठरणारें असें आधुनिक वैज्ञानिकहि मान्य करतात.) रसः म्हणजे दुधांतलें सार, गर्भभाग (लोणी). घृत, मधु, हे शब्द प्रसिद्धार्थक आहेत. साग्धिः म्हणजे आप्तेष्टासह भोजन. तसेच सपीतिः

म्हणजे सहपान. कृषि, वृष्टि हेही शब्द प्रसिद्धच आहेत. कृषि म्हणजे शेती व वृष्टि म्हणजे पाऊस. धान्य निर्मितीसाठीं या दोहोंची जरूरी असते. जैत्र म्हणजे जयशील, जय प्राप्त करून देणारे, म्हणजे धनधान्याच्या रूपानें सुक्षेत्र अशी भूमि. औद्भियम् म्हणजे वृक्षलता इत्यादिंची उत्पत्ति. शेती आणि पाऊस यांची धान्य निर्मितीला जशी आवश्यकता असते तशीच घनदाट अरण्यांचीही असते. घनदाट अरण्यें हें राष्ट्राचें भूषण मानलें जात होतें. प्राणि सृष्टीचें जीवन हें वनस्पति सृष्टीवरच मुख्यतः अवलंबून असल्यामुळें अरण्यांना मानवी जीवनांत अपार महत्त्व प्राप्त झालें होतें. आज सुरू झालेली जंगलें वाढवा ही मोहीम शुभ सूचकच आहे. प्राचीन काळीं जंगलांचें महत्त्व लोकांना किती वाटत असे याचा सूचक म्हणून हा शब्द लक्षांत ठेवण्यासारखा आहे. रयिः म्हणजे सुवर्ण. हें निर्माण होण्याची खाण; खाणींतून निर्माण होणारी सर्व तऱ्हेची खनिज संपत्ति. तसेच रायः म्हणजे मणिमौक्तिकें, म्हणजेच मोतीं ही पाण्यांतून काढली जाणारी संपत्ति. जलसंपत्ति आणि स्थलसंपत्ति म्हणजेच खनिज संपत्ति, ही त्या काळांत लोकांना महत्त्वाची वाटत असे आणि ती ते प्राप्त करून घेत असत याबद्दलचा हा संदर्भ इतिहासतज्ञांना विचार करण्यासारखा आहे. पुष्टं आणि पुष्टिः म्हणजे पूर्वी सांगितलेली आकरज म्हणजे खनिज संपत्ति आणि जलसंपत्ति ( मणिमौक्तीकें ) आणि शरीरपुष्टता. विभु पासून आक्षिति पर्यंत उत्तरोत्तर वाढत्या प्रमाणांत धान्यांची वृद्धि तारतम्यानें समजावी. ही वृद्धि सात प्रकारांनीं सांगितली आहे. केवळ प्रवृद्ध प्रकर्षानें असलेलीं धान्येंच नव्हेत तर क्षुद्र धान्यें सुद्धां. ( अल्पधान्यें ) पुढें सांगतात. कूयवाः कुत्सित यवधान्य. नासलेल्या धान्यांचेहि उल्लेख करण्याचें कारण, अशीं धान्यें खाण्याला निरुपयोगीं असलीं तरी त्यांचा उपयोग दुसऱ्या प्रकारानें होऊं शकतो. म्हणून तीं सर्वथैव

निरुपयोगी न समजतां अशा धान्यांचा उपयोग पुनर्धान्यउत्पत्ति-कडे करावा ( खतांच्या रूपानें ) असा ऋषिंचा आशय असावा. अन्नम् हें प्रसिद्ध आहे. अक्षुत म्हणजे अन्नानें होणारा क्षुधेचा परिहार ( भूक थांबणें ). व्रीहिः (भात), यव (जव-सातू), माष (उडीद), तिल (तीळ), व मुद्ग ( मूग ) हीं धान्यें प्रसिद्धच आहेत. खल्व म्हणजे मुगापेक्षां किंचित् मोठ्या आकाराचें धान्य. अथर्ववेदामध्यें खल्व म्हणजे चणक ( चणे ) हरभरे, असें सांगितलें आहे. गोधूम म्हणजे गहूं. मसूरा म्हणजे मसूर. प्रियङ्गवः—धान्यविशेष ( एक प्रकारचे बारीक भात असावें ). अणवः म्हणजे बारीक तांदळाचे भात. श्यामाक म्हणजे गांवांत निर्माण होणारा धान्यविशेष. नीवार म्हणजे अरण्यांत निर्माण होणारा धान्य-विशेष. हीं सर्व धनधान्यें माझ्या घरीं विपुल प्रमाणांत निरंतर तुझ्या कृपेनें—मे कल्पताम्—मला प्राप्त होवोत.

टीप— या अनुवाकांत आलेल्या कडधान्यांचा विचार केला असतां त्या काळांत हीं कडधान्यें सर्रास उपयोगांत आणलीं जात असत; त्यामुळें आरोग्य चांगलें रहात होतें. कडधान्यांत असलेल्या जीवनसत्वाची (व्हिटॅमिन्सची) चांगलीच ओळख त्या वेळीं लोकांना होती असें दिसतें. कारण, हीं सर्व धान्यें कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत मानवी शरीरधारणेला अत्यावश्यक अशींच आहेत.

इति श्रीरुद्रार्थदीपिकायाम् चमकविभागे चतुर्थोऽनुवाकः ।

## अनुवाक पांचवा.

अश्मा च मे मृत्तिका च मे गिरयश्च मे पर्वताश्च मे सिकताश्च मे वनस्पतयश्च मे हिरण्यं च मेऽयश्च मे सीसं च मे त्रपुश्च मे श्यामं च मे लोहं च मेऽग्निश्च म आपश्च मे वीरुधश्च म ओषधयश्च मे कृष्टपच्यं च मेऽकृष्टपच्यं च मे ग्राम्याश्च मे पशव आरण्याश्च यज्ञेन कल्पन्तां वित्तं च मे वित्तिश्च मे भूतं च मे भूतिश्च मे वसु च मे वसतिश्च मे कर्म च मे शक्तिश्च मेऽर्थश्च म एमश्च म इतिश्च मे गतिश्च मे ॥ ५ ॥

अर्थ—अश्मादि पदार्थ प्रसिद्ध आहेत. या सर्वांचा उपयोग मानवी जीवनांत असून त्यांचा विश्वकल्याणाकडेही उपयोग करण्यांत येतो, हाच मुख्य आशय हे पदार्थ सांगण्यामागें आहे. शाम म्हणजे काळे लोखंड ( खाणींतून काढलेलें अशुद्धलोहम् म्हणजे कांस्य, कासें-तांबें वगैरे खनिज धातु घ्यावयाचे). अग्न्यादि शब्द हे प्रसिद्ध आहेत. ग्राम्य पशु आणि आरण्यक पशु हे यज्ञाच्या निमित्तानें समर्थ होवोत. वित्तम् आणि वित्तिः म्हणजे पूर्वी प्राप्त झालेलें व पुढें प्राप्त होणारें द्रव्य-ऐश्वर्य. भूतं म्हणजे ऐश्वर्यशाली अशी पुत्रादि संतति. भूतिः म्हणजे स्वतःचें ऐश्वर्य, वसु म्हणजे निवाससाधन गायी वगैरे.

( ज्यांच्या आधारावर जीवंत राहतां येईल असें गायीचें दूध हा आशय. दूध हें पूर्णान्न आहे. ) वसतिः म्हणजे घर वगैरे. कर्म म्हणजे अग्निहोत्रादि. शक्तिः म्हणजे वेदप्रतिपादित कर्म करण्याचें सामर्थ्य. अर्थः म्हणजे प्रयोजनविशेष ( संकल्प सिद्धि ). एमः म्हणजे एतव्यम् प्राप्तव्यम्, भावी काळांत प्राप्त होणारें सुख. इति हा शब्द गतिवाचक आहे. अयनम्—इष्टप्राप्तीचा उपाय आणि गति म्हणजे इष्टप्राप्ति होणें.

सर्व स्थावर जंगम संपत्तीचा उपयोग मानवी जीवनांत कुशलतेनें करून घेण्याचें बुद्धिवैभव तत्कालीन लोकांना होतें असें या अनुवाका-वरून म्हणण्यास हरकत नसावी.

इति श्रीरुद्रार्थदीपिकायाम् चमकविभागे पंचमोऽनुवाकः ।

अनुवाक सहावा

अग्निश्च म इन्द्रश्च मे सोमश्च म इन्द्रश्च मे सविता च म इन्द्रश्च मे बृहस्पतिश्च म इन्द्रश्च मे मित्रश्च म इन्द्रश्च मे वरुणश्च म इन्द्रश्च मे त्वष्टा च म इन्द्रश्च मे धाता च म इन्द्रश्च मे विष्णुश्च म इन्द्रश्च मेऽश्विनौ च म इन्द्रश्च मे मरुतश्च म इन्द्रश्च मे विश्वे च मे देवा इन्द्रश्च मे पृथिवी च म इन्द्रश्च मेऽन्तरिक्षं च म इन्द्रश्च मे द्यौश्च म इन्द्रश्च मे दिशश्च म इन्द्रश्च मे मूर्धा च म इन्द्रश्च मे प्रजापतिश्च म इन्द्रश्च मे ॥ ६ ॥

**अर्थः**—या अनुवाकांत अग्निप्रमुख ज्या देवता सांगितल्या आहेत त्या प्रसिद्धच आहेत. भारतीय ऋषींच्या दैवी प्रज्ञेतून विश्व-कल्याणार्थ आवश्यक असणाऱ्या या सर्व देवता म्हणजे भौतिक शक्तीच होत. यापैकीं एकही शक्ति कमी अधिक जास्त झाली तर विश्व ब्रह्मांडाचें संतुलन राहणार नाहीं. इतक्या या सर्व शक्ति अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या सर्व शक्ति तपश्चर्येच्या योगानें स्वाधीन करून घेतल्या तर भौतिक जगांवर पूर्ण ताबा येणें अशक्य नाहीं.

या सर्व शक्तींसह इंद्राचा उल्लेख ह्या अनुवाकांत केला आहे. याचें कारण इंद्र हा त्रिविध ऐश्वर्याचें प्रतीक म्हणूनच सर्वश्रेष्ठ अशी देवता मानण्यांत आला आहे. अशा या सर्वश्रेष्ठ इंद्रदेवतेसह या सर्व शक्ति तसेच दिक् या शब्दानें या अनुवाकांत पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर या चार दिशा, मूर्धा शब्दानें सांगितलेली उर्ध्व दिशा ( सर्व दिशांमध्यें ती मुख्य असल्यामुळें तिचा मुद्दाम स्वतंत्र शब्दानें उल्लेख केला गेला. ) तुझ्या कृपेनें मला अनुकूल होवोत.

इति श्रीरुद्रार्थदीपिकायाम् चमकविभागे षष्ठोऽनुवाकः ।

## अनुवाक सातवा.

अ॒ꣳशुश्च॑ मे र॒श्मिश्च॒ मेऽदा॑भ्यश्च॒ मेऽधिपतिश्च म उपा॒ꣳशुश्च॑ मेऽन्तर्या॒मश्च॑ म ऐन्द्रवाय॒वश्च॑ मे मैत्रावरु॒णश्च॑ म आश्वि॒नश्च॑ मे प्रतिप्र॒स्थानश्च मे शुक्रश्च॑ मे म॒न्थी च॑ म आग्रय॒णश्च॑ मे वैश्वदे॒वश्च॑ मे ध्रु॒वश्च॑ मे वैश्वान॒रश्च॑ म ऋतुग्र॒हाश्च॑ मेऽतिग्रा॒ह्याश्च म ऐन्द्रा॒ग्नश्च॑ मे वैश्वदे॒वश्च॑ मे मरु॒त्वतीयाश्च मे मा॒हेन्द्रश्च॑ म आदि॒त्यश्च॑ मे सावि॒त्रश्च॑ मे सारस्व॒तश्च॑ मे पौ॒ष्णश्च॑ मे पात्नीव॒तश्च॑ मे हारियो॒जनश्च॑ मे ॥ ७ ॥

**अर्थ** :—या अनुवाकांपासून पुढील सर्व अनुवाकांमध्यें श्रौत यज्ञप्रक्रियेंतील म्हणजे वेदांत सांगितलेल्या यज्ञाच्या परिभाषेंत यज्ञाची कांहीं अंगें — अंगभूत पदार्थ सांगितले आहेत. हे पदार्थ-वाचक शब्दाहि पारिभाषिक स्वरूपाचे असल्यामुळें सामान्य वाचकांना कळण्यास थोडें कठीण आहेत. तथापि श्रौत यज्ञाची परिभाषा अगोदर समजून घेतली तर या व यापुढील अनुवाकांत आलेल्या यज्ञिय पदार्थ-वाचक पारिभाषिक शब्दांचा अर्थ उत्तम तऱ्हेनें लक्षांत येईल.

सोमप्रकरणांमध्यें अंश्वादि सोमग्रहविशेष प्रसिद्ध आहेत. सोमग्रह या शब्दाचा अर्थ सोमरस ठेवण्याचें लाकडी आकारविशेषानें युक्त असें पात्र. अशा पात्रांना ग्रह—गृण्हाति सोमरसम् इति ग्रहः—असा यज्ञ-प्रकरणांमध्यें पारिभाषिक शब्द आहे. हे ग्रह ज्या ज्या देवतांना उद्देशून सांगितलेले आहेत त्या त्या देवतांच्या नांवानेंच हे प्रसिद्ध आहेत. उदा आदित्य ग्रह म्हणजे आदित्य देवता आहे ज्याची असा ग्रह, त्याला आदित्य ग्रह असें म्हणतात. ऐन्द्रवायवग्रह याचा अर्थ इंद्र आणि वायू या दोन देवतांना उद्देशून ज्या आकारविशिष्ट पात्रांतून ( लांकडाच्या ) सोमरस अग्निमध्यें प्रक्षिप्त केला जातो त्याला ऐंद्रवायवग्रह म्हणतात. या विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत ग्रह म्हणजे काय हें आलेंच असेल. हीच उपपत्ति ग्रह शब्द जिथें जिथें येईल तिथें तिथें समजावी. सोमप्रकरणांमध्यें रश्मिग्रह नाहीं. म्हणून अदाभ्य नांवाचा जो ग्रह तोच अंशु म्हणजे किरणं पृथः-कृत्य—बाजूला करून—रश्मि शब्दानें येथें सांगितला आहे. रश्मिच्या योगानें तो ग्रह घेतला जातो म्हणून त्याला रश्मिग्रह म्हणतात. या रश्मिग्रहाचा ग्रहणमंत्र पुढीलप्रमाणें आहे.

" शुक्रन्ते शुक्रेण गृह्णाम्यन्होरूपेण सूर्यस्य रश्मिभिः "

अधिपति शब्दानें दधिग्रह इथें घ्यावयाचा. तो श्रेष्ठ असल्यामुळें त्याला अधिपति असें म्हणतात. दधिग्रह हा सर्व ग्रहांत श्रेष्ठ असल्या-बद्दल "ज्येष्ठो वा एषयद्ग्रहाणाम्" असें श्रुतिवाक्य याविषयीं प्रमाण आहे प्रतिप्रस्थान या शब्दानें द्विदैवत्य ग्रहांबरोबर त्यांचा प्रतिनिधिहि विवक्षित आहे. ध्रुवाख्य ग्रहाच्या विशिष्ट दशेमध्यें वैश्वानरसूक्ताचा

पाठ असल्यामुळें वैश्वानर शब्दानेंच या ग्रहाचा उल्लेख करण्यांत आला आहे. पहिला वैश्वदेव ग्रह हा प्रातःसवनांतील आहे. तर दुसरा वैश्वदेव ग्रह हा तृतीय सवनांतील आहे. सारस्वत ग्रह अभिषेचनीय नांवाच्या विकृतीमध्यें सांगितला आहे. "सारस्वतग्रहं गृह्णाति" असें त्या ग्रहाचें विधायक श्रुतिवाक्य तेथें आहे. त्याचप्रमाणें पौष्ण नांवाचा ग्रहहि विकृतीमध्येंच सांगितलेला आहे. हे सर्व ग्रह ज्या यज्ञामध्यें सांगितलेले आहेत ते सर्व श्रौतयज्ञ तुझ्या कृपेनें —मे कल्पताम्—मला प्राप्त होवोत, ( माझ्याकडून होवोत ), करण्याचें सामर्थ्य येवो.

इति श्रीरुद्रार्थदीपिकायाम् चमकविभागे सप्तमोऽनुवाकः ॥

## अनुवाक आठवा.

इध्मश्च मे बर्हिश्च मे वेदिश्च मे धिष्णियाश्च मे स्रुचश्च मे चमसाश्च मे ग्रावाणश्च मे स्वरवश्च म उपरवाश्च मे धिषवणे च मे द्रोणकलशश्च मे वायव्यानि च मे पूतभृच्च म आधवनीयश्च म आग्नींध्रं च मे हविर्धानं च मे गृहाश्च मे सदश्च मे पुरोडाशाश्च मे पचताश्च मेऽभृवथश्च मे स्वगाकारश्च मे ॥ ८ ॥

**अर्थ** — या अनुवाकांत सर्व यज्ञाची अंगभूत द्रव्यें-यज्ञसाधनें सांगितलीं आहेत. ही सर्व यज्ञप्रकरणामध्यें प्रसिद्ध आहेत. वाचकांनीं यज्ञपरिभाषा समजून घेऊन मगच या शब्दांचा अर्थ लक्षांत घ्यावा. येथें त्यांचें विवेचन स्थल कालाच्या मर्यादा लक्षांत घेतां अधिक विस्तृत केलें नाहीं. इध्मा, बर्हि, वेदि वगैरे सर्व शब्द हे पारिभाषिक आहेत. यांचा अर्थही सामान्यतः याज्ञिक सांप्रदायामध्यें प्रसिद्ध आहे. गृहाः या शब्दाचा अर्थ पत्नी, शाला वगैरे. पचतः या शब्दाचा अर्थ शामित्र वगैरे. शामित्रशाला म्हणून स्वतंत्र असते. स्वगाकारः म्हणजे शंयुवाक. याला शंयुवाक असें म्हणण्याचें कारण त्या त्या देवतांना हविर्द्रव्य यानें पोचविलें जातें म्हणून. अवभृत म्हणजे यज्ञ समाप्तीनंतर जें स्नान करतात त्याला अवभृतस्नान असें म्हणतात. पूर्वोक्तरांग

सहित कर्मांचें विधिपूर्वक अनुष्ठान केल्याशिवाय अशा अवभृतस्नानाचा अधिकार प्राप्त होत नाहीं. म्हणून हें अवभृतस्नान तुझ्या कृपेनें—मे कल्पताम्—म्हणजे मला मिळो.

इति श्रीरुद्रार्थदीपिकायाम् चमकविभागे अष्टमोऽनुवाकः।

---

## अनुवाक नववा.

अग्निश्च मे घर्मश्च मेऽर्कश्च मे सूर्यश्च मे प्राणश्च मेऽश्वमेधश्च मे पृथिवी च मेऽदितिश्च मे दितिश्च मे द्यौश्च मे शक्वरीरङ्गुलयो दिशश्च मे यज्ञेन कल्पन्तामृक्च मे साम च मे स्तोमश्च मे यजुश्च मे दीक्षा च मे तपश्च म ऋतुश्च मे व्रतं च मेऽहोरात्रयोर्वृष्ट्या बृहद्रथन्तरे च मे यज्ञेन कल्पेताम्॥ ९ ॥

अर्थः—या अनुवाकांतही येणारे शब्द यज्ञ प्रकरणांतील पारिभाषिक स्वरूपाचे आहेत.

अग्निः, चयनसंस्कार ज्याच्यावर केलेला आहे असा वन्हि म्हणजेच या अनुवाकांत सुरुवातीला सांगितलेला अग्नि होय. घर्म म्हणजे प्रवर्ग्य हा पारिभाषिक शब्द आहे. याचा विशेष खुलासा यज्ञ प्रकरणांमध्यें वाचकांनीं पहावा. अर्क या शब्दाचा अर्थ, ‘ इंद्रायार्कवते पुरोडाशम् ’ या वाक्यानें सांगितलेला जो याग तो अर्कयाग. सूर्य म्हणजे, सौर्यचरु. या वाक्यानें विहित तो सूर्ययाग; “ प्राणायस्वाहा ” या वाक्यानें सांगितलेला जो होम तो प्राण. अश्वमेध प्रसिद्ध आहे. पृथ्वीप्रभृति हीं विशेषदेवतांचीं नांवें आहेत. शक्वरी म्हणजे अंगुली. हाताचीं बोटें हीं जशीं माणसाची म्हणजेच सृष्टींतल्या व्यक्तीचीं अंगें—अवयव असतात. त्याचप्रमाणें विराट पुरुषाच्या ज्या अंगुली त्यांना शक्वरी असें म्हणतात. समष्टींतल्या विराटपुरुषाचे शरीरावयव

हा आशय. दिशः या शब्दानें दाही दिशा घ्यावयाच्या. या सर्व दिशा माझ्या यज्ञानें, मी करीत असलेल्या विशेषयज्ञानें, त्या त्या दिशा स्वकार्यामध्यें समर्थ होवोत. ऋगादि हें मंत्रवाचक शब्द आहेत. स्तोम म्हणजे ज्या मंत्रावर सामाची आवृत्ति करून जी स्तुति केली जाते त्याला स्तोम असें म्हणतात. ऋग्वेदांतील मंत्रावर साम गायलें जातें. साम म्हणजे विशिष्ट प्रकारच्या आरोहावरोहांनी लयबद्ध, तालबद्ध असें जें गायन केलें जातें त्याला म्हणतात. सामवेद हा संगीत शास्त्रांतील मूल प्रमेयांचा आद्यग्रंथ म्हणून जागतिक संगीत वाङ्मयाच्या इतिहासांत मान्यता पावला आहे. दीक्षा म्हणजे यज्ञ सुरू करतांना केला जाणारा यजमानावर एक संस्कारविशेष. तपः म्हणजे पापक्षयासाठीं केलीं जाणारीं अनशन, कृच्छ्र, चांद्रायणादि व्रतें. ऋतु म्हणजे यज्ञाचा अंगभूत असा काल. व्रत म्हणजे विशेष नियम स्वेच्छेनें पालन करणें. दिवस आणि रात्र यांच्याशीं संबंधित अशी जी वृष्टी म्हणजे पाऊस त्यानें माझें धान्य समृद्ध होवो असा आशय. बृहत् आणि रथंतर हीं दोन सामांचीं नांवें आहेत. बृहत्साम आणि रथंतर-साम ( साम शब्दाचा अर्थ वर दिलाच आहे ) अशीं दोन सामें. हे सर्व माझ्या यज्ञानें आणि तुझ्या कृपेनें स्वकार्यक्षम होवोत.

इति श्रीरुद्रार्थदीपिकायाम् चमकविभागे नवमोऽनुवाकः ।

## अनुवाक दहावा.

गर्भाश्च मे वत्साश्च मे त्र्यविश्च मे त्र्यवी च मे दित्यवाट् च मे दित्यौही चमे पञ्चाविश्च मे पञ्चावी च मे त्रिवत्सश्च मे त्रिवत्सा च मे तुर्यवाट् च मे तुर्यौही च मे पष्ठवाच्च मे पष्ठौही च म उक्षा च मे वशा च म ऋषभश्च मे वेहच्च मेऽनड्वान् च मे धेनुश्च म आयुर्यज्ञेन कल्पतां प्राणो यज्ञेन कल्पतामपानो यज्ञेन कल्पतां व्यानो यज्ञेन कल्पतां चक्षुर्यज्ञेन कल्पताँ श्रोत्रं यज्ञेन कल्पतां मनो यज्ञेन कल्पतां वाग्यज्ञेन कल्पतामात्मा यज्ञेन कल्पतां यज्ञो यज्ञेन कल्पताम् ॥ १० ॥

**अर्थ**—गर्भ हा शब्द प्रसिद्ध आहे. वत्स म्हणजे दीड वर्ष ज्याला झालें आहे असा बैल. यालाच त्र्यवि: असें म्हणतात. एवढाच काळ झालेल्या कालवडीला त्रियवी असें म्हणतात. ऋषभ म्हणजे दोन वर्षांचा बैल. त्याला दित्यवाट् असें म्हणतात. दोन वर्षांच्या गाईला दित्यौही असें म्हणतात. पञ्चावि: म्हणजे अडीच वर्षांचा बैल आणि अडीच वर्षांची गाय ही पंचावी. तीन वर्षांचा जो बैल तो त्रिवत्स

आणि तीन वर्षांची जी गाय ती त्रिवत्सा. तसेंच साडेतीन वर्षांचा जो बैल तो तुर्यवाट् आणि साडेतीन वर्षांची जी गाय ती तुर्यौही. चार पूर्ण वर्षांचा जो बैल तो षष्ठवाट् आणि तितक्याच वर्षांची जी गाय ती षष्ठौही. चांगल्या तऱ्हेची पशुसंपत्ति निर्माण व्हावी म्हणून खास जे वळू पाळलेले असतात त्यांना उक्षा असें म्हणतात. यावरून पूर्वी पशुसंपत्तिविषयीं किती आस्था होती याची कल्पना येते. संतति न होणारी म्हणजे वंध्या अशी जी गाय तिला वशा असें म्हणतात. उक्षा म्हणजे म्हातारा बैल आणि वेहत् म्हणजे गर्भाचा घात करणारी गाय हा गर्भघात जाणूनबुजून नव्हे, तर आगंतुक कारणांनीं होणारा गर्भस्राव. गाडी ओढणारा जो बैल त्याला अनड्वान् असें म्हणतात. नवप्रसूता म्हणजे नुकतीच व्यालेली गाय. तिला धेनू असें म्हणतात. आयुरादि शब्द हे प्रसिद्धार्थक आहेत. आत्मा म्हणजे शरीर असा या ठिकाणीं अर्थ घ्यावयाचा. आप्नोति पांचभौतिकम् शरीरम् इति आत्मा. वर सांगितलेलें आयुरादि सर्व पदार्थ मी करीत असलेल्या यज्ञानें स्वकार्यक्षम होवोत आणि पुढें केला जाणारा अश्वमेधप्रभृति यज्ञ तोही सध्यां करीत असलेल्या यज्ञानें स्वकार्यक्षम होवो. म्हणजे या यज्ञानें तो यज्ञ (भावी काळांत करावयाचा यज्ञ) करण्याचें सामर्थ्य तुझ्या कृपेनें मला मिळो.

**इति श्रीरुद्रार्थदीपिकायाम् चमकविभागे दशमोऽनुवाकः ।**

## अनुवाक अकरावा.

एका च मे तिस्रश्च मे पञ्च च मे सप्त च मे नव च म एकादश च मे त्रयोदश मे पञ्चदश च मे सप्तदश च मे नवदश च म एकविंशतिश्च मे त्रयोविंशतिश्च मे पञ्चविंशतिश्च मे सप्तविंशतिश्च मे नवविंशतिश्च म एकत्रिंशच्च मे त्रयस्त्रिंशच्च मे चतस्रश्च मेऽष्टौ च मे द्वादश च मे षोडश च मे विंशतिश्च मे चतुर्विंशतिश्च मेऽष्टाविंशतिश्च मे द्वात्रिंशच्च मे षट्त्रिंशच्च मे चत्वारिंशच्च मे चतुश्चत्वारिंशच्च मेऽष्टाचत्वारिंशच्च मे वाजश्च प्रसवश्चापिजश्च क्रतुश्च सुवश्च मूर्धा च व्यश्नियश्चाऽन्त्यायनश्चान्त्यश्च भौवनश्च भुवनश्चाधिपतिश्च ॥ ११ ॥

**अर्थ :**—एक प्रभृति हे शब्द सर्व संख्यापर असे आहेत. त्यांत कांहीं विषम संख्यावाचक तर कांहीं सम संख्यावाचक असे शब्द

आहेत. या उभयविध संख्यावाचक शब्दांनीं ती ती संख्या मला प्राप्त होवो असा जरी वाच्यार्थ असला तरी याच्या पाठीमागें सूक्ष्मार्थ आहे. तो अर्थ या संख्यावाचक शब्दांनीं घ्यावयाचा आहे. विश्व-ब्रह्मांडाचा पसारा सुरूं होण्यापूर्वीं तो ज्या परंपरेनें आणि क्रमानें सुरूं झाला तो क्रमही येथें विवक्षित आहे. एक या शब्दावरून अविकृत, निर्गुण, निराकार, असें ब्रह्म (जगाचें उपादानकारण) घेतलें तर त्याच्यापासून पुढें तिस्रः म्हणजे सत्त्व, रज, तम असे तीन गुण हे त्या मूळ एक ब्रह्मापासून निर्माण झाले आणि पुढें पंच या शब्दानें पंचमहाभूतें आकाश, वायु, अग्नि, जल, पृथ्वी अशीं निर्माण झालीं. पंच-महाभूतापासूनच सर्व स्थूल सृष्टीचा पसारा आपणांस दिसतो. याच्या बुडाशीं ज्या तीन शक्ति, त्या अत्यंत महत्त्वाच्या असल्यामुळें, त्या तुझ्या कृपेनें मला अनुकूल होवोत हा मंत्रदृष्ट्या ऋषीचा मुळांतील आशय." पंचमहाभूतांपासून पुढें ज्ञानेंद्रियें, मन आणि बुद्धि अशीं सात निर्माण झाली. पुढें पंचीकृत महाभूतांपासून नवद्वारांनीं युक्त असा मानवी देह निर्माण झाला. या देहामध्यें पांच मुख्य व पांच अंगभूत मिळून दहा प्राण. अपान, समान, व्यान, आणि उदान हें पांच मुख्य. देव-दत्त, धनंजय, नाग, कुर्म आणि कृकल हे पांच अंगभूत असे मिळून दहा व या दहा प्राणांना आधारभूत असणारी एक सुषुम्ना नाडी मिळून एकादश. एकादश व इतर संख्यावाचक शब्दांचा खरा तात्त्विक अर्थ काय आहे याची ओझरती कल्पना यावी एवढ्याचसाठीं हें दिग्दर्शन येथें केलें आहे. विशेष जिज्ञासा असणाऱ्या जिज्ञासूंनीं मुळांतूनच हा विषय नीट समजावून घ्यावा.

वाज म्हणजे अन्न. प्रसव म्हणजे त्या अन्नाची उत्पत्ति; अपिज म्हणजे त्याच अन्नाची पुनः पुन्हा उत्पत्ति. क्रतुः या शब्दाचे दोन

अर्थ. एक भोगाविषयक संकल्प आणि दुसरा याग. सुवः म्हणजे यज्ञाला कारणीभूत होणारा आदित्य म्हणजे सूर्य. यज्ञ या शब्दाचा अर्थ त्याग असाही आहे. त्यागावर सर्व विश्वाची धारणा अवलंबून आहे. म्हणूनच, " त्यागेनैके अमृतत्वमानशुः" असें श्रुतीनें सांगितलें आहे. ही त्याग करण्याची क्षमता सूर्यावरच अवलंबून असते. म्हणून चराचर सृष्टीच्या जीवनयज्ञाला कारणीभूत असणारा सूर्य असा अर्थ येथें विवक्षित आहे. मूर्धा म्हणजे स्वर्ग. व्यश्नियः म्हणजे विशेषेण अश्नोति व्याप्नोति इति व्यश्न म्हणजे आकाश; या आकाशांत किंवा आकाशापासून उत्पन्न होणारा तो व्यश्नीय. आन्त्यायनः म्हणजे—अंते जातः—शेवटीं झालेला. सर्व सृष्टीचा महाप्रलय ज्यावेळीं होतो त्यावेळीं पुन्हां सृष्टीच्या उत्पत्तिसाठीं जो प्रथम प्रगट होतो तो अन्त्यः म्हणजे सर्वांचा प्रलय झाला तरी सर्व सृष्टीच्या अंतीं म्हणजे शेवटीं राहणारा तो अंत्य. चतुर्दश भुवनामध्यें जो होतो ( म्हणजे ज्याचें अस्तित्व असतें ) तो भौवन् परमात्मा हा आशय. भुवनः म्हणजे जगत्-स्वरूपामध्यें असणारा. अधिपतिः म्हणजे सर्व पदार्थांमध्यें राहून त्यांचें रक्षण करणारा. अधिष्ठाय रक्षयति इति अधिपतिः । अहोबल भाष्यामध्यें याचा राजा असाही अर्थ केला आहे. तोही फारसा चूक नाहीं. कारण 'ना विष्णुः पृथीवीपतिः' असें श्रुतिवचनही आहे. दुसराही एक वाज्प्रभृति शद्बांचा मासवाचक असा अर्थ होऊं शकतो. चैत्रादि बारा महिन्यांचीच ही वाजप्रभृति नांवें गुणविशेषांवरून असावीत असेंही कांहींचें मत आहे. तें चिन्तनीय वाटतें. ज्यावेळीं मासपर असा अर्थ घेतला जाईल त्यावेळीं हा सर्व द्वादशमासात्मक संवत्सर-रूपी काल मला अनुकूल राहो असा अर्थ करावा. या अनुवाकांत व या मागच्या सर्व अनुवाकांत आलेले चकार हे समुच्चयार्थक किंवा अनुक्त म्हणजे न सांगितलेले असे काल, देवता, इत्यादींचें वाचक सम-

जावेत. अशा तऱ्हेनें हे सर्वव्यापी रुद्रा, तुझ्या अपार करुणेनें या एकादश चमकानुवाकांत सांगितलेले पदार्थ– मे कल्पताम्–मला प्राप्त होवोत.

इतिश्री किंजवडेकरान्वयसम्भूत श्रीमत्साग्निचित्सार्वपृष्ठाप्तोर्यामयाजी श्रीमद्दत्तात्रेय–तनुजनुषा–मीमांसातीर्थ पदवीविभूषितेन पं. श्रीपादशास्त्रिणा विरचितायां महाराष्ट्रभाषावष्टब्धायां रुद्रार्थदीपिकायामेकादशोऽनुवाकः ।

समाप्ता चेयं रुद्रार्थदीपिका.

सायणाचार्यभाष्येण विशेषेणोज्ज्वली कृतम् ।
रुद्रसूक्ताभिधं रत्नं क्व चेदं क्व च मे मतिः ॥ १ ॥
तथापि वाङ्मयं पुष्पं कमलेश्वरपादयोः ।
यथोत्पन्नमिदं भक्त्या ह्यर्पितं प्रीतयेऽस्तु तत् ॥ २ ॥



॥ श्री ॥

अन्वयार्थ

# श्रीमद्भगवद्गीता

संपादक :

प्रा. शं. वा. (सोनोपंत) दांडेकर

किं. १ रुपया; पोस्टेज ०·३१ न. पै.

यशवंत प्रकाशन, पुणें.

## प्रसाद प्रकाशनाचीं धार्मिक पुस्तकें.

### प्रा. शं. वा. ( सोनोपंत ) दांडेकर संपादित.

( १ ) सार्थ ज्ञानेश्वरी ( द्वितीयावृत्ति ) ... किं. १५ रु.

( २ ) अभंग-संकीर्तन, भाग १ ला ( द्वितीयावृत्ति )... किं. २ रु.

( ३ ) अभंग-संकीर्तन, भाग २ रा ... किं. २·५०

( ४ ) अभंग-संकीर्तन, भाग ३ रा ... किं. २.५०

( ५ ) ईश्वरवाद ( छापीत आहोंत )

( ६ ) ज्ञानेश्वरींतील कठीण शब्दांचा कोश. ... किं. ५ रु.

( ७ ) ज्ञानेश्वरींतील विदग्ध रसवृत्ति-डॉ. रा. शं. वाळिंबे किं. १० रु.

( ८ ) श्री शिवलिंगोपासना ( डॉ. स. कृ. फडके ) ... किं. १० रु.

**प्रत्येक पुस्तकास टपाल खर्च वेगळा.**

**य. गो. जोशी–प्रसाद प्रकाशन, पुणें २.**